


सेंट्रल बँक शतकमहोत्सवानिमित्त
'ग्रंथसरिता' विदर्भ यात्रेस झेंडा दाखवताना
मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण
सोबत बँकेचे अध्यक्ष मोहन टांकसाळे




ग्रंथाली वाचक चळवळीचे

# रुची

फेब्रुवारी २०१२ • मूल्य ५० रुपये



## चंद्रपूर साहित्य संमेलन विशेषांक


Incredible !ndia
MAHARASHTRA TOURISM
Pure mesmerising nature.
And the Joy of seeing deer at play.
Welcome to a wildlife wonderland called Maharashtra. Visit Nagzira, to gape at deer gambolling just a few feet away. Marvel at the majestic tigers prowling around Tadoba. Spot birds of every colour of the rainbow at Navegaon. There's more, of course. With 39 vast Sanctuaries and Parks, Maharashtra is paradise for the Nature-lover. A place to enjoy the captivating sight of fauna roaming free. And experience pure joy.
Nagzira
Navegaon
Melghat
Pench
Nagzira
Navegaon
Chikhaldara
Tadoba
Chaprala
Prominent Sanctuaries
*Destinations marked on the map are for demonstration purposes.
MAHARASHTRA
unlimited
GJ/BEEHIVE
Website: www.maharashtratourism.gov.in Tel: 91-22-22845678 Toll Free No.: 1800229930

**ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक**

# रुची

**फेब्रुवारी २०१२, वर्ष ३१ वे,**
**अंक दुसरा, मूल्य ५० रु.**

संपादक : **दिनकर गांगल**
कार्यकारी संपादक : **अरुण जोशी**
मुखपृष्ठ : **ग्रंथाली संगणक विभाग**
**रुची – वार्षिक वर्गणी : १०० रुपये**

**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ.'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, महापालिका शाळेची इमारत, पहिला मजला, टोपीवाला लेन, डॉ. भडकमकर रोड पोलिस ठाण्यासमोर, ग्रँटरोड, मुंबई ४०० ००७
☎ २३८९ २४ ४५ ● फॅक्स : २३८७ ५४ ८१
ग्रंथाली, इंडियन एज्युकेशन सोसायटीची म. फुले कन्याशाळा, बाबरेकर मार्ग, दादर(प), मुंबई ४०० ०२८ ☎ २४४७ ४८ ४३
Email - granthali01@gmail.com

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

स.न.

फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात चंद्रपूर येथे पंचाऐंशीवे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन भरत आहे. वसंत आबाजी डहाके तिथे अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतील. या संमेलनानिमित्त, विदर्भातील सामाजिक-सांस्कृतिक घडामोडींचा आढावा घेणारा हा विशेषांक प्रसिद्ध करत असताना, ज्येष्ठ संपादक प्रवीण बर्दापूरकर आणि प्राचार्य मदन धनकर यांचा लेख मिळवण्यात महत्त्वाचा सहभाग लाभला आहे. त्यांच्यातील उत्स्फूर्तता त्यांच्या वैदर्भीय धाटणीला अनुसरूनच आहे. विदर्भातील नवकर्तबगारांबाबत वसंत वाहोकार यांनी लिहिले आहे, तर तिथल्या सांगीतिक वातावरणाबद्दल डॉ. सुलभा पंडित लिहीत आहेत. चंद्रपूरमध्ये जन्मलेल्या आणि देशात नावलौकिक मिळवलेल्या व्यक्तिमत्त्वांचा वेध प्रा. श्रीकांत पाटील यांनी घेतला आहे. प्रवीण बर्दापूरकर यांनी गेले काही महिने जी व्यक्तिचित्रे लिहिली, ती विदर्भातील गेल्या काही महिन्यांत वेगवेगळ्या कारणांनी सन्मानित झालेल्या व्यक्तींची होती. विदर्भातील या सांस्कृतिक मेन्टॉरच्या साखळीतील आणखी एक नाव म्हणजे महेश एलकुंचवार. त्यांच्यावरील बर्दापूरकरांचा लेख जसा या अंकात आहे, त्याचप्रमाणे चंद्रपूर येथे अनेक वर्षांपासून उद्योजक म्हणून ख्यातकीर्त असलेले यशवंतराव कुलकर्णी यांची मुलाखतही आहे. सांस्कृतिक क्षेत्राबरोबर उद्योग, पर्यटन, इतिहास यांचा मागोवा घेणारे लेख चंद्रपूरदर्शन घडवतील.

वसंत आबाजी डहाके यांचे कवी, लेखक, समीक्षक, चित्रकार असे बहुआयामी व्यक्तित्व आपल्याला माहीत आहे. त्यांच्या चित्रगतीबद्दल दीपक घारे यांनी लिहिले आहे. त्यांनी 'मराठी साहित्य – इतिहास आणि संस्कृती'मधून मराठी साहित्याच्या सांस्कृतिक पार्श्वभूमीचा पट उभा केला आहे. आत्मभान आणि विश्वभान यांत योग्य संतुलन राखण्याचा पेच कायम असल्याचे त्यांचे मत महत्त्वाचे आहे.

राजकारण हाडात नाही, तर चेहऱ्यावर कुठून येणार, अशी अवस्था असलेले भारताचे पंतप्रधान गेल्या महिन्यात म्हणाले, की कुपोषण हा भारताला लागलेला कलंक आहे. हे कुपोषण सर्वच मूलभूत गरजांचे आहे. मराठीच्या अधोगतीची ओरडही त्यातच आहे. डहाके यांनी व्यक्त केलेला पेच हा गती आणि मती यातला आहे. त्याचे भान राखले तर निदान मराठी भाषेचे कुपोषण रोखण्याबाबत हे संमलेन काही विचार करेल अशी आशा करायला हरकत नाही.


**– संपादक**

***मुखपृष्ठावरील छायाचित्रात* मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण आणि सेंट्रल बँकेचे अध्यक्ष मोहन टांकसाळे यांच्यासोबत बँकेचे एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर राजीव किशोर दुबे आणि विजयालक्ष्मी अय्यर. खालील छायाचित्र वसंत आबाजी डहाके यांनी रेखाटलेले. (सौजन्य 'खेळ' – २००८)**


१




२



३



४



चित्रे – 'खेळ' वसंत आबाजी डहाके विशेषांक २००८ मधून साभार

# वेदनेची रेषा

## दीपक घारे

चंद्रपूर येथे होणाऱ्या ८५ व्या अ.भा. मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष वसंत आबाजी डहाके यांच्या चित्रगतीचा हा वेध...

वसंत आबाजी डहाके यांच्या रेखाटनांचा स्वतंत्रपणे विचार करावा अशा योग्यतेची ती आहेत. कवी म्हणून असलेल्या त्यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाशी त्यांचं आंतरिक नातं आहे आणि एका चित्रकाराचं मनोगत म्हणून त्यांना स्वतंत्र अस्तित्वही आहे. 'योगभ्रष्ट'पासून 'चित्रलिपी'पर्यंत डहाकेंच्या कवितेत जीवनातली विरूपता, आदर्श आणि वास्तव यांच्यातल्या विसंगतींमधून आलेला परात्मभाव, आदिम भीती निर्माण करणारं ईश्वराचं अक्राळविक्राळ रूप आणि माणसाचं क्षुद्र कीटकासारखं आयुष्य हे सारं कधी अतिवास्तव रूपात, कधी नाट्यानुभवाच्या अंगानं तर कधी तटस्थ अलिप्तपणानं येतं.

डहाके यांच्या रेखाटनांमध्ये हाच आशय रेषेच्या वापरातून, कधी रांगडेपणानं, कधी विरूपतेच्या अंगानं, कधी मितभाषी मोजक्या रेषांमधून तर कधी रेषांच्या आवेगी आवर्तनांमधून येत राहतो. त्यांनी माणसांची आणि मानवी चेहऱ्यांची केलेली अनेक रेखाटनं अधिक प्रभावी वाटतात. व्यक्तिचित्रं ही विशिष्ट व्यक्तीची असतात. चेहरा दिसतो तसा काढणं, साधर्म्य किंवा लाईकनेस हा तिथे महत्त्वाचा निकष असतो. डहाके यांची रेखाटनं अशा व्यक्तिचित्रणांमध्ये बसणारी नाहीत. त्यांनी काढलेल्या मानवी चेहऱ्यांचं नातं आहे ते सूझा किंवा अकबर पदमसी यांनी काढलेल्या मानवी चेहऱ्यांशी. डहाकेंनी केलेल्या रेखाटनांमधले चेहरे एखाद्या विशिष्ट व्यक्तीची ओळख सांगण्यापेक्षा माणूस आणि त्याचं सनातन दुःखच प्रातिनिधिकपणे सांगतात.

उदाहरणादाखल डहाकेंची काही प्रातिनिधिक रेखाटनं इथे दिलेली आहेत. पहिल्या रेखाटनात संपूर्ण मानवी शरीर रेखाटलं असलं तरी त्या चित्राचा केंद्रबिंदू मानवी चेहराच आहे. यातील रेखाटन थोडंसं ओबडधोबड आणि रांगडं आहे. पण त्यामुळेच त्याला एक थेटपणा आलेला आहे. जाड रेषेबरोबरच काळ्या रंगाचा केलेला वापर, काळ्या-पांढऱ्या रंगांनी आणि शृंखलांनी केलेलं अवकाशाचं विभाजन यामुळे मानवी अनुभवातली खंडितता, दुभंगलेपणाची जाणीव चांगल्या पद्धतीनं आली आहे.

दुसऱ्या रेखाटनात फक्त चेहरा आहे. कुणाही सामान्य माणसाचा वाटावा असा. फक्त डोक्यावर मुकुट आहे. या चित्रामधील रेषा संदिग्ध आकार व्यक्त करतात. म्हणजे असं, की एका कोनातून त्या चेहऱ्याचे अवयव, त्यांची वैशिष्ट्यं व्यक्त करतात. पण दुसऱ्या बाजूनं याच रेषा चेहऱ्यामध्ये दडलेलं अवकाश जिन्यासारख्या भासणाऱ्या आडव्या रेषांमधून, उंचसखल भागांमधून, घरांसारख्या भासणाऱ्या मुकुटाच्या आकारांमधून एका निसर्गचित्रात, लँडस्केपमध्ये परावर्तित करतात. हा चेहरा मग जीवनप्रवासाचं प्रतीक बनतो.

तिसरं चित्र म्हणजे साधू-बैरागी वाटावा अशा माणसाचा चेहरा आहे आणि चौथ्या चित्रात येशू ख्रिस्ताचा वाटावा असा चेहरा आहे. ही दोन्ही चित्रं रेषेचा भिन्न आविष्कार दाखवणारी आहेत. तिसऱ्या चित्रातील रेषा जोरकस, अस्ताव्यस्त, पण मधल्या पांढऱ्या भागाच्या चुंबकशक्तीनं भारलेल्या वाटतात. त्यात तामसी वृत्तीचा प्रभाव अधिक वाटतो. या व्यक्तिमत्त्वाचा अर्थ दोन प्रकारे लावला जाऊ शकतो. मधला पांढरा आकार, तेजाचा आंतरिक प्रकाश आणि म्हणून तपस्वी साधूचा चेहरा किंवा पांढरा आकार म्हणजे ऊर्जेचं, लैंगिकतेचं प्रतीक आणि भोवतालच्या रेषा म्हणजे अंधाऱ्या वासनाविश्वाचा पसारा- बघणाऱ्याच्या दृष्टीनुसार चित्रांचा आशय बदलतो.

चौथ्या चित्रात येशू ख्रिस्ताचा वाटावा असा चेहरा आहे. आत्ममग्न चेहरा. डोक्यावरच्या केसांची महिरप आणि डोक्यावर आवर्ती गोलाकार रेषांचं जाळं. इथे पुन्हा येशू आणि तेजोवलय असा त्याचा अर्थ होऊ शकतो किंवा आधुनिक काळातला संभ्रमित, योगभ्रष्ट माणूस. म्हटलं तर तेजोवलय, म्हटलं तर सिसिफसच्या डोक्यावरचा दगड. डहाके यांचे चेहरे बघणाऱ्याला गुंतवून ठेवतात ते या अर्थपूर्ण संदिग्धतेमुळे.

एका अर्थानं डहाके यांचे चेहरे म्हणजे सेल्फ पोर्ट्रेट्स् आहेत. त्यांच्या लौकिक व्यक्तिमत्त्वाचं प्रतिबिंब या अर्थानं नव्हे, तर डहाकेंच्या पिढीनं अनुभवलेल्या, आधुनिक कलेतल्या अस्तित्ववादी, व्यस्त आणि निरर्थ जीवनदर्शनाचं प्रातिनिधिक प्रतिबिंब या अर्थानं.

# च्यवन‘पा’श

## डॉ. उज्ज्वला दळवी

च्यवनऋषींच्या बायकोनं, सुकन्येनं, आपल्या पतीला तारुण्य मिळावं म्हणून अश्विनीकुमारांना साकडं घातलं. ययातीनं तर स्वतःच्या पुत्राकडून त्याचं यौवन उसनं मागितलं. वार्धक्य कुणाला हवं असतं? आरशात बघताना डोक्यावर ‘कृतान्तकटकामलध्वजजरा दिसों लागली’, की मनात धस्स होतंच. तसा केसांच्या पांढरेपणामुळे कुणाला खास त्रास होत नाही. सध्याच्या बाटलीबंद काळिम्याच्या काळात तर पांढरे केस नगण्यच असतात. पण त्यांच्या साथीनं येणारे दृष्टिदोष, हृदयरोग, सांधेदुखी, बुद्धिनाश वगैरे षड्रिपू जिवाचा छळ कार्य आहे. ते काम पार पडलं की संततीच्या गरजेपुरतं जगावं, एवढीच जिवाकडून अपेक्षा असते. तेवढा काळ संपला की मग त्या सजीवाचा वंशाला (species) भार होतो. भोवतालच्या अन्नपाण्यासाठी संततीला त्याच्याशी स्पर्धा करावी लागते. पुढल्या पिढीचं व्यवस्थित पोषण व्हावं, वंश सुरळीत चालू राहावा, त्याच्या जनुकांची योग्य जपणूक व्हावी या निःस्वार्थी, परोपकारी किंवा वंशोपकारी उद्दिष्टानं मागच्या पिढीचा मृत्यू हा योग्य तोडगा ठरतो. अशी वेळ आली, की ऑक्टोपस प्राणांतिक उपोषण करतो. उंदरांच्या काही जातींमध्ये

अमिताभ बच्चनच्या ‘पा’ सिनेमा-तल्या ऑरोसारखी, progeria (अकाली वार्धक्य) नावाचा आजार झालेली मुलं वयाच्या नवव्या-दहाव्या वर्षीच जख्ख म्हातारी होतात. माणसांच्या ‘समाजा’त हातपाय थकलेल्या वडिलधाऱ्यांना मायेनं जपलं जातं. ‘कळपा’त कोल्हे-लांडगे म्हातारे झाले की त्यांचे हाल कुत्रा खात नाही... म्हातारपण येतंच कशासाठी? कुणी किती आणि कसं जगावं आणि कसं मरावं हे कसं ठरतं?... ज्या जनुकांमुळे म्हातारपण ओढवतं अशा जनुकांचा शोध सध्या सुरू आहे.. या जीवनाच्या प्रोग्रॅममध्ये गुंतागुंत असली तरी बिनचूक संतुलन आहे. कसलाही गाजावाजा न करता, एका पेशीची किंवा वंशाचीच नव्हे तर साऱ्या जीवसृष्टीच्या भवितव्याची काळजी त्यात घेतलेली आहे. या साऱ्याचं ज्ञान करून घेणं आणि त्यातल्या दिव्यत्वाच्या प्रचीतीने दिपून जाणं इतकंच सध्या मानवाचं कर्तव्य आहे.

करतात. गात्रं थकतात, पडझड होते, ठिसूळ हाडं मोडतात. न्यूमोनियासारखे आजार सहज होतात आणि सहजासहजी बरे होत नाहीत. त्यामुळे ‘मरणाने सुटका व्हावी, जगण्याने छळले आहे’, असं कित्येक वृद्धांना मनोमन वाटतं.

माणसांच्या ‘समाजा’त हातपाय थकलेल्या वडिलधाऱ्यांना मायेनं जपलं जातं. ‘कळपा’त म्हाताऱ्या प्राण्याची काळजी कुणी घेत नाही. वाघ-सिंह, कोल्हे-लांडगे म्हातारे झाले, की त्यांचे हाल कुत्रा खात नाही. हत्ती तर मरणघरात जाऊन मृत्यूची वाट बघतात असं म्हणतात.

मग म्हातारपण येतंच कशासाठी?

जीवसृष्टीच्या, उत्क्रांतीच्या दृष्टीनं पुनरुत्पादन हे सजीवांचं मुख्य

पिल्लांना दूध पाजायची गरज संपली, की मादीचं जगणं संपुष्टात येतं. सगळ्या वंशांच्या सजीवांना हे जमत नाही. म्हणून काही सजीव म्हातारे होतात.

जन्मापासून रोजच्या जगण्याची जी क्रिया चालू असते तिच्यात सर्वच पेशींमध्ये हानिकारक पदार्थांचा कचरा गोळा होत जातो. खमीराच्या (yeast) मायपेशीत जुन्या जनुकांच्या कड्यांचाच कचरा जमत जातो आणि सरतेशेवटी तिला जिणं अशक्य करतो. इतर सजीवांच्या पेशींमधला कचरा जरा वेगळा असतो. त्यात हानिकारक रासायनिक पदार्थांचं प्रमाण मोठं असतं. तो जीवघेणा कचरा वयापरत्वे साचत जातो. त्यामुळे पेशीच्या जगण्याच्या कामकाजात अडथळा येतो. हा अडथळा वाढून हळूहळू पेशीची जगण्याची क्षमता कमी

कमी होत जाते आणि शेवटी ती मरते.

मोठ्या, उत्क्रांत प्राण्यांमध्ये यकृत, मूत्रपिंड, हृदय यांसारखे अनेक अवयव असतात. वय वाढत जातं तसतशा त्यांच्यातल्या पेशी असा कचरा साचून मरत असतात. एखाद्या अवयवातल्या अनेक पेशी अशा दगावल्या, की त्या अवयवाची कार्यक्षमता कमी होत जाऊन तो निकामी होतो. इतर अवयवांतही पेशींचं असं मरण कमीअधिक प्रमाणात चालू झालेलं असतं. सगळी गात्रं संगनमतानं एका दमात निकामी झाली असती तर तडकाफडकी शेवट झाला असता. वार्धक्यात खितपत न पडता मृत्यूनं सुटका झाली असती. पण तसं होत नाही. एकेक अवयव हळूहळू काम थांबवतो. बाकीचे जगण्याचा भार कसाबसा ओढत राहतात. काही काळ का होईना, थकल्या शरीरानं जगणं चालू राहतं. हा काळ म्हणजेच म्हातारपण.

पण सगळेच प्राणी असे म्हातारे होत नाहीत. बरेचसे बेडूक, सरडे, साप तरुणच राहतात. कासवं शतायुषी तर असतातच, शिवाय जसजसं वय वाढतं तसतशी त्यांची पुनरुत्पादनाची क्षमता वाढत जाते. या प्राण्यांना मृत्यू येतो पण वार्धक्याचा छळ न सोसता. एक प्रकारचा सामन मासा विणीच्या हंगामात समुद्रातून नदीत उलटा पोहत येतो. अंडी घालून झाली, की तो मासा तडकाफडकी मरतो. बांबूचं रोप पंधरा-वीस वर्षं जोमात वाढतं. त्यानंतर प्रथमच त्याला फुलोरा येतो. त्यात बीजं धरली की रोपाच्या आयुष्याचं कर्तव्य संपतं आणि ते इतर काहीही कारण न होता मरतं.

प्रत्येक वंशाचा पुनरुत्पादनाचा काळ, म्हातारपण, एकूण जीवनकाल हे ठरलेलं असतं आणि ठरल्याप्रमाणेच होतं. कुणी किती आणि कसं जगावं आणि कसं मरावं हे कसं ठरतं? हे कोडं सोडवायचा शास्त्रज्ञांचा प्रयत्न चालू आहे. सजीवांच्या प्रत्येक पेशीनं काम कसं करावं हे ठरवणारा एक मास्टर प्रोग्रॅम म्हणजेच जनुकसंचय प्रत्येक पेशीच्या केंद्रात जपलेला असतो. या मास्टर प्रोग्रॅममध्येच या कोड्याची सगळी उत्तरं दडलेली आहेत, हे नक्की! पण ती शोधून काढणं सोपं नाही.

पुनरुत्पादनाच्या जनुकमंथनात हानिकारक जनुकं हळूहळू वगळली जातात. सजीवसृष्टीतले दोष दूर करणं, अधिक सक्षम असतील तेवढेच वंश तगवणं हेच उत्क्रांतिवादाचं ध्येय आहे. मग कुणालाही नको असणारं म्हातारपण खमीराच्या मायपेशीपासून मानवापर्यंत टिकून कसं राहिलं? त्याचा अर्थ, ज्या जनुकांमुळे म्हातारपण ओढवतं तीच जनुकं आयुष्याच्या सुरुवातीला इतर काही आवश्यक कामंही करत असणार. त्यामुळे अशा बहु-कार्यक्षम जनुकांचा शोध सध्या सुरू आहे. या शोधात वेगवेगळ्या घटनांचा आणि निरीक्षणांचा हातभार लागतो आहे.

अमिताभ बच्चनच्या 'पा' सिनेमा-तल्या ऑरोसारखी, progeria (अकाली वार्धक्य) नावाचा आजार झालेली मुलं वयाच्या नवव्या-दहाव्या वर्षीच जख्ख म्हातारी होतात. त्यांची कंबर वाकते, सांधे जखडतात, मोठाल्या डोक्याला टक्कल पडतं आणि पातळ त्वचेवर सुरकुत्यांचं जाळं पडतं. पण त्यांची नजर मात्र त्यांच्या खऱ्या वयाला साजेशी निष्पाप, उमदी आणि चराचरचकित असते. ती नजर त्यांच्या एरवी जराजर्जर दिसणाऱ्या चेहऱ्यांवर बालिश गोडवा टिकवते. तो विरोधाभास काळजाचा ठाव घेतो. हा आजार जनुकीय असला तरी आनुवंशिक नसतो. या मुलांच्या जनुककोशातल्या एका जनुकात दोष असतो. इतर माणसांत हे जनुक पेशीकेंद्राच्या आवरणाला आधार देणारं एक आवश्यक प्रथिन बनवतं. पंचवीस हजार अक्षरजोड्यांनी बनलेल्या या जनुकातल्या, फक्त एकाच जोडीत progeriaचा अक्षरपालट (mutation) होतो. तेवढ्या एका 'ध'च्या 'मा'मुळे progerin नावाचं एक कुचकामी प्रथिन बनतं. शरीरातल्या प्रत्येक पेशीकेंद्राच्या आवरणाचा आधार जातो आणि त्याला फुगे येतात. परिणामी, पूर्ण शरीर फार लवकर म्हातारं होतं. तो मूळ जनुकीय दोष बदलणं सध्या जमणार नाही. पण उंदरांवरच्या प्रयोगांत निदान ते पेशीकेंद्राचे फुगे काढून टाकणं संशोधकांना जमलं आहे. आता चोवीस देशांतल्या पंचेचाळीस मुलांवर त्या उपायांची चाचणी चालू आहे.

WRN नावाचं एक जनुक आहे. हे जनुक DNAमध्ये होणाऱ्या चुका, खड्यासारख्या वेचून काढून, त्या निस्तरण्यात दक्ष असतं. त्यामुळे पेशींच्या आरोग्याला ते अत्यावश्यक असतं. वेर्नर सिंड्रोम नावाच्या आजारात मात्र या अत्यावश्यक जनुकात काही दोष उद्भवतात. त्यामुळे DNAमध्ये होणाऱ्या चुका साचत जातात. हा सिंड्रोम झालेल्या माणसांचं विशी-एकविशीपर्यंतचं आयुष्य, तोवरची वाढ, हे सारं चारचौघांसारखंच असतं, त्यानंतर मात्र ती झपाट्यानं म्हातारी होतात. त्यांना मोतीबिंदू होतात, मधुमेह होतो, हृदयाचे आणि रक्तवाहिन्यांचे रोग होतात, केस पिकतात. त्यांची हाडं ठिसूळ होतात, सांधे धरतात.

याउलट, काही जनुकं आयुष्य वाढवतात. ॲश्केनाझी यहुदी जमातीत-जे शहाण्णव वर्षांहून अधिक जगतात त्यांच्यातल्या अनेकांत-एक वेगळंच जनुक आढळतं. ॲडॅम आणि ईव्हचा खापरपणतू, मेथुसेला, ९६९ वर्षं जगला असा बायबलमध्ये उल्लेख आहे. त्या मेथुसेलावरून दीर्घायुषी यहुदींमधल्या या जनुकाला 'मेथुसेला जनुक' असं नाव दिलं आहे. आइसलॅण्डमध्ये नव्वदी पार केलेल्या बाराशे माणसांच्या जनुककोशाची, सर्वसामान्यांच्या जनुककोशांशी तुलना केली. त्या सगळ्यांतही एक समान दीर्घायुषी जनुक होतं.

या तीन उदाहरणांवरून ध्यानात आलं, की एकाच जनुकात काही बदल झाला तरी त्यामुळे आयुर्मर्यादेवर परिणाम होऊ शकतो. अगदी 'मेथुसेला जनुका'सारखी नसली तरी ऐंशी-पंचाऐंशी वर्षांचं धडधाकट आयुष्य देणारी अनेक जनुकं असावीत. नाहीतर एकाच कुटुंबात बरीच दीर्घायुषी माणसं दिसतात तशी दिसली नसती. अशा कुटुंबांच्या अभ्यासावरून उमजलं, की आयुर्मर्यादा ठरवण्यात निदान पंचवीस टक्के वाटा तरी जनुकांचा आहे. उरलेले पंचाहत्तर टक्के ठरवण्यात भोवतालची परिस्थिती, अपघात वगैरेंचा हातभार लागतो. नव्वदी-शंभरीहून अधिक जगणं किंवा वयात येण्यापूर्वीच मरणं या

दोन्ही प्रकारांत जनुकीय कारणंच बलवत्तर असतात.

आयुष्य वाढवणाऱ्या जनुकांत काय वेगळं असतं? ती शरीराची झीज भरून काढण्यात अधिक प्रभावी असावीत, त्यांच्यामुळे रोग-प्रतिकारशक्ती वाढत असावी, वार्धक्यासोबत येणारे आजार दूर राहत असावेत. शंभरी गाठलेल्या माणसांच्या संततीमध्येही मधुमेह आणि हृदयरोग यांचं प्रमाण कमीच असतं. म्हणजे त्यांनाही ती दीर्घायुष्याची जनुकं लाभलेली असतात. पण उत्क्रांतीच्या दृष्टीनं जसं वार्धक्याच्या जनुकांना काही प्रयोजन नाही तसंच दीर्घायुष्याच्या जनुकांनाही नाही. उत्क्रांतीला पोषक असं कार्य म्हणजेच पुनरुत्पादन झालं, की आयुष्य संपायला हवं. पण या शतायुषी माणसांच्या सर्वेक्षणांमध्ये दिसून आलं, की जसजसं आयुष्य लांबत जातं तसतसे उत्क्रांतीचे नियमच तोकडे पडायला लागतात.

कशाला असतात ही दीर्घायुषी जनुकं?

हा सगळा गुंता अभ्यासाखेरीज सुटणं शक्य नाही. म्हणून संशोधकांनी अशी आयुष्मान करणारी जनुकं शोधली.

ऐंशी वर्षांपूर्वी जेव्हा शास्त्रज्ञांनी रंगसूत्रांचा (chromosomes) अभ्यास केला तेव्हा त्यांना रंगसूत्रांच्या टोकाच्या टोप्यांचं वेगळेपण जाणवलं. या टोप्यांमुळे रंगसूत्रं एकमेकांना चिकटत नाहीत हेही कळलं. या टोप्यांना संशोधकांनी telomeres म्हणजे पुच्छखंड किंवा शेपूटतुकडे असं नाव ठेवलं. मग DNAच्या आणि त्यामागोमाग या शेपट्यांमधल्या परमाणूंचा अभ्यास जमला. या शेपट्यांमध्ये CCCCAA-CCCCAA- अशा अक्षरसाखळ्यांची पुनरावृत्ती असते. ही 'क्क्का-क्क्का' पुनरावृत्ती का असावी, हे शास्त्रज्ञांनी शोधलं.

नुकतंच शिवणकाम शिकायला लागलेल्या मुली टीप घालण्यापूर्वी धावदोरा घालतात. टीप घालून झाली की तो दोरा ओढून पूर्ण बाहेर काढून घेतात आणि पुन्हा वापरतात. पण त्यांना दर वेळी आधाराला एक टोकाची गाठ मारावी लागतेच. आणि त्या गाठीपुरताच्या दोरा दर वेळी कमी कमी होत जातो आणि शेवटी संपतो.

पेशींच्या पुनरुत्पादनात रंगसूत्रांच्या कॉप्या काढल्या जातात. ते काम mRNA हा निरोप्या करतो. त्याला मुलींच्या धावदोऱ्यातल्या टोकाच्या गाठीसारखी, रंगसूत्रांच्या शेपट्यांची टोकं आधाराला पकडावी लागतात. अशा पकडलेल्या टोकांची तो कॉपी करत नाही. त्यामुळे प्रत्येक रंगसूत्राच्या पुढच्या आवृत्तीत तेवढं टोक कमी असतं आणि नव्या पेशींची ही सूत्र-शेपटी थोडी आखूड झालेली असते. असं करता करता पन्नास-सत्तर विभाजनांनंतर सूत्र-शेपटी संपून जाते. त्यामुळे त्या मालिकेतल्या पेशींचं त्यानंतर पुनरुत्पादन होत नाही. अशा शेपटी सरलेल्या म्हाताऱ्या पेशी मरून जातात किंवा त्यांचं कर्कपेशींत रूपांतर होतं. या शेपट्यांची लांबी आनुवंशिकतेनं ठरते. ज्या माणसांत या शेपट्या मुळातच तोकड्या असतात त्यांच्यात हृदयरोगानं मृत्यू येण्याचं प्रमाण इतरांच्या तिप्पट असतं आणि सांसर्गिक आजारानं मरण्याचं प्रमाण आठपट असतं. शिवाय, बुद्धिभ्रंश, रक्तवाहिन्यांचा ताठरपणा (atherosclerosis), कर्करोग यांचंही प्रमाण सर्वसामान्यांहून अधिक असतं.

या शेपट्यांचा कर्करोगाशी खास संबंध आहे. कर्करोगाच्या पेशींमध्ये Telomerase नावाचं एक एन्झाइम-प्रथिन असतं. ते या शेपट्यांची लांबी वाढवत राहतं. त्यामुळे कर्करोगाच्या पेशींचं पुनरुत्पादन अव्याहत चालू राहतं. त्या पेशींचे दुर्गुण वगळून केवळ हे Telomeraseचं 'शेपटीसत्र'च उसनं घेता आलं तर म्हातारपण थोपवता येईल का, याचंही संशोधन सुरू झालं.

पण जनुकीय म्हातारपण असं शेपटीपुरतं मर्यादित नसतं.

ऐंशी वर्षांपूर्वी अमेरिकेच्या बाजारात भयानक मंदी आली. समाजात दारिद्र्य मातलं. माणसं कंगाल झाली. मुलं भुकेनं कोमेजली. त्यांच्या आया खंगल्या. त्यांची हृदयद्रावक दृश्यं पाहून संशोधक हेलावले. त्यांच्या स्वतःच्याही हातातोंडाची गाठ जेमतेमच पडत होती. तरीही उपाशी माणसांच्या प्रकृतीवर दूरगामी परिणाम काय होतात ते पाहायला त्यांनी संशोधन केलं. त्या काळात कुणालाही खाऊ घालणं कठीण होतं. तेव्हा शास्त्रज्ञांनी उंदरांना उपाशी ठेवून पाहिलं. आणि अहो आश्चर्यम्! त्या संशोधनात असं दिसून आलं, की अन्नाचा तुटवडा काही काळ चालू राहिला तर उंदीर अधिक काळ जगतात!

कठीण परिस्थितीनं शास्त्रज्ञांना जणू नवाच उखाणा घातला. त्याचं उत्तर शोधायला नंतरच्या काळात जनुकशास्त्राची साथ मिळाली. चिलटं, खमीर, उंदीर यांवर प्रयोग झाले. माणसांच्या पोटात जे जंत होतात त्यांचा C.elegans नावाचा एक चुलतभाऊ आहे. जीवनाच्या सवालांचे जवाब शोधायला शास्त्रज्ञांनी त्याला हाताशी धरला. या जंतांना त्यांच्या वाढीच्या, पुनरुत्पादनाच्या पूर्वीच्या वयात पोटभर खाऊ घातलं तर काय होतं आणि उपाशी ठेवलं तर काय फरक पडतो, याचं निरीक्षण झालं.

खाण्या-जेवण्यानंतर शरीरात वाढणारा प्रमुख स्राव म्हणजे इन्सुलिन. याचं पेशींमध्ये स्वागत करणाऱ्या दरवान-प्रथिनाचं जनुक (IGF-1R) अन्नसेवनानं चाळवलं जातं. जाग आल्यावर ते भोवतालच्या परिसरात आबादीआबाद असल्याचा डंका पेशीत पिटतं. या चंगळवादी डंक्याचे निनाद निरनिराळ्या स्रावांतून शरीरभर घुमतात. शरीर तर सुदृढ होतंच, शिवाय पुनरुत्पादनालाही प्रोत्साहन मिळतं. जीवनाचं मुख्य कर्तव्य पार पडतं आणि अधिक जगण्याचं प्रयोजन राहत नाही.

उपासमारीत हा डंका गाजत नाही. त्याच्या न गाजण्यानेच पेशींमध्ये धोक्याची घंटा घणघणते. जगण्याचं वेळापत्रकच बदलतं. वंश टिकवून धरायचा तर कठीण परिस्थितीतून जात असताना आधी जीव वाचवणं महत्त्वाचं. तगून राहणं हेच दुष्काळात आद्य कर्तव्य ठरतं. 'स्वार्थी जनुकं' स्वतःच्या टिकावासाठी प्रोग्रॅम बदलतात. पुनरुत्पादन लांबणीवर पडतं. वजन घटतं पण पुनरुत्पादनाच्या कष्टांनी होणारी वार्धक्यजनक झीज होत नाही. शरीर उतरणीला लागत नाही.

वार्धक्यासोबत येणारे आजारही पुढे ढकलले जातात. उपासमार संपल्यानंतरच, उशिरा, पुनरुत्पादन सुरू होतं. त्यामुळे वयोमर्यादाही लांबते. 'काळ' खोळंबतो. असे दुष्काळी जंत स्वतः तर दीर्घायू होतातच, शिवाय त्यांची संततीही आयुष्मान असते, तिची प्रत्यक्ष उपासमार झाली नाही तरीसुद्धा! चिलटं, खमीर, उंदीर यांच्यात आणि अलीकडे काही माकडांतही अशासारखे परिणाम दिसून आले.

आपण 'पेशींच्या कारखान्या'त पाहिलं, की सजीवांच्या जनुककोशाची लांबलचक फीत प्रथिनांच्या रिळांभोवती गुंडाळून आटोपशीर केलेली असते. नव्या प्रथिन-कॉप्या काढायला त्या फितीचा कुठला भाग कधी उलगडायचा, तो उलगडूनच ठेवायचा का, हे ठरवणाऱ्या रासायनिक टाचण्या, खुंट्या (epigenetics) असतात. जंतांच्या उपासमारीनं त्यांच्या जनुकफितीच्या वार्धक्यजनक भागावर चक्क खिळाच ठोकला जातो. त्यामुळे तो भाग सहज उलगडत नाही. तिथल्या नोंदींनुसार बनणाऱ्या प्रथिनांचं कामकाज बंद होतं. या फरकामुळे वार्धक्य लांबणीवर पडतं. जंतांच्या पुढच्या पिढीलाही तो खिळा वारसाहक्कानं लाभतो. असा खिळा फक्त उपासमारीनंच मिळतो असं नाही. तल्खली करणारी उष्णता, अतिनील प्रकाश आणि इतरही काही खडतर अनुभव अशाच खिळ्यांनी 'काळा'चा खोळंबा करतात.

मिताहार घेणं आणि शारीरिक कष्ट करणं ही दीर्घायुष्याची गुरुकिल्ली महाभारताच्या आदिपर्वातही सापडते. जनमेजयाचं सर्पसत्र मध्येच थांबवणाऱ्या आस्तिकाचे वडील म्हणजेच जरत्कारू मुनी. त्यांचं शरीर तरुणपणी बलदंड होतं. कडक तपश्चर्या करताना ते फक्त हवा ग्रहण करून जगले आणि अत्यंत कृश झाले. तपःसाधनेच्या ध्यासानं त्यांनी इतरही अनेक देहदंड सोसले. वय बरंच होईतो लग्नही केलं नाही. शेवटी केवळ पितरांना मोक्ष मिळावा म्हणून त्यांनी मोठ्या वयात वासुकीच्या बहिणीशी लग्न केलं आणि तिला गर्भ राहताच ते पुन्हा कष्टमय तपाचरणाला निघून गेले. असे देहदंड सोसत ते अनेक वर्षं काटकपणे जगले.

खडतर जीवनामुळे जी जनुकं जंतांमध्ये जीवनवृद्धी घडवून आणतात, त्या जनुकांसारखंच काम करणारे आणि तसेच बदलूही शकणारे भाऊबंद मानवी जनुककोशातही असतात. अशी बदललेली जनुकं त्वचा, हाडं, स्नायू, रक्तवाहिन्या यांच्यात वयपरत्वे होणारे बदल पुढे ढकलतात. कर्करोगाचा शिरकाव टाळतात. 'मेथुसेला जनुक' हेदेखील अशाच प्रकारच्या जनुकपालटानं निर्माण झालं आहे आणि तेही उपासमार, वाढलेलं तापमान यांमुळे अधिक काम करतं आणि घातक रासायनिक पदार्थांच्या माऱ्याला सोसायची मानवी क्षमता वाढवतं.

या निरीक्षणांवरून असं लक्षात येतं, की ही 'सोसण्याचं धैर्य' देणारी जनुकं, उत्क्रांतीच्या सुरुवातीच्या काळातल्या प्राथमिक सजीवांमध्ये निर्माण झाली असावीत. अन्नाच्या तुटवड्यासारखी खडतर परिस्थिती जाणण्याची क्षमता त्या प्राथमिकांमध्ये होती. त्या परिस्थितीला टक्कर देऊ शकणारी पुढली पिढी तयार करायला पूरक जनुक-पालट घडले असावेत. त्या पालटलेल्या जनुकांची उत्क्रांत रूपं मानवासारख्या प्रगत प्राण्यांपर्यंत चालत आली असावीत. ही अशी 'सोशिक' जनुकं नेमकी कोणती, हे अद्याप तितकंसं स्पष्ट झालेलं नाही. तरी काही जनुकांचा असा 'चांगुलपणा' संशोधकांच्या वेधक नजरेनं टिपला आहे.

पेशींमधल्या घातक रसायनांच्या परिणामांवर नियंत्रण ठेवणारं एक मुकादम-प्रथिन (superoxide dismutase) आहे. त्याच्याशी निगडित असलेलं जनुक हे असंच 'सोशिक' असावं अशी अटकळ आहे.

पेशींची ऊर्जाकेंद्रं (mitochondria) पेशीकेंद्राच्या बाहेरच्या द्रवात विखुरलेली असतात. त्यांच्याकडे त्यांची स्वायत्त जनुकं (mtDNA) असतात. 'आदिमायेच्या लेकरां'बद्दल बोलताना आपण पाहिलं, की ही जनुकं फक्त आईकडून मुला-मुलींना मिळतात. ऊर्जाकेंद्रांत अनेक रासायनिक प्रक्रिया होत असतात. कित्येक घातक रसायनांचे हल्ले या मातृजनुकांना सतत इजा पोचवत असतात. त्यामुळे मातृजनुकांमधल्या पालटांचं प्रमाण केंद्रातल्या जनुक-पालटांच्या प्रमाणाच्या दहा ते वीस पट अधिक असतं. त्यातून ही मातृजनुकं पेशीकेंद्राच्या बाहेर असतात आणि पेशींच्या विभाजनात भाग घेत नाहीत. त्यामुळे केंद्रातल्या अशा पालटांवर डोळ्यांत तेल घालून नजर ठेवणारे जे DNA-पोलीस असतात, त्यांचा या बाहेरच्या ऊर्जाकेंद्रांतल्या जनुक-पालटांवर (mutations) वचक नसतो. हे अनिर्बंध पालट साठत जातात. विशेषतः मज्जापेशी, हृदयाच्या स्नायूंच्या पेशी यांमध्ये या पालटांची गर्दी होते. परिणामी, तिथली ऊर्जाकेंद्रं निकामी होतात आणि पेशी ऊर्जाहीन, हतबल आणि म्हाताऱ्या होतात. या प्रक्रियेची गती मूळ मातृजनुकांच्या प्रकारावर अवलंबून असते का, हे पाहण्यासाठी जपान आणि युरोपमध्ये अनेक सर्वेक्षणं झाली. तिथल्या शतायुषी लोकांत काही मातृजनुकं प्रकर्षानं अधिक प्रमाणात आढळली. त्यावरून मातृजनुकांच्या प्रतवारीवर वार्धक्याची वाटचाल अवलंबून असावी असं वाटतं.

काही प्रथिनं अनेक जनुकांच्या कामावर नियंत्रण ठेवतात. या प्रथिनांच्या हुकुमान्वये DNAचे काही वार्धक्यजनक भाग कॉपी न काढता, उपेक्षित ठेवले जातात. विशिष्ट भागांची अशी उपेक्षा झाल्यानं किंवा त्या भागांना गप्प बसवल्यानं जीवनमान वाढतं. ही sirtuins नावाची प्रथिनं चिलटं, उंदीर यांच्यातही असतात आणि मानवी पेशींतही आहेत. या प्रथिनांची जनुकं (SIR = silent information regulator) उपासमारीनं जागी होतात. खडतर परिस्थिती अनुभवणाऱ्या कित्येक वनस्पती Resveratrol नावाचा एक रासायनिक पदार्थ तयार करतात. हा पदार्थ लाल द्राक्षांच्या सालीत आढळतो. त्या द्राक्षांपासून बनवलेल्या लाल रंगाच्या वाइनमध्येही तो असतो. हा पदार्थ उंदरांना दिला, की त्यांची SIR जनुकं चाळवली जातात आणि त्यांचं आयुष्य वाढतं. ही जनुकं मुळातच अधिक

प्रमाणात लाभलेले उंदीरही औक्षवंत असतात. चिलटांमध्ये मात्र ही जनुकं फारशी प्रभावी नाहीत. Sirtuinsच्या निरीक्षणामुळे अशा resveratrol सारख्या आधुनिक च्यवनप्राशांना बाजारात चलती आली. पण माणसांत अद्याप त्यांचा हवा तेवढा फायदा दिसून आलेला नाही.

इन्सुलिनचं स्वागत करायला नेमलेला IGF-1R नावाचा जो पेशींमधला दरवान चंगळवादी डंका पिटतो, त्याचे भाऊबंद चिलटांत, उंदरांत, जंतांतही तेच काम करतात. सगळ्याच पेशींत हे दरवान सुटीवर गेले तर मधुमेह होईल. पण पेशीकेंद्रातल्या सगळ्याच जनुकांप्रमाणे तेही जोडी-जोडीनं काम करतात. या दरवान-जनुकांच्या दुक्कलीतलं एक नेहमीसारखं काम करत राहिलं आणि दुसऱ्यात जनुकपालट होऊन त्याची कार्यक्षमता घटली, तर मात्र मधुमेह न होता आयुष्य वाढतं. उंदरांमध्ये एक असाच दरवान फक्त चरबीच्या पेशींमध्ये काम करतो. त्यालाच तेवढा जनुकपालट करून निवृत्त केला तर उंदराचं आयुष्य वीस टक्क्यांनी वाढतं.

सांसर्गिक रोगांमध्ये किंवा संधिवातासारख्या आजारांत शरीराच्या वेगवेगळ्या भागांचा दाह (inflammation) होतो. या दाहामुळे पेशींतली घातक रसायनं वाढतात आणि कामकाज मंदावतं. याचा शरीरावर सार्वत्रिक परिणाम होतो आणि म्हातारपणाची लक्षणं लवकर दिसायला लागतात. काही प्रथिनं असा दाह भडकवायचं काम करतात. पथ्यकारक मिताहारानं या प्रथिनांचं प्रमाण घटतं. ही प्रथिनं निर्माण करणाऱ्या जनुकांमध्ये फेरफार झाले, की संधिवातासारख्या रोगांचा त्रासही कमी होतो आणि आयुर्मर्यादाही वाढते.

याउलट, दाहाला प्रतिबंध करणारी काही प्रथिनं असतात. अशाच एका उपकारक प्रथिनाचं जनुक (MIF) पालटलं तर दाह वाढून अकाली वार्धक्य येतं.

रुग्णांमध्ये मानवी मूत्रपिंडाचं रोपण केलं जातं तेव्हा रुग्णाची प्रतिकारशक्ती त्या नव्या मूत्रपिंडाशी झुंज देते. तसं होऊ नये, रोपण यशस्वी व्हावं यासाठी अशा रुग्णांना प्रतिकारशक्ती मवाळ करणारी औषधं दिली जातात. रॅपामायसिन हे त्यांपैकीच एक प्रतिजैविक आहे. ते घेणाऱ्या रुग्णांमध्ये कर्करोगाचं प्रमाण कमी झाल्याचं आढळलं. म्हणून त्या औषधाचे उंदरांवर अधिक प्रयोग केले गेले. उंदरांमध्ये कर्करोग तर कमी झालाच शिवाय त्यांचं वयोमानही लक्षणीय प्रमाणात वाढलं. या परिणामाचं जनुकीय स्पष्टीकरण शोधलं गेलं.

एक TOR नावाचं जनुक असतं. वर सांगितलेल्या (IGF-1R) दरवान-प्रथिनाच्या मदतीनं पेशींची वाढ करणं हे त्याचं नेहमीचं काम. हे जनुक रॅपामायसिनमुळे निष्प्रभ होतं. त्यामुळे दरवानाचं ते काम थबकतं. उपासमारीत जी जनुकीय परिस्थिती असते तशीच परिस्थिती निर्माण होते आणि आयुष्य वाढतं.

शिवाय, ज्या म्हाताऱ्या पेशींचं एरवी कर्कपेशीत रूपांतर झालं असतं त्यांच्या रंगसूत्रांमधल्या चुकांचं प्रमाण रॅपामायसिन-मुळे बरंच वाढतं. मग त्या जगूच शकत नाहीत आणि कर्कपेशी तयारच होत नाहीत. कर्करोगाचं प्रमाण घटतं. आता हे औषध कर्करोगावर उपाय म्हणूनही वापरलं जातं. मग ते आयुष्य वाढवायला देखील वापरता येईल का? हे अनुमान काढण्यापूर्वी त्याचा मुळातला उपयोग आठवायला हवा. हे प्रतिजैविक रुग्णांची प्रतिकारशक्ती कमी करतं. त्यांना सांसर्गिक रोगांची लागण सहज होते आणि रोग फोफावतातही बेफामपणे. त्या रुग्णांना तो धोका पत्करावाच लागतो. पण आयुष्य वाढवण्याच्या मोहानं, कारण नसताना सुखाचा जीव तसा दुःखात का लोटायचा?

> ‘कर्करोग एखाद्या विषवल्ली-प्रमाणे फोफावतो. या विषवल्लीचं बीज कुठून येतं, ते कसं आणि का रुजतं आणि त्याची पाळंमुळं कशामुळे शरीरात सर्वदूर फैलावतात हे समजून घ्यायला जनुकशास्त्राचा आधार घ्यावा लागतो. या साऱ्या समस्यांचा जनुकांशी काय संबंध? हे रुजणं मुळातच थांबवता येईल का? हे सारं आपण पुढच्या लेखात बघणार आहोत.’

दीर्घायुष्याचं गूढ उकलण्यासाठी ओळखीच्या जनुकांवर तर प्रयोग झालेच, शिवाय अनोळखी जनुक-‘कचऱ्या’तल्या ‘स्निप’ नावाच्या एकाक्षरी फेरबदलांचा म्हणजेच जनुक-ठशांचाही ताळा झाला. घराण्यांच्या आनुवंशिकतेचा तपास झाला, समाजातून माणसांचे सरसकट नमुने उचलून त्यांचाही अभ्यास झाला. मातृ-पितृजनुकांच्या गटांचा वेध घेतला गेला. त्यातून बरेच ‘मा’चे ‘ध’ झालेले आढळले. यामुळे ज्ञान वाढलं, हे नक्की. पण त्याचा वापर करून माणसाचं आयुष्य वाढवायचा प्रयत्न अद्याप झालेला नाही.

यात काही मोठ्या अडचणी आहेत. जंतांवरच्या प्रयोगांचे निष्कर्ष मानवी जीवनावर लादणं चुकीचं आहे. जंतांची हाडं मोडत नाहीत, त्यांना न्यूमोनिया किंवा हृदयरोग होत नाही आणि बुद्धिभ्रंश तर नाहीच नाही. जंतांतली जनुकं आणि प्रयोगशाळेत जोपासलेल्या मानवी पेशींतली जनुकं सारखी असतीलही. पण संपूर्ण मानवी शरिराच्या गुंत्यात त्याच जनुकांची वागणूक साफ वेगळी असू शकते. ते समजून घेण्याच्या दिशेनं सध्या विज्ञानाची घोडदौड चालू आहे.

इन्सुलिनचा शोध लागल्यापासून मधुमेह झालेल्या रुग्णांचं आयुष्य वाढलं. त्यानंतर कित्येक मधुमेही शास्त्रज्ञांना नोबेल पारितोषिकाचा मान मिळाला. उत्क्रांतीच्या दृष्टिकोनातून स्वतः जगायला सक्षम नसलेले ते लोक जगाला अधिक सक्षम बनवत अधिक काळ जगले. उत्क्रांतिवादाची तत्त्वं माणसानं हाणून पाडली. आजची मानवजात इतर सर्व प्राण्यांहून वेगळ्या प्रकारे जगते आहे. ती समाजात

राहते. वन्य श्वापदं, थंडी-वारा-ऊन-पाऊस, खरीखुरी उपासमार या गोष्टींची इतर प्राणिमात्रांना जशी बाधा होते तशी ती मानवाला होत नाही. स्वच्छता, प्रतिबंधक उपाय आणि प्रतिजैविकं यांमुळे सांसर्गिक रोगांची भीतीही कमी झाली आहे. सगळ्या मानव-वर्णांची (races) वाढती मिसळण, आंतरवर्णीय रोटीबेटी व्यवहार आणि आरामाचं सुरक्षित जिणं यांमुळे इथून पुढे उत्क्रांतीला ध्येय राहिलेलं नाही. मानवी जनुकांच्याही वागणुकीतून उत्क्रांतीचं उद्दिष्ट हळूहळू बाद होत जाईल. याच कारणांमुळे 'ज्याचेसाठी होतो आहे अट्टहास' ते दीर्घायुष्य आपसूकच पदरात पडलं आहे. नव्या सहस्रकात प्रगत देशांत जन्मलेली पन्नास टक्के मुलं शतायुषी होतील असं भविष्य सामाजिक संख्याशास्त्रज्ञांनी वर्तवलं आहे.

पैशामुळे वैद्यकशास्त्रातल्या अद्ययावत शोधांचा फायदा मिळतो तर शिक्षणामुळे आलेलं सामंजस्य आणि विज्ञानाची समज यांमुळेही दीर्घायुष्याला हातभार लागतो. त्यामुळे सुशिक्षित आणि श्रीमंत माणसं अधिक जगतात. परिणामी, सध्याच्या जगात ऐंशीहून अधिक वयाच्या करोडपतींची संख्या मोठी आहे. त्यांचं जीवन आखीव असलं तरी आनंददायी आहे. त्यांना पुढे जगत राहायची, तरुण राहायची इच्छा आहे. त्यामुळे जागतिक मंदीच्या काळातही आधुनिक च्यवनप्राश शोधण्यासाठी भरपूर पैसा उपलब्ध होतो आहे. यौवनाच्या मोहानं भल्याभल्यांची बुद्धी भ्रष्ट होऊ शकते. म्हणून हे संशोधन बेशिस्त, बेलगाम होण्याची शक्यता आहेच.

तरीही काही मोठ्या आणि नामांकित संस्थांमधून नेमस्तपणे योग्य तेच संशोधन चाललेलं आहे. जनुकांशी खेळ करून चिरतारुण्य किंवा अमरत्व मिळवणं हे फार दूरच्या भविष्यातलं अद्‌भुत स्वप्न आहे. आता नुकती कुठे आपली जनुकांशी तोंडओळख होते आहे. त्यांची कामं समजून घ्यायची आहेत. या जीवनाच्या प्रोग्रॅममध्ये गुंतागुंत असली तरी बिनचूक संतुलन आहे. कसलाही गाजावाजा न करता, एका पेशीची किंवा वंशाचीच नव्हे, तर साऱ्या जीवसृष्टीच्या भवितव्याची काळजी त्यात घेतलेली आहे. या साऱ्याचं ज्ञान करून घेणं आणि त्यातल्या दिव्यत्वाच्या प्रचीतीनं दिपून जाणं, इतकंच सध्या मानवाचं कर्तव्य आहे.

कठोपनिषदात एका अकाली प्रौढ झालेल्या मुलाची, नचिकेताची गोष्ट आहे. तो वयाने आणि शरीरानंही बाळच होता. पण त्याची बुद्धी थोर होती. जिवंतपणी यमधर्माला सामोरा ठाकलेल्या नचिकेताने, फक्त आपली जिज्ञासा भागवून घेतली, चिरतारुण्य मागितलं नाही. त्या परिपक्व बुद्धीच्या बाळाकडून आजघडीला मानव तेवढंच शिकला तरी पुरेसं आहे.


**डॉ. उज्ज्वला दळवी**
Ujjwalahd9@gmail.com

## नवे प्रकाशन

# आठवणींच्या जगात

**जर्मनीतील तीन तपांचा अनुभव**

**निरुपमा प्रधान-सोनाळकर**




''भारतीयांना जर्मनीविषयी कुतूहल आहे, पण तेथील जीवनाविषयीची माहिती मात्र फार नाही. निरुपमा प्रधान या सोनाळकर झाल्या नसत्या तर कदाचित त्यांचाही जर्मनीशी इतका जिव्हाळ्याचा संबंध आला नसता. गजबजलेल्या मुंबईतून हॅम्बुर्गजवळील ल्युनेबुर्गमध्ये जाऊन तेथे संसार थाटायचा, हेच एक आव्हान होते. निरुपमा यांनी मात्र सुरुवातीला खाणाखुणा, हावभाव अशा माध्यमातून, नंतर मोडक्या-तोडक्या जर्मन शब्दांमधून आणि शेवटी अस्खलित जर्मन भाषेतून तो अवघा देश मनाने पादाक्रांत केला. त्या पस्तीस वर्षांच्या काळात निरुपमा प्रधान-सोनाळकर या आपल्या देशाच्या 'अनभिषिक्त' राजदूत म्हणूनच तेथे वावरल्या.जीव की प्राण असलेले बॅडमिंटन सोडून हे नवीन जीवन त्यांनी स्वीकारले होते. आपणहून नव्हे, तर नियतीच्या प्रवासात जर्मनी नावाचे 'स्टेशन' लागल्यावर. त्यानंतर मात्र ट्रॅव्हल-टूर्सच्या माध्यमातून कितीतरी अधिक 'स्टेशन्स' निरुपमाबाईंनी घेतली. एकामागोमाग लहान-मोठे किल्ले सर करावे त्याप्रमाणे त्यांनी मॉस्को असो वा ब्रिस्बेन, टोरोंटो असो वा जकार्ता, खाटमांडू असो वा थिंपू (भूतान) असे सर्व देश 'जिंकले'! भारत तर त्यांचाच होता.जर्मनीचे अंतरंग उलगडणाऱ्या निरुपमा सोनाळकरांच्या या 'आठवणींच्या जगात' खरोखरच इतके जग त्यांनी सामावले आहे, की वाचक थक्क व्हावा.''

**- कुमार केतकर**

**मूल्य ३०० रुपये • सवलतीत १८० रुपये**

# सांस्कृतिक मेन्टॉर

## प्रवीण बर्दापूरकर

१९७१ साली पहिल्यांदा आलो तेव्हा दोन दिवस मनसोक्त भटकलो आणि नागपूर आवडलं. नंतर विश्व युवक केंद्राच्या एका कॅम्पसाठी पुन्हा नागपूरला आलो. १५ दिवस राहिलो. आताचं आमदारनिवास तेव्हा नवंकोरं होतं, तिथंच मुक्काम होता. नागपूर जामच आवडलं. दरम्यान, वाचनाला दिशा सापडली होती. अनिल, मुक्तिबोध, कोलते हे नागपूरकर असल्याचं वाचताना तेव्हा कळलं. वाणिज्य शाखेत आणि नंतर ग्रंथालयशास्त्र शिकताना, म्हणजे आणीबाणीपूर्व आणि लगेच नंतरच्या काळात सुरेश भट, ग्रेस, यशवंत मनोहर, महेश एलकुंचवार यांचं लेखन वाचनात आलं. याच दरम्यान केव्हातरी भोळेही नागपुरात पोचलेले होते. ज्या शहराचे 'सांस्कृतिक मेन्टॉर' इतके प्रतिभावंत, विचारवंत, सर्जनशील असतात ते शहर साहित्य-कला-संस्कृतीच्या पातळीवर किती श्रीमंत असेल, याचं आकर्षण वाटू लागलं आणि संधी मिळताच नागपुरात डेरेदाखल झालो. 'नागपूर पत्रिके'तले दिवस सुरू झाले.

याच दरम्यान केव्हातरी एलकुंचवारांचं 'खूप शहाणे दु:ख फार पीळ पाडते' हे वाक्य मनाच्या तळात खोलवर रुजलं. वर उल्लेख केलेल्या सर्वांच्या भेटी झाल्या, अपवाद होता एलकुंचवारांचा. तेव्हा ते धरमपेठ महाविद्यालयात शिकवायचे, पण फक्त शिकवायचेच! कोणात मिसळायचे नाहीत, असं कळलं. त्यांना काही वेळा स्कूटरवरून फिरताना पाहिलं. ती लॅम्ब्रेटा स्कूटर होती. ते विमानानं प्रवास करतात अशी असूयापूर्ण चर्चा तेव्हा साहित्य संघात चालायची! एकदा शंकरनगर चौकातून श्रीराम लागू आणि एलकुंचवार यांना जगाचं भान विसरून गप्पा मारत जाताना पाहिलं.

याच दरम्यान दूरदर्शनवर 'पार्टी' दाखवला गेला. 'पार्टी'तही एलकुंचवारांचं दर्शन झालं. एक दिवस सगळा धीर एकवटून टेलिफोन डिरेक्टरीतून नंबर शोधून काढला आणि एलकुंचवारांना सरळ फोन लावला. ओळख सांगितली आणि भेटीसाठी वेळ मागितली.

'काय काम आहे. मी मुलाखत वगैरे देणार नाही.' एलकुंचवार शुष्क स्वरात म्हणाले.

'काम काहीच नाही, नुसतं भेटायचं आहे.' अस्मादिकांनी सांगितलं.

'ठीकय, उद्या दुपारी ४ वाजता या आणि...' एक पॉझ घेऊन एलकुंचवार पुढे म्हणाले, 'वेळ पाळणारी माणसं आवडतात मला.'

'मलाही.' कारण नसताना मी अगाऊपणा केला. भेट झाली. पहिल्या भेटीत विशेष काही घडलं नाही.

पुढे अधूनमधून भेटत राहिलो. माझ्याशी ते 'अहो-जाहो'वरून 'अरे-तुरे'वर आले. एकदा, ते रशियात 'वाडा'संस्कृतीसंबंधी बोलण्यासाठी जाणार होते, तेव्हा त्यांनी आवर्जून बोलावून ते प्रयोजन सांगितलं.

'बातमी करू का', मी विचारलं तर म्हणाले, 'तुला वाटत असेल तर कर. मला मात्र गरज वाटत नाही.'

मग नागपूर सोडून मुंबई-औरंगाबाद हा माझा प्रवास होण्याआधी एलकुंचवारांशी अधूनमधून भेटी होत राहिल्या पण, त्यात विशेष असं फार काही घडायचं नाही. एक मात्र जाणवलं, नागपूरकरांनी या माणसाला दंतकथेत गुरफटवून टाकलंय.

मुंबई-औरंगाबादला राहून साडेसहा-पावणेसात वर्षांनंतर मार्च २००३ मध्ये पुन्हा नागपूरला परतलो.

पुन्हा भेट झाली. 'मी प्रवीण बर्दापूरकर' मी ओळख करून दिली.

'अरे वा! नाव तेच अजून' एलकुंचवार म्हणाले आणि मधली न भेटीची वर्षं गळून पडली. भेटीगाठी नियमित सुरू झाल्या तरी व्यक्तिगत कोणतंच शेअरिंग नव्हतं, आजही नाही. तरीही आम्ही बऱ्याचदा भेटतो. चहाला, ब्रेकफास्टला, जेवायला. कधी निव्वळ भेटायचं म्हणून भेटतो पण, ते महत्त्वाचं नाही. त्यावेळी होणाऱ्या गप्पा महत्त्वाच्या.

प्रत्येक वेळी या गप्पा गंभीरच असतात, असं नाही. टवाळक्याही असतात.

महत्त्वाचं म्हणजे, स्वत:ची टवाळकी करण्यात एलकुंचवार पुढाकार घेतात. गप्पात आपलं आडनाव कोणाला कसं नीट उच्चारताच येत नाही, याची छान नक्कल ते करतात किंवा एखाद्या ठिकाणी त्यांचा चिवडा कसा झाला, हे रंगवून सांगतात तेव्हा पटतं हा माणूस रसाळही आहेच की!

एलकुंचवार अलीकडे रात्री ९ वाजता झोपतात. हे त्यांनीच सांगितलं, पण 'मौज'च्या दिवाळी अंकातला 'नेक्रोपोलीस' हा त्यांचा

लेख वाचून संपवला तर, पावणे दहा-दहा झाले असावेत. मी फोन केला. त्यांनी फोन उचलला.

'सर, रागावू नका झोपमोड केल्याबद्दल' अशी सुरुवात करून मी त्या लेखासंबंधी ४/५ मिनिटं बोललो आणि एकदम ब्लँक झालो.

'झालं तुझं बोलून, झोपू मी आता?' असं विचारून एलकुंचवारांनी फोन बंद केला.

मग 'मौनराग' वाचनात आलं.

लेखणीला कांचनाचे बहर येतात म्हणजे काय होतं, याचा अनुभव आला. 'नेक्रोपोलीस' आणि 'मौनराग'चा मी प्रचारकच झालो.

याच दरम्यान एलकुंचवार माणूस म्हणून समजत गेले, तुकड्या-तुकड्यात, पण ते अख्खे किंवा बऱ्यापैकी समजले आहेत, असा माझा दावा नाही. आम्ही अनेकदा भेटतो, गप्पा मारतो आणि हा माणूस आणखी आणखी उलगडत जातो. या भेटीत त्यांच्या लेखनाला आलेले कांचनाचे बहर उजळतात. डोळे दीपवून टाकणारा तो प्रकाश नसतो तर, आपल्या जाणिवा उजळवणारा असतो.


एलकुंचवार सांगतात ते आपल्याला का सुचलं नाही, असा प्रश्न मग पडतो. मधला एक प्रसंग, 'गिरीश गांधी हा माणूस जगाचं कौतुक करतो, याचं कौतुक कोण करणार? आपली जबाबदारी नाही ती?' एलकुंचवार म्हणाले.

शोध घेतला तर लक्षात आलं गिरीश गांधींची साठी तर उलटली. मग एकसष्टीचा कार्यक्रम आम्ही केला. त्यासाठी स्थापन केलेल्या समितीची यादी करताना एलकुंचवारांच्या नावापुढे नेहमीप्रमाणे 'प्रा.' लिहिलं तर ते म्हणाले, 'आता मी कुठे प्राध्यापक आहे, नोकरीतून निवृत्त नाही का झालो?'

आम्ही निरुत्तर झालो. 'सतत काही ना काही शिकायला मिळतं तुमच्याकडून', हे सांगणंही विसरून गेलो.

गिरीश गांधी एकसष्टी सत्कार समितीचे एलकुंचवार अध्यक्ष. समितीच्या बैठका वेळेवर सुरू करणार आणि संपवणारही. एलकुंचवार निर्णय जाहीर करणार ते जजमेंट डिलिव्हर केल्यासारखं, म्हणजे अपील करण्याचा स्कोप नाहीच! कामाची जबाबदारी सोपावताना एखादा 'पंच' येणार त्यांच्या बोलण्यात. म्हणजे कसा, तर एलकुंचवारांना एका विद्यापीठातर्फे सरस्वतीचं एक सन्मानचिन्ह देण्यात आलं, पण त्या सरस्वतीचा चेहरा हनुमानासारखा! ते दाखवत एलकुंचवार म्हणणार, 'विवेक, हे असं फिशी काही नको रे बाबा!' विवेक म्हणजे विवेक रानडे.

भाषेतलं एलकुंचवारांना इतकं काही माहिती आहे, की ते बोलत असताना प्रत्येक वेळी नवनवीन काहीतरी कळतं. गेलाबाजार एखादा तरी नवा शब्द गवसतोच. हे काही केवळ गवसणं नसतं तर त्या सांगण्याला एक लय असते, विलक्षण मेलोडियस अशी. या माणसाला इतकं काही माहिती आहे की जे आपल्या आकलनाच्याही कक्षेत येत नाही. खोल हरवलेल्या भावनांना शब्द देणारे एलकुंचवार, एक दिवस आम्ही आयएमएच्या पोर्चमध्ये उभे असताना, ट्रकमधून



उतरवल्या जाणाऱ्या मूर्ती बघून, मूर्तिशास्त्र आणि त्या मूर्तीतून ध्वनित होणाऱ्या अर्थाविषयी बोलू लागले. स्त्री देहाचं वर्णन एलकुंचवार करत होते, पण त्यात गोंडस निरागसता होती!

मी जे काही लिहितोय ते एलकुंचवारांना आवडेलच असं नाही, पण हे एकदा लिहायलाच हवं. प्रतिभावंत लेखक असो की कलावंत; तो स्वत:च्या सर्जनशीलतेच्या प्रेमात पडण्याचा धोका जितका जास्त असतो त्यापेक्षा कितीतरी पट जास्त धोका तो स्वत:च्या प्रतिमेच्या प्रेमात बुडण्याचा असतो. (एक वेळ प्रतिभावंतानं स्व-निर्मितीच्या प्रेमात पडणं नाइलाजानं का होईना मान्य, कारण ती निर्मिती म्हणजे सर्जनशीलता असते; मात्र स्वत:च्या प्रतिमेच्या प्रेमात पडणं खूपच धोकादायक, त्या लेखकातली सर्जनशीलता संपवणारं असतं ते) स्वत:च्या प्रतिमेच्या प्रेमात पडून संपलेले प्रतिभावंत अनेक आहेत.

एलकुंचवारांमधला प्रतिभावंत मात्र जमिनीवर पाय घट्ट रोवून आहे. म्हणजे कसं, तर त्यांच्या दृष्टिकोनातून भाषा, व्याकरण या बाबतीत दिवाकर मोहिनी आणि भास्कर लक्ष्मण भोळे प्रमाण (आता भोळे नाहीत) हे बरोबर किंवा चूक, असं या दोघांपैकी कोणी म्हणालं की, एलकुंचवार ते निमूटपणे ऐकतात, कोणताही प्रतिवाद करत नाहीत.

पु. ल. देशपांडेंच्या नावाचा पुरस्कार जाहीर झाल्यावर मी एक व्यक्तिवेध एलकुंचवारांवर लिहिला. त्यात त्यांचा 'सरस्वतीपुत्र' असा उल्लेख केला. त्यांच्या आईचं नाव सरस्वती आहे, हे मला माहीत नव्हतं, पण तो उल्लेख त्यांना 'सेन्टिमेन्टली' आवडला, हे मोकळेपणे सांगण्याचा उमदेपणा त्यांच्यात आहे. एकदा अशाच गप्पा सुरू असताना या

व्यक्तिवेधाचा विषय निघाला तेव्हा एलकुंचवार म्हणाले, 'चांगलं लिहायला लागलायस तू. समंजसपणा आलाय तुझ्या लेखनात.'

मी विलक्षण संकोचलो आणि म्हणालो, 'तुमच्यासारख्या प्रतिभावंतानं असं म्हणणं म्हणजे इट्स माय डे.'

पटकन् एलकुंचवार म्हणाले, 'नागपुरात प्रतिभावंत एकच, तो म्हणजे ग्रेस आणि लक्षात ठेव, प्रतिभा ही चिरस्थायी नसते. आपल्याला लिहिणं चांगलं जमतंय, असंच माझं मला माझ्या लिखाणाविषयी वाटतं.' हे बोलताना इतका प्रांजळपणा त्यांच्या चेहऱ्यावर होता, की वाटलं, स्वत:बद्दल स्फटिकासारखं असणं हे असंच असतं. हे असं असणं लोकांना बहुसंख्येनं कठोरपणाचं वाटू शकतं. कारण, ते सर्वसामान्यपणे परिचित नसतं.

एखाद्यावर एखादा शिक्का मारून मोकळं होणं ही आपली खासियत. त्यामुळे एलकुंचवारांना आपण वज्रकठोर दंतकथा बनवून टाकलं. एखादं लेखन आवडलं की ते करणाऱ्याच्या वाट्याला एलकुंचवारांचं कौतुक येणारच.

मी 'लोकसत्ता'च्या नागपूर आवृत्तीचा संपादक असताना दासू वैद्यचा 'मराठवाडा वृत्तांत'मधला एक लेख आम्ही विदर्भ वृत्तांतमध्ये पुन:प्रकाशित केला. विदर्भात आम्ही लेखकांचा संपर्क क्रमांक देत असू, त्याप्रमाणे दासू वैद्यचाही प्रकाशित केला. एलकुंचवारांना दासूचा लेख जाम आवडला. त्यांनी लगेच दासूला फोन केला, कौतुक केलं, त्याचं काय काय वाचलं वगैरे सांगितलं आणि दासूला धक्काच बसला.

एलकुंचवाराचं तसं काही लक्ष असतं अशी प्रतिमाच कोणी होऊ दिलेली नाही, त्यांना चिरेबंदी वाड्यात बंद करून ठेवलं गेलंय. अनावर दासूचा मला फोन आला. 'हा नंबर खरंच एलकुंचवार सरांचा आहे?' त्यानं विचारलं आणि काय घडलं ते धाडधाड सांगितलं.

'डायरी'तला 'बिटविन द लाईन' हा मजकूर वाचल्यावर माझ्याबाबत बोलताना एलकुंचवार इतके हळवे झाले की त्यांना कसं थांबवावं हेच कळेना. म्हणूनच एलकुंचवारांना ओळखणाऱ्या आमच्यासारख्या काहींना त्यांचं दासूशी स्नेहार्द्र वागण्यात काही अप्रुप वाटणं शक्यच नव्हतं. एलकुंचवारांचं हे असं निर्मळ कौतुक आमच्या वाट्याला अनेकदा येतं.

अनेक कार्यक्रमांत ते खरं तर एखाद्या आज्ञाधारक श्रोत्यासारखे बसलेले असतात. एलकुंचवार सहसा पहिल्या रांगेत बसत नाहीत. ४-५ रांगा सोडून, वर पंखा वगैरे नीट बघून आपण जशी जागा शोधतो तशीच जागा तेही शोधतात. फारच बोअर झालं तर एखाददुसरी कॉमेन्ट हळू आवाजात शेअर करतील. अन्यथा, व्यासपीठावर जे सुरू असतं ते सहन करण्याची त्यांची तयारी असते. कार्यक्रम उशिरा सुरू होण्याबद्दलची नाराजी, चूक, शब्दोच्चाराबद्दल नापसंतीचा हुंकार वगैरे वगैरे ते छान एन्जॉय करत असतात. याचं खरं तर कौतुक वाटायला हवं आपल्याला, पण बहुसंख्य त्यांच्या उपस्थितीचं दडपण घेतात आणि मग त्यांचा एकूणच सगळा 'चिवडा' होतो.

एकदा मुंबईत यशवंतराव चव्हाणच्या कट्ट्यावर असाच विषय निघाला तर मी सांगितलं, एलकुंचवार तर बुवा एकदम छान नॉर्मल वागतात आणि दोनच दिवस आधी अरुण साधू यांच्या सत्कारात आम्ही कसे त्यांच्यासोबत श्रोत्यात बसलो होतो, हे सांगितलं तर एक नाटुकला चक्क चक्कर येऊन पडला! प्रतिभावंतानं, विचारवंतानं, सेलिब्रिटीनं आत्ममग्नच राहिलं पाहिजे आणि आत्मप्रबळच वागलं पाहिजे, अशी धारणा आपली असते. आपल्या धारणेप्रमाणे तो वागला तरी प्रॉब्लेम आणि नाही वागला तरी प्रॉब्लेमच, असा हा संभ्रमाचा चिवडा! पण, हे असं संभ्रमातलं काहीच एलकुंचवारांना स्पर्शत नाही. ते आपलं छान आपल्याशी बोलत राहतात.

असंच मी एकदा म्हणालो, 'तुम्ही किती छान बोलता, वागता.'

तर एलकुंचवार म्हणाले, 'अरे, मला तर लोक शिष्ट म्हणतात.'

'काहींना वाटत असेल तसं, पण तुम्ही जर त्यांना शिष्ट वाटत असाल तर हा शिष्टपणा तुम्हाला शोभतो, एखाद्या अलंकारासारखा.'

त्यावर एलकुंचवार म्हणाले, 'हे छान आहे.'

मी म्हणालो, 'हेच छान आहे.' आणि त्यांनी ते (बहुधा) मान्य केलं.

एलकुंचवारांची हस्तलिखित कॉपी एकदाच पाहायला मिळाली. भास्कर लक्ष्मण भोळे यांनी इंतजार हुसैन या पाकिस्तानी लेखकाच्या कथांचा मराठीत अनुवाद केलेला 'मोरनामा आणि इतर कथा' या कथासंग्रहाचं परीक्षण एलकुंचवारांनी केलं आणि ते 'लोकसत्ता'त प्रसिद्धीसाठी दिलं. आठ फूलस्केप कागदांवरचा तो मजकूर आखीवरेखीव. टपोऱ्या अक्षरांचं वळण एखाद्या मूर्तिकारानं शिल्प सजीव साकारावं तसं. पहिल्या ओळीतल्या पहिल्या अक्षरापासून शेवटच्या ओळीतल्या शेवटच्या अक्षरापर्यंत एका आकाराच्या, चिरेबंदी रचना केल्यासारखा तो मजकूर लिहिलेला. एकदम परफेक्शन. त्या लेखाच्याही प्रती मग मी सर्व ज्येष्ठ आणि कनिष्ठ सहकाऱ्यांना पाठवून दिल्या. कॉपी कशी असावी ही चर्चा मग आमच्याकडे बहरलेली राहिली.

एलकुंचवारांच्या एका अज्ञात गुणाविषयीही लिहायला हवं; त्यांना आवडत नसलं तरी.

राम शेवाळकर गेले तेव्हा त्यांच्या अंत्ययात्रेसाठी आम्ही जमलो होतो घाटावर. ती संध्याकाळ आणि घाटावर मरण दाटून पसरलेलं होतं. बोलता बोलता एलकुंचवारांनी राम इंगोले, जिमी राणा आणि त्यांचं काम याविषयी चौकशी सुरू केली. त्यांच्या प्रकल्पांना भेट देण्याची इच्छा व्यक्त केली. कर्करोगानं मरणाच्या वाटेवर असणाऱ्या, आर्थिक परिस्थितीमुळे उपचार न परवडणाऱ्या रुग्णांवर नि:शुल्क उपचार करण्याचा, थोडक्यात, आयुष्याचा सुखान्त करण्याचा 'स्नेहांचल' हा प्रकल्प जिमी राणा चालवतात, तर वेश्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी राम इंगोलेंनी स्वत:चं आयुष्य उधळून टाकलेलं आहे. अशात दगडाच्या खाणीवर काम करणाऱ्या मजुरांच्या मुलांच्या शिक्षणासाठीही इंगोलेंनी काम सुरू केलंय. 'आता आवरासावर करायला हवी आहे, त्याची नीट विल्हेवाट लावायला हवी' असं

एलकुंचवार म्हणाले.

त्यावर मी गमतीनं म्हणालो, 'त्यापेक्षा मला दत्तक घ्या की!'

'नको' ठाम स्वरात एलकुंचवार म्हणाले, 'तू उद्याच मला घराबाहेर काढशील.' आणि मग त्यांच्याजवळ आहे ते वाटून टाकण्याविषयी एलकुंचवार गंभीरपणे बोलू लागले.

तो विषय संपवताना त्यांनी दम दिला. 'हे कुठं बोलू नकोस.'

याच दरम्यान नागपूर शहराच्या स्थापनेला १०० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल देण्यात येणारा १ लक्ष रुपये रोख असलेला नागभूषण सन्मान एलकुंचवारांना जाहीर झाला. एक दिवस सकाळी एलकुंचवारांनी फोन करून बोलावलं. त्यांना 'स्नेहांचल'मध्ये जायचं होतं. 'कुणाला सोबत आणू का?' विचारलं तर ठाम 'नाही' म्हणाले. आपण फोटो तरी काढून घेऊ या मी सुचवले पण एलकुंचवारांनी विचारलं, 'तू गूपचूप येतोस का एकटा जाऊ मी?' सरळ आम्ही दोघं 'स्नेहांचल'मध्ये पोचलो. एलकुंचवारांनी जिमी राणाला ५० हजारांचा चेक दिला. हॉस्पिटलचं काम पाहिलं आणि निघताना म्हणाले, 'ही मदत करणारा मी नाही; मी पोस्टमन आहे. जमलं तर पुन्हा भेटूच.' दुसऱ्या दिवशी सकाळी राम इंगोलेंच्या विमलाश्रमलाही ५० हजार रुपयांचा चेक, साधा फोटोही काढू न देता, त्यांनी देऊन टाकला!

मी निरुत्तर झालो. दातृत्वाची दोन ओळींचीही बातमी एलकुंचवारांनी देऊ दिली नाही. मी त्यावर कुरकूर केली तर एलकुंचवार म्हणाले, 'समाजानं जे दिलं ते पुन्हा समाजाला परत केलं, त्याचं कसलं कौतुक?' एलकुंचवारांचं भलं मोठं दातृत्व कायम अंधारातचं राहिलं. त्यांना नीट समजून न घेता आपण त्यांना वेगळ्याच चौकटीत बंद केलं हेच खरं!

सरस्वती सन्मानानंतर एलकुंचवारांचं नाव राज्य सरकारच्या शिष्टाचार यादीत आलं. शासनाचा शिष्टाचार म्हणजे किमान सुसंस्कृतपणा-सभ्यपणा आणि अचूक शिक्षण यांपासून हा शिष्टाचार नावाचा प्रकार शेकडो कोस दूर असतो. एलकुंचवार कोण, ते नाटककार आहेत म्हणजे काय, लेखकाची प्रतिभा कशाशी खातात वगैरे सेन्सचा, या यादीशी आणि ती तयार करणाऱ्या महामानव कारकुनाशी काहीच संबंध नसतो. शासकीय कार्यक्रमाची निमंत्रणं एलकुंचवारांना त्यांच्या महाविद्यालयाच्या पत्त्यावर जात, तेव्हा 'शिक्षकीपेशातून एलकुंचवार निवृत्त झाले' असा शेरा मारून सरकारदरबारी पुन्हा परत येत! असं बऱ्याच कार्यक्रमांबाबत घडलं. एक दिवस धनंजय देवधरच्या पाहण्यात ती यादी आली. धनंजयला दहा हजार व्होल्टचा शॉक बसला. कारण एलकुंचवारांचं नाव लिहिलेलं होतं 'महेश एल. कुंचवार!' एलकुंचवार आडनावातली एल ही दोन अक्षरं कारकुनाला कोणा महेश नावाच्या माणसाच्या वडिलांचं इनिशियल वाटलं होतं! धनंजय देवधरनं मग चिकाटीनं शासकीय सोपस्कार पूर्ण करायला लावून 'एल' आणि 'कुंचवारांना' एकत्र आणलं!

एलकुंचवारांना भेटणं हा एक नीटनेटका, अभिजात्य अनुभव असतो. भलत्या पँटवर भलता सदरा, चुरगाळलेले कपडे असं विस्कटलेपण किंवा पारोसेपण एलकुंचवारांत नसतं. स्वच्छ, परीटघडीचे कपडे, परफेक्ट मॅचिंग, मंदसा परफ्युम, असे प्रसन्न एलकुंचवार भेटतात तेही अगदी वेळेवर. भेटल्याबरोबर कोणाचा वेगळ्या परफ्युमचा गंध दरवळला तर चौकशी करणार. चारचौघांत बसल्यावर मोबाईल वाजला तर अगदी हळू आवाजात बोलणार. खाजगी वगैरे बोलायचं असेल तर 'एक्स्क्युज मी' म्हणून बाजूला जाणार... आणि असं न वागणाऱ्यावर एक जळजळीत कटाक्ष टाकणार.


वर्तमानात वावरणाऱ्या एलकुंचवारांना नोस्टॅल्जिक होणं जाम आवडतं. त्यांचं मन जास्त रमतं ते भूतकाळात. पारवा, परतवाडा आणि त्या परिसराशी अजूनही त्यांची नाळ जुळलेली आहे. हा परिसर आणि जगातलं असंच काही नोस्टॅल्जिक ते बोलू लागले की, 'या भवनातील गीत पुराणे...' आपल्यावर गारुड करत आहे, असं वाटू लागतं. आपणही त्यात रमतो आणि एलकुंचवार नावाचं भवन केवळ छानच वाटत नाही तर विलोभनीय वाटतं. त्याच्या विलोभनाच्या आभेत आपणही सामावून जातो.

एलकुंचवार नावाचा लेखक प्रतिभावंत आहे आणि माणूस असा विलोभनीय आहे, मनाच्या गाभाऱ्यात कायमचा मुक्कामाला येऊन दरवळत राहणाऱ्या सोनचाफ्यासारखा. सोनचाफ्याची आठवण झाली, की एलकुंचवार लेखक आणि माणूस अशा दोन्ही पातळ्यांवर भेटले नसते तर आपण बरंच काही 'मिस' केलं असतं, ही जाणीव मग आणखी गहिरी होत जाते...

('क्लोजअप'मधून साभार)

**प्रवीण बर्दापूरकर**
भ्रमणध्वनी : +९१ ९८२२०५५७९९
praveen_bardapurkar@hotmail.com
www.praveenbardapurkar.com

## वाचकदिनी प्रकाशित




**अजब सहवास**
**गो.आ. भट**

**मूल्य १०० रु.**
**सवलतीत ६० रु.**

# बोलक्या रंगांचा चित्रकार : ग.ना. जाधव

## प्रदीप गुजर

नेहरू सेंटर आर्ट गॅलरीत १९९५ पासून, 'इंडियन मास्टर आर्टिस्ट' ह्या शीर्षकाखाली, दरवर्षी एका महत्त्वाच्या चित्रकाराच्या कलाकृतींचे प्रदर्शन भरवून त्याच्याबद्दल आंदराजली वाहिली जाते. या स्तुत्य उपक्रमाबाबत नेहरू सेंटर आणि पर्यायाने उप-संचालक नीना रेगे व त्यांच्या चमूला धन्यवाद दिले पाहिजेत.

या वर्षी इंडियन मास्टर पेंटर जी.एन. म्हणजेच ग.ना. जाधव (जन्म १९१७ ते मृत्यू २००४) यांच्या सिद्धहस्त चित्रकृतींचे 'दर्शन' रसिकांसाठी सादर केले गेले. या कामी ग.नां.चे चित्रकार चिरंजीव प्रा. श्रीकांत जाधव, त्यांच्या पत्नी गीताताई आणि इतर कुटुबीयांनी मन:पूर्वक सहकार्य दिले.

'जी एन जे' असा तालबद्ध उच्चार असणाऱ्या व्यक्तीचे शिक्षण झाले फक्त चौथीपर्यंतचे. परंतु मूलत: असणारा उत्साही स्वभाव आणि चौकसपणा यातून सहजगत्या निर्माण झालेली सूक्ष्म निरीक्षणशक्ती या रसायनाने समोरच्या माणसांमध्ये ग.ना. जाधव जास्त रमत गेले. म्हणून त्यांनी अधिक प्रमाणात व्यक्तिचित्रे रेखाटली. त्यांच्या वृत्तीत सांस्कृतिकपणाचा डौल होता. त्यांनी नाट्यकला जोपासताना स्त्री पात्राच्या भूमिकाही केल्या आणि प्रगल्भतेचा अंश मनामध्ये सदैव जागृत असल्याकारणाने, आधीच्या आणि समकालीन असणाऱ्या कलेच्या प्रांतातील प्रत्येक व्यक्तीबद्दल आदरभाव राखला. ह्या सर्व गुणवैशिष्ट्यांमुळे त्यांच्या प्रत्येक रेखाटनात वास्तवता आपसूकच आली आणि रंगांचे नृत्य (फटकारे) बोलके होत गेले.

... ग.नां.ची चित्रे पाहताना हे सर्व जाणवले. नेहरू सेंटरने ग.नां.च्या कलेचा एक छोटेखानी, सत्तर पानी रंगीत कॅटलॉग छापला आहे. छपाई उत्तम आहे. त्यामुळे प्रिंटिंगचा उद्देश साध्य होतो. रंगसंगतींच्या आस्वादकतेत कुठेही बाध येत नाही. म्हणून नेहरू सेंटरच्या 'आर्ट गॅलरी'च्या चमूला खास धन्यवाद!


ग.ना. जाधव या आर्टिस्टच्या संदर्भात प्रथम मुद्दा जाणवतो तो म्हणजे कॅनव्हासवरचा तैलरंग असो, रंगलेपनासाठी चाकू वा ब्लेडचा उपयोग असो, जलरंग असो, चारकोल असो अथवा मिक्स मीडिया असो, प्रत्येक पद्धतीत 'सब्जेक्ट'मधला भाव-विभाव समान ताकदीने व्यक्त होतो, त्यातल्या बारकाव्यांनिशी व्यक्त होतो.

कॅनव्हासवर चितारलेले अब्बांचे तैलचित्र (कॅटलॉगमध्ये पान ४७) अत्युत्कृष्टच म्हणायला हवे. अब्बांची शरीरयष्टी, सुईत दोरा ओवताना बसण्याची पद्धत आणि विशेषत: एकाग्रतेचे चेहऱ्यावर उमटलेले भाव, वयस्कर चेहऱ्यातला खडबडीतपणा, उजेड असतानाची चष्म्याची आणि प्रामुख्याने सुई व दोऱ्याची आणि चाफेकळीचे बोट व अंगठा यात पकडलेला थोडासा बाहेर आलेला धागा या सर्वांची नाजूक रंगरेष... सर्व लाजवाब.



१९६८ साली शांताबाई शेळके कशा दिसत होत्या, ते त्यांच्या रेखाटनातून आम्हाला म्हणजे ज्यांनी त्यांच्या निवृत्तीच्या वयात त्यांना पाहिले आहे अशांना; शांताबाईंचे त्यावेळचे सतेज रूप पाहून अचंबित व्हायला होते. तर १९६८ मध्येच आचार्य अत्रे यांचे रेखाटलेले विचारी, धीरगंभीर, एकाग्रतेची चुणूक दर्शवणारे रूप पाहून आपण क्षणभर स्तंभित होतो आणि, 'हेच का ते बिनधास्त, खट्याळखोर आचार्य अत्रे' यावर विश्वास ठेवणे कठीण जाते! एवढी प्रल्हाद केशवांची दुसरी सत्य बाजू आपल्याला ग.नां.च्या फटकाऱ्यांनी समजते!

दत्तो वामन पोतदारांचा कडक शिस्तीचा बाणा आणि त्याचबरोबरची सहृदयता; पंतप्रतिनिधींची संतुष्ट प्रसन्नता; शंतनुराव आणि शंकरराव किर्लोस्करांची डोळ्यांच्या माध्यमातून स्पष्टपणे दृग्गोचर होणारी स्वप्नं, दूरदृष्टी आणि ध्येयवेडाची ताकद; विनोबाजींच्या पदयात्रेची सर्वसमावेशक प्रवाही गती; आपल्याला समाधान मिळवून देणारे लालबहादूर शास्त्रीजींचे जलरंगामधील पोर्टेट; 'अंजली' अंकाच्या १९६५च्या वासंतिक अंकावरील मुखपृष्ठावर साकारलेले तरुणीचे मोहक भाव; १९७५च्या 'स्त्री' मासिकाच्या, 'मराठी स्त्रीच्या घडणीत शंकरराव किर्लोस्करांचा वाटा' या विषयावरील अंकाच्या मुखपृष्ठावर स्त्री शिल्प घडवत असतानाची व शिल्पावर प्रतिबिंबित झालेली शं.वा.किं.ची भावमुद्रा; मार्च




१९५१च्या 'स्त्री'च्या मुखपृष्ठावर छोटा राजीव व इंदिरा गांधींसह रेखाटलेले जवाहरलाल. जवाहरलालजींनी खूष होऊन ग.नां.ना मुखपृष्ठावरच दिलेली स्वाक्षरी; रामुअण्णा आणि लक्ष्मणराव ह्या किर्लोस्कर बंधूद्वयांचे १९५०च्या किर्लोस्कर मासिकाच्या मुखपृष्ठावर चित्र रेखाटताना, ग.ना. जाधवांनी चितारलेला किर्लोस्कर उद्योगाच्या प्रारंभीचा १९१०चा माईल स्टोन तसेच १९५० हे उद्योगधंद्याचे उगवतीचे वर्ष आणि बंधूद्वयांचा पार्श्वभूमीवर त्यांच्या नावातीलच 'राम व लक्ष्मण' घेऊन धनुर्धारी राम व लक्ष्मण यांची चितारलेली धूसर पडछाया, या गोष्टी ग.नां.च्या कल्पनाशक्ती विस्ताराचा प्रत्यय देऊन जातात. चित्रकाराच्या सजगतेचा हा गुण तर टाळी घेऊन जातो.

ग.नां.चे किर्लोस्करांकडे असणे आणि त्यांनी भरभरून दिलेल्या पाठिंब्यावर स्त्री, मनोहर व किर्लोस्कर या त्यावेळच्या गाजलेल्या मासिकांवर ग.नां.ची मुखपृष्ठ असणे हा योग दुग्धशर्करेसारखा होता. ह्या योगाचा वेग हा ग.नां.च्या लांबवर पसरत जाणाऱ्या स्वाक्षरीसारखा होता. म्हणूनच की काय, आपले पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांना, 'कल्याणचा खजिना' हे महाराष्ट्राच्या इतिहासाचे ग.नां.नी सप्रेम भेट दिलेले चित्र-प्रतीक राष्ट्रपती भवनातील संग्रहालयात विराजमान झालेले आहे. जिच्यात लेखणीची आणि शब्द-वाणीची समृद्धता होती अशी 'जी.एन.' ही व्यक्ती म्हणजेच 'ग.ना.' सदैव नम्र राहिली. त्यात त्यांचा संयमी स्वभाव आणि विचारप्रक्रियेतील शांतता त्यांच्या रेखाटनांमध्ये आपसूक आणि अलगद उतरत राहिली. त्यामुळे 'ओलेतीपणाच्या' सौंदर्यात (अंजली, वासंतिक अंक, १९६०) बीभत्सता, स्वैरता आणि वासनेची सीमारेषा कधीही ओलांडली गेली नाही. ना.सी. फडके यांच्या 'अंजली' मासिकाची मुखपृष्ठे ही त्यामुळेच ग.नां.च्या आनंदी व खेळकर स्वभावाची व्यक्त रूपे आहेत.

डॉ. सरोजिनी बाबर यांच्या 'समाज शिक्षणमाले'साठी ग.नां.नी अगदी शेवटपर्यंत मराठमोळ्या लेखनाला अस्सल ग्रामीण जीवनशैलीतील बोलकी चित्रे पुरवली. ग.नां.च्या अंत:करणातील ही सामाजिक कृतज्ञता अशा रंगरूपात साकार होताना दिसते.

१९३६ मध्ये जलरंगात साकारलेला कोल्हापूरच्या महालक्ष्मी मंदिराचा एक भाग म्हणजे निव्वळ शांतता आणि शांततेचाच अनुभव देतो. ही अशी शांतता व प्रसन्नतेची अनुभूती रंगछटांमधून जाणवून देणे हे काम साधेसोपे खचितच नाही. पूर्ण प्रगल्भतेमुळेच हे शक्य होते.

'बुंदीवाला' तर लाजबाबच. बुंदी पाडण्याची प्रक्रिया, त्याची जागा, विस्तवातील धग आणि चित्रातील एकूणच कॅनव्हासवरील धुरकटतेची जवळीक साधणारा बॅलन्स पाहता 'बुंदी क्षण' जिवंत होतो.

आर्टिस्ट पठाण, कर्मवीर भाऊराव पाटील, पत्नी इंदिराबाई, मातोश्री तानाबाई, राम कोलारकर, संध्या, रजनी, बालगंधर्व, अप्पा पेंडसे ह्या अशा ख्यातनाम व जवळच्या व्यक्तिमत्त्वांचे परस्परविरोधी धाटणीचे चेहरे आणि त्यांचे कर्तृत्व यांचा ठसा उमटवताना प्रत्येकाच्या डोळ्यांमधली वेगवेगळी भावुकता, त्या प्रत्येकाच्या बुबुळापासूनच्या आणि भोवती असणाऱ्या त्वचेच्या रंगछटांची ठेवण, की ज्यातून - त्या, त्या व्यक्तिमत्त्वातून - अभिव्यक्त होणारी भावना नेमक्या व मूलत: असणाऱ्या वास्तव रंगछटांच्या द्वारे आपल्यापर्यंत पोचवण्याचे अत्यंत जिकिरीचे अवघड हे कसब ग.नां.च्या बोटांमध्ये लीलया तोलले गेले होते याचा प्रत्यय आपल्याला आपसूक मिळतो आणि त्या सजीवतेत आपण मिसळून जातो, ते एक रसिक म्हणून समाधान पावून!

अशा ह्या विविध क्षेत्रांतील व्यक्तींच्या हृदयाचा ठाव घेऊन; प्रत्येकाच्या नजरेमधील वेगवेगळ्या स्वप्न वास्तवाची झेप, प्रसन्नता, ठामपणा, विश्वास, तन्मयता, सौंदर्य, नाजुकता, शांतता इत्यादींची पखरण ही केवळ आभासात्मक न राहता, रंगछटांवर असणाऱ्या कमांडद्वारे (ताकदी) चित्रमहर्षी ग.ना. जाधव यांनी त्यांच्या जादुई बोटांच्या माध्यमातून, भारतीय चित्रकलेच्या प्रांतात मुक्तहस्ते (आपल्या रसिक मनावर) उधळली. अशा ग.नां.च्या स्मृतीला अभिवादन...

**- प्रदीप गुजर**
१, सुयोग, रामवाडी, नौपाडा, ठाणे ४०० ६०२
दूरध्वनी : २५३३ ९००२

# विदर्भातील संगीत क्षेत्र; गुणवत्ता आहे पण...

डॉ. सुलभा पंडित

विदर्भ ही रसिकांची भूमी आहे. त्यातही ही रसिकता दानशूर आहे. या दानशूर रसिकतेचा, अनेक कलाकारांनी कृतज्ञतेने उल्लेख केला आहे. मराठी साहित्यात असे अनेक संदर्भ सापडतात. पु. ल. देशपांडे, वसंतराव देशपांडे यांच्या आठवणींतून त्यांना उजाळा मिळाला आहे. परंतु येथील कलाकारांवर किंवा संगीतज्ज्ञांवर मात्र फारसे लेखन कोणी केलेले नाही. मग ते तत्कालीन कलाकार असोत वा आजचे असोत; दुर्दैवाने ही वस्तुस्थिती आहे हे सांगावे लागते. वस्तुत: अगदी जुन्या काळापासून म्हणजे पं. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर, अब्दुल करीम खाँ, अल्लादिया खाँ ही मंडळी पश्चिम महाराष्ट्रात कारकीर्द गाजवत असता, समकालीन अशी संगीताची चळवळ विदर्भातही सुरू होती, हे फारच थोड्यांना ज्ञात असेल.

कोल्हापूर, सांगली, मिरज या ठिकाणी ज्याप्रमाणे राजाश्रयाने ही कला विकसित झाली त्याप्रमाणेच विदर्भात भोसले घराण्याचा राजाश्रय कलावंतांना होता. त्यांना कलावंतांची कदर होती. श्रीमंत जानोजीराव भोसले व नंतर रघुजीराजे व लक्ष्मणराव राजे भोसले यांनी उदार हस्ते कलावंतांना मदत केली. ती मंडळी संगीताची जाणकार सुद्धा होती असे उल्लेख आहेत. नंतरच्या काळात श्रीमंत बाबुराव देशमुख हे उदार रसिकतेचे उदाहरण म्हणून लोकांसमोर आहेत. कलावंतांची कदर करून, त्यांच्या कलेची वाहवा करून त्यांना भरपूर बिदागी देण्यात ते तत्पर असत. बालगंधर्व, सवाईगंधर्व, पं. भीमसेन जोशी अशा अनेक कलावंतांच्या चरित्रात हे उल्लेख सापडतात. पुण्याचे आबासाहेब मुजुमदार हे नाव अनेकांना माहीत आहे. नागपूरच्या बाबुराव देशमुखांना कितीजण, विदर्भाबाहेर ओळखतात हा प्रश्न आहे.

नागपूरमधीलच नव्हे तर एकूणच विदर्भातील संगीतज्ज्ञांवर आणि कलाकारांवर लेखन करणारी एक संगीतज्ज्ञ व्यक्ती मात्र नागपूरमध्ये आहे, ती म्हणजे डॉ. नानासाहेब मंगरूळकर. वैयक्तिक पातळीवर, प्रतिकूल परिस्थितीवर मात करून, पदरमोड करून त्यांनी हे लेखन केले आहे, म्हणूनच सर्व संदर्भ देता येत आहेत. भले त्यांचे प्रयत्न फारसे जगासमोर आले नाहीत. परंतु वाग्गेयकार म्हणून ते विदर्भातील संगीतवर्तुळात प्रसिद्ध आहेत. त्यांची 'संगीतातील घराणी व चरित्रे', 'संगीत शास्त्रविजयिनी' इत्यादी पुस्तके प्रसिद्ध असून, त्यांनी रचलेल्या बंदिशींचेही पुस्तक प्रकाशनाच्या वाटेवर आहे.

त्यांना गुरुस्थानी असलेले पं. राजाभाऊ कोगजे हे ठुमरीचे बादशहा म्हणून प्रसिद्ध होते. बनारस घराण्याची ठुमरी आणि ग्वाल्हेर गायकी यांची त्यांना भरपूर तालीम मिळाली होती. रसिले गायन ही त्यांची ओळख होती. अमरावतीचे पं. मनोहरराव कासलीकर आग्रा आणि जयपूर गायकीसाठी प्रसिद्ध होते. याखेरीज खांसाहेब बड़े गुलाम अली यांचे ते गंडाबंध शागीर्द होते. पं. प्रभाकरराव खर्डेनवीस यांनी सुद्धा आपली कारकीर्द खूप गाजवली होती. पं. प्रभाकरराव देशकर हे डॉ. वसंतराव देशपांडे यांचे शिष्य असून जुन्या पिढीतील पं. शंकरराव प्रवर्तक यांचे भरपूर मार्गदर्शन त्यांना लाभले. सध्या ते अध्यापनात व्यस्त आहेत. संशोधन क्षेत्रात गाजलेल्या विदर्भातील महिला कलावंत म्हणून डॉ. सुमती मुटाटकर, डॉ. विमल केळकर (विदर्भाबाहेर कार्यरत होत्या), डॉ. उषा नंदनपवार यांचा उल्लेख करता येईल. अलीकडच्या काळात अनेक संशोधक पुढे येत आहेत, परंतु ज्येष्ठ महिला म्हणून यांची पाऊलवाट उल्लेखनीय ठरते. विदर्भातील इतर जिल्ह्यांतही संगीतसाधना, अध्ययन-अध्यापन सुरू होतेच. अप्रकाशित राग प्रकाशित करणारे ज. दे. पत्की वर्ध्याचे, यवतमाळचे कशाळकर बंधू (पं. उल्हास कशाळकर हे नावारूपाला आलेले नाव) हेही सर्वांच्या परिचयाचेच होत. अमरावतीचे ज्येष्ठ गायक दिनकरराव देशपांडे सुद्धा उल्लेखनीय. 'गीतगोविंद'सारखे गीतकाव्य घेऊन रसिकांच्या मनात स्थान निर्माण करणारे गायक, अभिनेते, संगीतकार म्हणून गाजलेले पं. मनोहर कवीश्वरही अमरावतीचे. कलकत्ता येथे शांतीनिकेतनमध्ये राहून संगीत अध्यापन करणारे, रवींद्रसंगीताचा व्यासंग करणारे विद्याधर वझलवार (पु. ल. देशपांडे यांनी 'वंगचित्रे'मध्ये त्यांचा उल्लेख केला आहे) यांनी हा वारसा त्यांची कन्या व शिष्या सौ. अरुंधती देशमुख यांच्याकडे दिला असून त्या रवींद्र संगीत गाणाऱ्या मान्यवर मराठी गायिका म्हणून ओळखल्या जातात. वसंत रानडे (व्हायोलिन वादक), नंदू असनारे (तबला वादक) ही नावेही विदर्भाबाहेर पोहोचली होती. सुप्रसिद्ध सारंगी वादक हमीद खाँ यांची सुरेल सारंगी आणि त्यांनी धरलेला लहरा प्रसिद्धच होता. आकाशवाणीवर उच्च श्रेणी मिळवून राष्ट्रीय कार्यक्रम देणारे अनेक कलाकार होते. श्रीधरराव ढगे, डी. एम. बोधनकर हे उत्कृष्ट गायक,



अरविंद उपाध्ये



शिरीष भालेराव

तबलावादक होते. पं. मनोहरराव व पं. पद्माकर बर्वे यांनीही आपला काळ गाजविला. पं. गोपाळराव वाडेगावकर यांची तबलासंगत आणि बबनराव आठल्ये यांची संवादिनी संगत यांनी अनेक दिग्गजांच्या मैफली रंगल्या. यात जुन्या ज्येष्ठ गायिका किशोरी आमोणकरांपासून, डॉ. वसंतराव देशपांडे, अश्विनी भिडे यांच्यापर्यंत अनेकांचा उल्लेख करता येतो. भावगीत गायनाच्या पहिल्यावहिल्या गाजलेल्या गायकांपैकी वर्ध्याचे जे. एल. रानडे काय किंवा वंदे मारतम्च्या प्रचारामुळे सर्वतोमुखी झालेले बुलढाण्याचे विनायकराव अंभईकर काय, त्यांचे सांगीतिक कर्तृत्व लक्षणीयच ठरते.

आजच्या सर्व कलावंतांना या ज्येष्ठ पिढीचे ऋण मान्य करावेच लागेल. त्यांनी विदर्भातील संगीतक्षेत्र सुरेल ठेवण्यात योगदान दिले आहे. आता नवी पिढी प्रयत्नपूर्वक पुढे येत आहे. शास्त्रीय कंठसंगीताच्या संदर्भात यातील प्रस्थापित नावे म्हणजे डॉ. कल्याणी देशमुख, डॉ. चित्रा मोडक, अनिरुद्ध देशपांडे ही होत. ख्याल गायन, उपशास्त्रीय गायन, सुगम संगीतातील भक्तिगीत, नाट्यगीत, गझल हे प्रकार सादर करून मैफल रंगवण्यात हे फार माहीर आहेत. हुकुमी पद्धतीने बैठक रंगवणे त्यांना जमते याचे प्रत्यंतर अनेकवेळा घेतले आहे. डॉ. राम देशपांडे सध्या मुंबईत कार्यरत असून नाव कमावत आहेत. त्यांची जडणघडण नागपूरमध्येच झाली. व्यावसायिकदृष्ट्याही या सर्वांनी नाव कमावले आहे.

आजच्या; नव्या पिढीच्या कलावंतांमध्ये कंठसंगीतापेक्षा वादक अधिक चांगली कामगिरी करत आहेत. व्यावसायिक सफाई आणि सांगीतिक गुणवत्ता यांच्याजवळ असून त्यांच्याकडून भरपूर अपेक्षा करता येतात. त्यापैकी काही उल्लेखनीय कलावंत म्हणून शिरीष भालेराव (डॉ. एन. राजम यांचेही मार्गदर्शन त्यांना मिळाले आहे.) हे प्रथम श्रेणीचे व्हायोलिनवादक आहेत. एक सुरिले बासरीवादक म्हणून अरविंद उपाध्ये झपाट्याने पुढे आलेले कलावंत आहेत. स्वररचनाकार म्हणूनही त्यांची ओळख आहे. अतिशय गोड हात असलेले सतारवादक म्हणून नासीर खान आणि अवनींद्र शेवलीकर हे उभयता नावारूपाला आले आहेत. पं. प्रभाकर धाकडे यशस्वी अध्यापक, व्हायोलिनवादक व रचनाकार म्हणून ज्ञात आहेत. त्यांची शिष्यपरंपरा सुद्धा तयार होत आहे. नागपूरला होणाऱ्या बैठकींमध्ये तबला वादनाची साथसंगत म्हटली असता संदेश पोपटकर आणि राजू गुजर व सचिन बक्षी ही नावे समोर येतात. येथील बैठकी यांच्याच साथीने रंगतात तर पेटीवादनाच्या साथीला अनेक वर्षे विनायक वालदूरकर यांची हजेरी असे, तर आजकाल श्रीकांत पिसे, संदीप गुरमुले हे प्रसिद्धीस येत आहेत. एक काळ गाजविणारे पं. जगदीश प्रसाद यांचे शिष्य भाऊभट लाडसे भट, हेही आपल्या व्यासंगाने, अध्यापनाने लक्षात राहतात. पं. शिवकुमार शर्मा यांचे शिष्य वाल्मिक धांडे हे नागपुरमधील सुरिले संतुरवादक आहेत. श्याम गुंडावार (चंद्रपूर), डॉ. साधना शिलेदार आपल्या अभ्यासू वृत्तीच्या प्रस्तुतीसाठी ज्ञात आहेत.


शास्त्रीय संगीताच्या तुलनेत झटपट प्रसिद्धीच्या झोतात आणणारे सुगम संगीताचे कार्यक्रमच आजकाल संख्येच्या दृष्टीने वाढताना दिसतात. सुवर्णा माटेगावकर ही नागपूरची युवती आज नावारूपाला आली आहे. सचिव व सुरभी ढोमणे यांची 'सुरसंगम' ही चमू तसेच 'स्वरमधुरा'चे राजेश दुरूगकर व साथी कलाकार यांचा आवर्जून उल्लेख करायला हवा. वर्षा बारई व अविनाश घोंगे यांचे 'स्वरदीप'च्या वतीने होणारे कार्यक्रम हे व्यावसायिकदृष्ट्या उत्तम कार्यक्रम असतात. पद्मजा फेणाणी यांची शिष्या वर्षा बारई ही सुद्धा उत्तम गायिका म्हणून पुढे आली आहे. या सर्वांचे वादक सहकलाकार हे नावाजलेले कलावंत असून त्यांची कामगिरी नेहमीच उत्तम असते. शैलेश दाणी हे उत्तम रचनाकार म्हणून पुढे आलेले नाव आहे.

नृत्याच्या संदर्भात भरतनाट्यम्, कथक या दोन नृत्यशैली आता नागपूरमध्ये चांगल्या रुजल्या आहेत. मीरा चंद्रशेखरन, किशोर हंपीहोळी, श्रीमथी माडखोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक शिष्य तयार होत आहेत. अमरावती येथे गोडेगुरुजी ओडीसी नृत्यशैलीचे मार्गदर्शन करतात. डॉ. साधना नाफडे, ललिता हरदास कथक नृत्यशैलीची तालीम देतात. त्या तुलनेत कुचीपुडी वा मोहिनीअट्टम, कथकली, मणिपुरी या नृत्यशैलींसाठी मात्र मार्गदर्शनाची आवश्यकता आहे.

वस्तुत: नागपूर विदर्भात शास्त्रीय संगीताच्या संदर्भात अधिक मार्गदर्शनासाठी शिष्यांना विदर्भाबाहेरच जावे लागते. मार्केट व पुढील मार्गदर्शन विदर्भात राहून त्यांना मिळत नाही. अनिरुद्ध जोशी (महागायक) याने पं. कैवल्यकुमार यांचा गंडा बांधून बाहेर जाऊनच तालीम घेतली. वैशाली माडे (यशस्वी गायिका), यशश्री भावे पाठक (यशस्वी गायिका) यांना पुढील संधीसाठी विदर्भाबाहेरच जावे लागते. सुगम संगीताची क्षेत्रे, बाहेरील स्पर्धांमुळे विदर्भाबाहेरच आहेत, ही चिंतेची बाब आहे. या ठिकाणी गुरुकुलसारखी सोय व प्रसिद्धीची माध्यमे निर्माण होणे शक्य आहे का, हा संबंधितांनी विचार करण्याचा प्रश्न आहे. गुणवत्ता आहे. पुढील तालीम देणारे गुरू आणि पुढे येण्यासाठी संधी यांची मात्र गरज आहे. व्यावसायिक यशाची गणिते सोडविणे येथील कलावंतांना जमायला हवे. त्यासाठी अधिक डोळस रियाज, नव्या माध्यमांचे भान आणि जिद्द यांची मात्र कास धरायला हवी.

(लेखिका ज्येष्ठ संगीत समीक्षक म्हणून गेल्या तीन दशकांपासून विदर्भात मान्यताप्राप्त आहेत.)

**– डॉ. सुलभा पंडित**
४०१, शुभंकर सहनिवास, न्यू स्नेहनगर,
वर्धा रोड, नागपूर – १५
संपर्क : ०७१२-२२८४८७२, ९४२२१०२१३३




# कथा जगप्रसिद्ध पुलांच्या
**सुधीर शं. कुलकर्णी**

**मूल्य ३५० रु.**
**सवलतीत २०० रु.**

जगातील पुलांचा इतिहास तपासला तर असे दिसते, की मानवाने पूलकल्पना आणि बांधकामाची सामग्री निसर्गाकडूनच घेतली आहे. काही पूल-कल्पनांचे मूळ भारतीय आहे, हेही सिद्ध झालेले आहे.

कथा जगप्रसिद्ध पुलांच्या... या पुस्तकात, जगातील सुप्रसिद्ध बारा पुलांच्या निर्मितीसंबंधीची सखोल आणि रोचक माहिती वाचायला मिळेल. त्यामध्ये काही 'रेकॉर्ड ब्रेकिंग' तसेच त्या त्या शहराच्या स्वाक्षरी पुलांचा (सिग्नेचर ब्रिजेस) समावेश आहे. त्यासह पुलांच्या सौंदर्यशास्त्राची तोंडओळखही वाचकांना होईल.

अमेरिकास्थित, ज्येष्ठ आणि सुप्रसिद्ध इंजिनीअर सुधीर शं. कुलकर्णी ह्यांनी या पुलासंबंधीची अभ्यासपूर्ण माहिती रंजक भाषेत सांगितली आहे.

# चंद्रपुरातील ज्येष्ठ व प्रसिद्ध उद्योजक यशवंतराव कुळकर्णी ह्यांच्याशी संवाद

**राजा बोझावार**

**यशवंतराव, आज तुम्ही ऐंशीच्या उंबरठ्यावर आहात. ४५ वर्षांपूर्वी तुम्ही ह्या जिल्ह्याला कर्मभूमी म्हणून स्वीकारले. घुग्गूस येथील एसीसीचा सिमेंट कारखाना हे तुमचं पहिलं कार्यक्षेत्र. त्यावेळचं एकूणच औद्योगिक वातावरण, उपलब्ध मर्यादित तांत्रिक मनुष्यबळ व नैसर्गिक वातावरण ह्या अडचणीतून तुम्ही मार्ग कसा काढला?**

१९६६ साली घुग्गूस येथे सिमेंट कारखाना उभारायला मी या जिल्ह्यात प्रवेश केला, त्यावेळेस कारखान्यापर्यंत जायला रस्ता नव्हता. घुग्गूस गावापर्यंत पोचायला लोहमार्ग होता, जायला-यायला अनियमित अशी दोन डब्यांची गाडी होती. औद्योगिकीकरणाच्या दृष्टीनं त्यावेळेस महाराष्ट्र सरकारची उदासीनता होती. सिंदोला खाणीपासून वर्धा नदीपर्यंत रोप-वेकरता जागा मिळण्यासाठी अनेक अडचणी उभ्या राहिल्या. जड यंत्रासाठी लागणारा पाया, त्याखालील जमीन यासाठी अथक परिश्रम घेतले. कारण महाराष्ट्रात हा पहिला सिमेंट कारखाना होता. मोठ्या उद्योगाची जाण नसल्यामुळे आजूबाजूच्या कास्तकरांची मुलं त्यात काम करावयास भ्यायची. स्थानिक लोकांना रोजगारी मिळावी या भूमिकेतून, त्यांना सतत प्रोत्साहन देऊन कारखान्यात आणण्यात यश मिळालं.

**आज चंद्रपूर जिल्ह्यात अनेक सिमेंट प्रकल्प उभे झाले आहेत. वरकरणी जरी हा औद्योगिक विकास असला तरी ह्या जिल्ह्यातील समृद्ध वनसंपदेवर, खनिज संपत्तीवर तथा वातावरणातील समतोलावर ह्याचा नेमका काय परिणाम झाला? तुमचे सुरुवातीचे दिवस व आजचे दिवस ह्यांत नेमकं काय अंतर तुम्हाला जाणवतं. ह्या प्रकल्पातून स्थानिक लोकांना रोजगार किती उपलब्ध झाला? तसंच ह्या संदर्भातील सरकारी धोरण व वाढणारं प्रदूषण याबद्दल आपलं काय मत आहे?**

महाराष्ट्रात ए.सी.सी.नं पहिला सिमेंट प्रकल्प १९७० साली सुरू केला. त्यावेळेस या जागेत झुडपी जंगल होतं. जमीन मिळवण्यात कंपनीला सुरुवातीला त्या काळात विशेष यश मिळालं नाही. एम.आय.डी.सी.चे अध्यक्ष नरेंद्र तिडके होते. त्यांच्या व वानखेडे उद्योगमंत्री असताना त्यांच्या प्रयत्नांतून ए.सी.सी.ला जमीन मिळाली. सिंदोलाच्या खाणी सुरू करायच्या अगोदर त्या ठिकाणी बरीच वनसंपदा होती. पाया खोदताना दगान करावं लागायचं व त्या आवाजानं नीलगाई आणि हरणं पळून जात. परंतु सामाजिक जाणीव ठेवून २०,००० वृक्ष रोपण केलं. त्यामुळे त्या ठिकाणी परत हिरवाई येऊ शकली. भूमिपुत्रांना रोजगारीत सामील करून घेतल्यामुळे संप झाले नाहीत. ४० वर्षांनंतर या प्रकल्पात असलेले स्थानिक कामगार भेटले, की ओळख ठेवून कृतज्ञता व्यक्त करतात. चंद्रपूर जिल्हा अग्रक्रमानं प्रदूषित असल्यानं या भागात पंचावन्न हजार कोटी रुपयांचे प्रकल्प शासनानं स्थगित केले. म्हणजेच अस्तित्वात असलेल्या कारखान्यांनी प्रदूषण करायचं, त्यावर शासनानं दुर्लक्ष करायचे आणि नवीन कारखाने येण्यास बंदी करायची, असा अजब न्याय आहे. या अनुषंगानं गुजरात येथील वापी शहर पण प्रदूषित होतं, पण त्यांनी आपला दुसरा क्रमांक सुधारून ते पाचाच्या बाहेर पडले आणि नवीन कारखान्याला परवानगी मिळवली.

**चंद्रपूरची औद्योगिक वसाहत १९७७ साली उभारली गेली. त्याचदरम्यान, आपला उज्ज्वल सिमेंट मोझाइक हा प्रकल्पदेखील (१९७८) सुरू केला. त्यावेळेस आपल्याला निश्चितच विविध अडचणींचा सामना करावा लागला असेल. त्याबद्दल आम्हाला सविस्तर कल्पना द्याल काय?**

१९७७ साली महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळानं चंद्रपूरजवळ औद्योगिक वसाहत उभारायचं ठरवलं. मल्टी ऑरगॅनिकचा कारखाना उभारण्यासाठी बांधकामास लागणारं पाणी उपलब्ध नव्हतं. चंद्रपूर नगर परिषदेकडून टँकरमार्फत पाणी आणून तो कारखाना उभारला. सोबत या वसाहतीत उज्ज्वल सिमेंट मोझाइकचा कारखाना फेब्रुवारी १९७८ मध्ये सुरू झाला. येथे स्थानिक कामगाराला प्राधान्य देऊन व त्या अनुषंगानं त्याला तांत्रिक शिक्षण देऊन कामगारांत उद्योगाची जाण निर्माण केली. महाराष्ट्र कार्बनचा कच्चे इंधन तयार करण्यासाठी कारखाना उभारून, देशातील फेरोमँगनीज भट्ट्यांना पुरवठा करण्याचं काम सुरू केलं. परंतु त्यासाठी लागणारी नियमित दाब पुरवठ्याची विजेची उपलब्धता नव्हती. या औद्योगिक वसाहतीतील सर्व वसाहतदारांनी मोठा संघर्ष करून ६६ के.वी. सब स्टेशन स्वतंत्रपणे, केवळ औद्योगिक वसाहतीसाठी मिळवलं. कुठल्याही औद्योगिक

वसाहतीत प्रथमपासूनच नियमित दाबाचा वीजपुरवठा करण्याची योजना असते, पण तशी सोय इथे नसल्यानं हा व्याप करावा लागला.

चंद्रपूर जिल्ह्यात सिमेंट उद्योगाच्या वाढीसाठी बराच वाव आहे. सिमेंट व मुबलक पाणी यांची उपलब्धता असल्यानं बरेच लहान उद्योग अजून स्थापन होऊ शकतात. ह्युम पाईप, मोझाइक टाइल्स यापलीकडे फेरोसिमेंट, घरं बांधण्यासाठी लागणारे सुटे भाग; जसे प्रिस्टेस, तुळया, कनाती, भिंती, अशा अनेक विविध वस्तूंची निर्मिती होऊ शकते.

**चंद्रपुरातील फेरोमँगनीज तयार करणारा एक प्रमुख प्रकल्प, आज देशातील अग्रेसर प्रकल्प म्हणून ओळखला जातो. ह्या प्रकल्पाशी आपण फार पूर्वीपासून जुळले आहात. ह्या प्रकल्पाचा चंद्रपूरकर जनतेला नेमका किती व कसा फायदा झाला? आपला चंद्रपूर कार्बन हा अत्यंत यशस्वी प्रकल्पदेखील या कारखान्याशी जुळला आहे. आपल्या अनुभवातून तो आंतरराष्ट्रीय स्तरावर गेला आहे. ह्या प्रकल्पाचादेखील स्थानिक जनतेला किती फायदा झाला, हे कृपया विशद करावे.**

पूर्वीचे महाराष्ट्र इलेक्ट्रोस्मेल्ट आता चंद्रपूर फेरो अलॉइज हे सेलच्या अंतर्गत असल्यानं या ५०० एकर जमिनीवर अजून दोन ४५ मेगॅवॅटच्या भट्ट्या अधिक फेरोमँगनीज तयार करतील आणि हा प्रकल्प आशिया खंडात सर्वात मोठा होईल. महाराष्ट्र कार्बन; जो या कारखान्याशी जुळला गेला आहे त्यानंसुद्धा आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वत:चं विशेष स्थान ठेवलं आहे. तांत्रिक शिक्षण घेतलेल्या, म्हणजे आय.टी.आय.मधील विद्यार्थ्यांची तांत्रिक कारखान्यात अधिक आवश्यकता आहे. चंद्रपूर जिल्ह्यात साधारणत: एक हजार विद्यार्थी तांत्रिक शिक्षण घेऊन बाहेर पडतात. त्यांना असल्या कारखान्यात विशेष प्राधान्य देण्यात येतं.

चंद्रपूर फेरोअलॉइज हा फेरोमँगनीज तयार करण्यासाठीचा, या देशातील अग्रेसर कारखाना आहे. या कारखान्यात अजून जास्त निर्मितीला वाव आहे. ५०० एकर जमिनीत त्याचे स्वत:चे औष्णिक केंद्र आणि आधुनिक पद्धतीच्या फेरोअलॉइज तयार करणाऱ्या भट्ट्या काढता येतील.

**चंद्रपूर हा अतिशय संपन्न वनसंपत्तीचा जिल्हा आहे. बांबूचे उत्पादन हे प्रमुख आहे व पेपर उद्योगासाठी अतिशय महत्त्वाचे आहे. ह्या उद्योगांनासुद्धा आपल्या तांत्रिक नैपुण्याचा फायदा झालेला आहे. त्याबद्दल कृपया सांगावे. तसंच ह्या उद्योगांमुळे वनसंपत्तीचा ऱ्हास होतो आहे का आणि होत असल्यास त्यावरील उपाययोजनांबद्दल आपलं काय मत आहे? बांबू क्लस्टर ह्या नवीन संकल्पनेबद्दल आम्हाला सविस्तर सांगा.**

चंद्रपूरला वनसंपत्तीची उत्तम देणगी आहे. त्यातील बांबूपासून पेपर तयार होतो. १९५१ साली मध्यप्रदेश सरकारनं दोन ठिकाणी पेपरमिल चालू केल्या. वर्तमानपत्राच्या कागदासाठी बऱ्हाणपूरजवळ नेपा येथे कारखाना सुरू केला. तो अजूनही उत्कृष्टपणे सुरू आहे आणि सुरुवातीला ५० टन रोजची निर्मिती असलेला कारखाना आता ५०० टन रोजच्या निर्मितीपुढे गेलेला आहे. जनरल इन्शुरन्सच्या काही अटींमुळे कारखान्याच्या काही भागांत Asbestos पत्र्याचं छत निर्माण करणं आवश्यक होतं. कारखाना तर चालू राहणार, त्यातून तो कागद निघत असलेला; अशा परिस्थितीत त्या छताचं काम मी घेतलं. साधारणत: त्याचे छोटे-छोटे गोळे वर लटकवण्यासाठी जो जोड देतात त्यासाठी वेल्डिंग मशीन वापरलं जातं. वेल्डिंग करत असताना त्याची ठिणगी जर कागदावर पडली तर आगीचा धोका निर्माण होतो, हे सर्व लक्षात घेऊन मी छताला जोडण्यासाठी, त्या सांध्यावर रिबेटिंगचा उपयोग केला आणि सर्व काम निर्विघ्नपणे पार पडलं.

चंद्रपूर जिल्ह्यात औद्योगिकीकरण वाढवायचं असेल तर येथील लहान उद्योगांना मोठ्या उद्योगांशी संलग्न व्हावं लागेल. मोठी वसाहत व त्याच्या अनुषंगानं संलग्न वसाहती जर निर्माण झाल्या तर दृश्य परिणाम दिसू लागेल.


**कोळसा हे राष्ट्रीय उत्पादन १९७३ साली जाहीर झालं व त्याकरता 'राष्ट्रीय कोळसा निगम'ची स्थापना झाली. वेकोलीची स्थापना १९७५ साली झाली. त्यावेळचं उत्पादन प्रतिवर्ष १० लाख टन होतं, तर आज ३३० लाख टन प्रतिवर्ष उत्पादन आहे. आज चंद्रपूर कोळशाच्या खाणींनी वेढलेला आहे व त्याचे प्रदूषण नागरिक भोगत आहेत. विकासाची ही अपरिहार्यता आहे, परंतु त्यात समतोल कसा साधला जाईल?**

चंद्रपूर जिल्ह्यातील खनिज संपत्ती :

| | | |
|---|---|---|
| १. कोळसा | – | ४९०.२२ चौ.कि.मी. |
| २. लोखंड | – | ०.०६२ चौ.कि.मी. |
| ३. सिमेंट चुनखडी | – | १६६.७५ चौ.कि.मी. |
| ४. बॅराइप्स | – | ०.१५ चौ.कि.मी. |
| ५. तांबे | – | ०.०३५ चौ.कि.मी. |
| ६. क्रोमाइटस | – | ०.७५ चौ.कि.मी. |
| ७. प्लोराइड | – | ०.०६५ चौ.कि.मी. |

१९७३ सालात कोळसा हे राष्ट्रीय उत्पादन ठरलं व त्याकरता राष्ट्रीय कोळसा निगमची सुरुवात झाली. वेकोलीची स्थापना व त्याचा कारभार १९७५च्या सुमारास सुरू झाला. तत्पूर्वी वर्धा व्हॅलीतून कोळशाचं उत्पादन हे वर्षाला साधारणत: १० लाख टन होत असे. वेकोलीचा विस्तार महाराष्ट्रात प्रामुख्यानं चंद्रपूर, यवतमाळ व नागपूर विभागांत आहे. त्याचे उत्पादन आजमितीस साधारणत: ३३० लाख टन प्रतिवर्षी आहे. या कोळशाच्या पुरवठ्यामुळे नागपूरजवळ कोराडी व चंद्रपूर येथे महाऔष्णिक विद्युत केंद्र सुरू झाली व २८०० मेगॅवॅटचं वीजउत्पादन सुरू झालं.

कोळशाच्या खाणीच्या विस्ताराबरोबरच त्याला लागणारे तंत्रज्ञ लक्षात घेऊन विविध स्थापत्य महाविद्यालयांनी तसा अभ्यासक्रम सुरू



यशवंतराव कुळकर्णी

केला व त्या तंत्रज्ञांना वेकोली व इतर भागांत नोकऱ्या मिळू लागल्या. चंद्रपूरच्या राजीव गांधी इंजिनिअरिंग अँड रिसर्चमध्ये माइनिंगचा अभ्यासक्रम सुरू झाला. वेकोलीच्या विस्तारामध्ये मनुष्यबळाची गरज निर्माण झाली. भूमिपुत्रांना या कोळशाच्या उद्योगधंद्याचं विशेष आकर्षण नव्हतं. त्यामुळे त्याचं लक्ष सिमेंट कारखाना, पेपर मिल व अन्य उद्योगधंद्यात होतं. त्यांना प्रोत्साहित करून कोळसा उद्योगात कसं समाविष्ट करता येईल, ही जबाबदारी परप्रांतीय अधिकाऱ्यांना कधीच वाटली नाही. परप्रांतातून आलेली कोणतीही व्यक्ती, कोणत्याही निमित्तानं जर इकडे आली, तर तिला स्थानिक शिक्का मारून रोजगाराचे दरवाजे उघडण्यात आले. भिलाई स्टील प्लांट ज्यावेळेस सुरू झाला त्यावेळेस भूमिपुत्रांना डावलून, दक्षिण भारतातून कामगारांचे लोंढे भिलाईत आले व त्यांना काम मिळालं.

यवतमाळ जिल्ह्यात ज्यावेळेस वेकोलीनं विस्तार केला त्यावेळेस मराठी अधिकारी असल्यानं त्यांचं मातीशी नातं होतं त्यामुळे सहजपणे २३ खाणींसाठी जागा उपलब्ध करून दिली. मातीशी नातं असणारे आपलेच अधिकारी असल्यानं हे सहज शक्य झालं. कोळशाच्या ओपन कास्ट खाणीच्या विस्ताराला व उत्पादनाला साधारणत: दोन ते अडीच वर्षांचा कालावधी लागतो. कोळशाचे थर जसजसे खाली जात आहेत, तसतसे आराखडे व योजना जाणीवपूर्वक कराव्या लागतात. त्यामुळे उत्पादन मिळायला कमीत कमी ६-७ वर्षं लागतात.

गेल्या आठ वर्षांपासून वेकोलीनं कुठलाही मोठा प्रकल्प नियोजित केला नाही. त्यामुळे पुढील येणाऱ्या काळात कोळशाची चणचण भासू लागेल. विस्तार नसल्यामुळे रोजगार बंद झाले. लागणाऱ्या तंत्रज्ञानाला नोकरी नसल्यानं स्थापत्य महाविद्यालयातील माइनिंग फॅकल्टी बंद होण्याच्या मार्गावर आहे. वास्तविक पाहता, वेकोलीजवळ कोळशाचे भरपूर साठे आहेत, पण योग्य नियोजन व विस्ताराचे आराखडे तयार नसल्यानं हा व्यवहार नेहमीच तोट्यात राहणार.

**तत्कालीन मुख्यमंत्री कन्नमवारांमुळे चंद्रपूर जिल्ह्याला आयुध निर्माणींचा प्रकल्प मिळाला व त्यामुळे निश्चितच स्थानिक रोजगार वाढला. कोळसा उत्पादनावर आधारित महाऔष्णिक वीजकेंद्र हे चंद्रपूरसाठी अभिमानाचं स्थान आहे, परंतु आज हे देखील सिद्ध झालेलं आहे, की चंद्रपूरच्या वाढत्या प्रदूषणात ह्या प्रकल्पाचा फार मोठा वाटा आहे. ह्या संदर्भात सरकारच्या वतीनं कुठलीही ठोस पावलं उचलली गेली नाहीत व त्यामुळे प्रदूषणाचं प्रमाण सातत्यानं वाढतच आहे. ह्याला खरोखरच विकास म्हणायचा काय? आपल्या प्रदीर्घ अनुभवाचा फायदा घेऊन याबाबत आपण काय सूचना कराल? तसेच ह्या प्रकल्पातून निघणाऱ्या फ्लायअॅश क्लस्टर या संबंधात देखील कृपया मार्गदर्शन करावे.**

**आज ह्या जिल्ह्यात अनेक औष्णिक केंद्र व पोलाद प्रकल्प येऊ घातलेले आहेत या पार्श्वभूमीवर प्रदूषणाच्या पातळीनं उच्चांक गाठलेला आहे, पेयजलाची टंचाई नागरिकांना जाणवू लागलेली आहे, तेव्हा सरकारची भूमिका व सामान्य माणसाची भूमिका ही संघर्षाच्या पातळीवर जाईल, असं आपल्याला वाटतं काय?**

Fly Ashचा उपयोग अजून विपुल प्रमाणात व्हायला हवा. मला असं वाटतं, की आता मोफत मिळणारी Fly Ash पाच-सहा वर्षानंतर पैसे मोजून घ्यावी लागेल आणि त्यासाठी मूल्यवर्धित उत्पादन होण्याचे आराखडे व तंत्रज्ञान लघुउद्योजकांना मिळवावे लागतील. Fly Ashचा उपयोग रस्ते बांधण्यासाठी करावा लागेल. दळणवळणाच्या दृष्टीनं रस्ते हा महत्त्वाचा घटक आहे. आणि खेड्यापर्यंत जे उपरस्ते काढायचे आहेत, ते Fly Ashच्या उपयोगामुळे होऊ शकतील. Fly Ashच्या विटा ज्या तांत्रिक दर्जाच्या पाहिजेत, तो दर्जा अजून आपल्याला साधलेला नाही. या दृष्टीनं शासनाच्या धोरणात्मक सुविधा आणि जनतेतील उपक्रमशीलता यांची सांगड स्वयंसेवी संघटना करू शकतील. त्यांचा ज्ञानाचा फायदा व अनुभव वंचितांना देऊन, हा पुढाकार होऊ शकतो. ह्या संस्था कार्यरत आहेत अशांना आवश्यक तो आधार व उत्तेजन देण्याचं काम शासनाकडून झालं पाहिजे. खनिज संपत्तीमध्ये चुनखडी आणि डोलोमाइट याची उपलब्धीदेखील चांगली आहे. मूल्यवर्धित उत्पादन व त्याला लागणारं तांत्रिक ज्ञान हे जागतिक स्तरावर कोठेही मिळू शकतं. टूथपेस्ट, रासायनिक खतं, डांबर, बरोबर मिश्रण करून मॅस्टिक अस्फाल्ट पुलाच्या वरील थरामध्ये वापरू शकतो. गोहतीजवळ ब्रह्मपुत्रा नदीवर बांधलेल्या पुलावर, चंद्रपूरहून त्या ठिकाणी मॅस्टिक अस्फाल्ट पुलाच्या वरील थरामध्ये वापरू शकतो. गोहत्तीजवळ ब्रह्मपुत्रा नदीवर बांधलेल्या पुलावर, चंद्रपूरहून त्या ठिकाणी मॅस्टिक अस्फाल्ट पाठवण्याकरता मान आम्हाला मिळाला.

जपानमध्ये लहान उद्योगांना मोठ्या उद्योगांइतकाच मान आहे. कारखान्यातून उत्पादन होणाऱ्या निर्मितीची गुणविशेषता ही प्रयोगशाळेत परीक्षण केली जाते. एका वसाहतीत एक प्रयोगशाळा उभारून त्याचा खर्च वाचवता येतो. एकत्रित प्रयोगशाळेत गुणवैशिष्ट्य टिकवलं जातं.

बुटीबोरी येथे आशियातील सर्वात मोठी होणारी औद्योगिक वसाहत, चंद्रपूर वसाहतीशी संलग्न केली जावी व ती सॅटेलाइट इंडस्ट्रियल एरिया व्हावी.

चंद्रपूर जिल्ह्यात वर्धा नदीच्या काठावर १७ औष्णिक केंद्रं उभारायला साधारणत: १६,००० मेगॅवॅट वीज उत्पादन होण्याची योजना आहे. साधारणत: १ मेगॅवॅट विजेसाठी १५,००० लिटर पाणी आवश्यक

असतं. वर्धा नदीतून दररोज चोवीस दशलक्ष घनमीटर पाण्याचा उपसा होणार. यासाठी वर्धा नदीच्या पाण्याचं नियोजन करून लहान-लहान बंधारे, साधारणत: दहा फूट उंचीचे, केल्यानं पाण्याचं व्यवस्थापन घेऊ शकतं. कोळशाच्या खाणीच्या विस्तारामुळे वेकोलीत मिळणारा कोळसा चंद्रपूर जिल्ह्यातील औष्णिक केंद्रासाठी राखीव असावा. ३५ टक्क्यांच्या वर कोळशात राखेचे प्रमाण असल्यानं राखेचं उत्पादन साहजिकच वाढणार. त्या राखेचा उपयोग करण्यासाठी उपाययोजना करणं आवश्यक आहे. राज्य वीज मंडळासाठी लागणारा कोळसा त्यांना परदेशातून आणावा लागतो अथवा झारखंडापासून बऱ्याच अंतराहून कोळसा घ्यावा, अशा सूचना येतात. कोळशाच्या वाहतुकीचा खर्च हा महाऔष्णिक केंद्राला सोसावा लागणार. चंद्रपूर जिल्ह्यातून कोळशाच्या खाणीपासून कर्नाटक पॉवर सप्लाय कंपनीला पुरवठा होण्यासाठी, नियोजितच आहे आणि विजेच्या टंचाईच्या काळात, राज्य विद्युत मंडळाला अथवा अन्य कंपन्यांच्या तोंडाला पाने पुसली जातात. या भागात असल्यानं नियोजनशून्यता, दूरदृष्टीचा अभाव वीजटंचाईचं भयानक सावट किती वर्षं राहील, हे परमेश्वरालाच ठाऊक!

**चंद्रपूरला वर्तमान स्थितीत एखादा मोठा नवीन उद्योग येणं शक्य आहे काय? तसं असल्यास त्या उद्योगाच्या स्वागतासंबंधी तुमच्या काय कल्पना आहेत?**

सध्याच्या वर्तमान स्थितीत खनिजावर आधारित उद्योगांना बराच वाव आहे. यासाठी या उद्योगांना आर्थिक पुरवठा आंतरराष्ट्रीय साथीदाराबरोबर करावा लागणार आहे. पायाभूत सुविधांची जसे विमानतळ, रस्ते, पाणीपुरवठा आणि वीज, यांची जास्त प्रमाणात गरज लागणार आहे. राजकीय इच्छाशक्तीवर ते अवलंबून आहे. मात्र असल्या कारखान्यांचे स्वागत होईलच. सिमेंट, स्पाँज आयरन प्लाँट, बॉक्साइटवर आधारित असे कारखाने येण्याची शक्यता आहे. मुंबईवरून हलवण्यात येणारे वस्त्रोद्योग कारखाने चंद्रपूरला आले तर विदर्भाचा कापूस वापरात येईल व स्थानिक कास्तकरांच्या आत्महत्या टळतील.

**चंद्रपूर जिल्ह्यात प्रचंड वनसंपदा आहे, तसेच मोठमोठ्या नद्यादेखील या प्रदेशातून जातात. या संदर्भात पर्यटन हा मोठा उद्योग होऊ शकतो, असं तुम्हाला वाटतं काय?**

**पर्यटन उद्योगासाठी योग्य नियोजनाची गरज :** चंद्रपूर, गडचिरोली जिल्हा बारमाही नद्यांनी संपन्न आहे. या नद्यांचा संगम अतिशय विलोभनीय आहे. इरई व वर्धा नदी यांचा संगम वढा येथे आहे. शिवालयाचे मंदिर, पौर्णिमेची यात्रा, वाहतुकीची सोय, स्वच्छतेचा अभाव हे सारेच येथे आहे. चपराळ्याच्या जंगलात वर्धा व वैनगंगा नद्यांचा संगम शिवणीजवळ होतो. नयनरम्य असा परिसर, चपराळ्याची हिरवीगार वनसंपदा, कार्तिकस्वामींचे वास्तव्य, धार्मिक महत्त्व हे सारेच पर्यटनाकरता उपलब्ध आहे. या ठिकाणी जर सुंदर, टुमदार, सर्व सोईंनी उपलब्ध असे प्रवासी निवास बांधले, तर पर्यटकांना आकर्षित करण्याचं हे ठिकाण नक्कीच होईल.

जंगलाच्या पार्श्वभूमीवर नद्यांचे खळखळणारे पाणी आणि मनोरंजनासाठी मुलांना खेळायला क्रीडा साहित्य व सहलीच्या दृष्टीनं उत्तम अशी हिरवळ तयार असली, तर कुठल्याही पर्यटनस्थळापेक्षा हे स्थळ पर्यटकांचं आवडतं ठिकाण होऊ शकेल. सिरोंचा येथील प्राणहिता व गोदावरी नद्यांचा संगम, तेथील सूर्योदय, आकाशातील विविध रंगांची आभा हे दृश्य नजरेसमोरून हलत नाही. इंद्रावती व गोदावरी यांचे सोमनूर हे स्थळ संगमाच्या मालिकेतील प्रमुख आकर्षण स्थळ होऊ शकतं.

भामरागड हे गडचिरोली जिल्ह्यातील आणि घनदाट जंगलातील एक आदिवासी तालुक्याचं ठिकाण येथून एक किमीवर पर्लकोटा, पौमुलगौतमी आणि इंद्रावती या बारमाही नद्यांचा एक त्रिकोणी संगम आहे. सर्वबाजूंनी उंच डोंगर, हिरवेकंच जंगल आणि खळखळत वाहणाऱ्या या तीन नद्यांचा जंम हे चित्रपटलावर रंगवलेलं चित्र प्रत्यक्ष बघायला मिळतं. सूर्यास्त आणि घरट्याकडे परतणारे लांब पायांच्या बगळ्यांचे उडणारे थवे हे दृश्य शब्दांच्या पलीकडे आहे.

भामरागडहून पुढे अठरा किमीवर लाहिरी हे आदिवासी गाव आहे. त्यापुढे अठरा किमीवर विनागुंडा व तेथून जवळच इंद्रावती नदीवरील इंडसफॉल आणि राज्यपाल फॉल असे बारमाही वाहणारे मोठे धबधबे आहेत. भामरागडजवळील हेमलकसा येथे डॉ. मंदाकिनी व डॉ. प्रकाश आमटे यांचा सेवासंगम प्रकाशगंगामय झाला आहे. आदिवासींना जवळीक वाटावी म्हणून त्यांच्याप्रमाणे राहणी व बोली शिकून या दाम्पत्यानं हे आधुनिक तीर्थक्षेत्र निर्माण केलं आहे. सेवेच्या साक्षात्काराची अनुभूती येथेच होणार. अशी स्थळं म्हणजे भाऊगर्दीच्या धकाधकीतून नीरव शांततेत, मित्र व कुटुंबासमवेत आवर्जून जावं! निवासाची सोय, रस्त्याची कामं बऱ्याच ठिकाणी जवळजवळ पूर्ण झाली आहेत. पण केवळ या पर्यटनस्थळांची प्रसिद्धी नसल्यानं ही स्थळं उपेक्षित राहिली आहेत.

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात वन्यजीवांच्या अन्न, पाणी, निवारा या मूलभूत गरजा पूर्ण होत असल्यानं, वन्यप्राणी, पक्षी फार मोठ्या प्रमाणात येथे आहेत. वन्य प्राण्यांमध्ये मुख्यत: रानगवा, वाघ, बिबटे, अस्वल, चितळ, नीलगाय, मगर, लंगूर, मोर असे असंख्य प्राणी आहेत. पक्ष्यांच्या थव्यांमध्ये विशेषत: बारहेडेड गिस हा पक्षी, हिवाळ्यात लडाखमधून स्थलांतरित होऊन या क्षेत्रात येतो. ताडोबा उद्यानाच्या अतिलगत इरई धरणाचा जलाशय, पाणपक्ष्यांचा जणू स्वर्ग असावा इतका समृद्ध आहे ते विहंगम दृश्य नीरव शांततेत नयनरम्य भासतं. ताडोबा संरक्षित जंगलात काही ठिकाणी मचाण बांधलेली आहेत. या मचाणावर आपण जाऊन बसलात तरी संपूर्ण महिन्याचा थकवा आणि ताण आपोआप दूर होऊ शकतो. ताडोबाला प्रशिक्षित मार्गदर्शकांची सोय असल्यानं उद्यानातील सजीवसृष्टी, वनसंपदा, वन्य प्राण्यांची माहिती, त्यांच्या सवयी यांची माहिती मिळत असते आणि त्यामुळे निसर्गाशी नातं जोडण्याची धडपड, कोठे ना कोठे आपण

करत असतो. व्यवस्थापनाच्या दृष्टीनं मोहर्ली, कोळसा व रामदेगी या स्थळांचा विकास व्हायला हवा. मोहर्ली येथे पर्यटनसंकुल सर्वार्थानं परिपूर्ण आहे. चंद्रपूर जिल्ह्याचा हा अमूल्य वारसा जतन करणं, त्याचं संवर्धन व विकास करणं, जनजागृती करणं हे केवळ सरकारचं काम नसून विशेषत: चंद्रपूरवासीयांचं कर्तव्य आहे. श्रीलंकेमध्ये आमच्या अवलोकनात पर्यटकांच्या मनोरंजनासाठी ३०० लोक बसू शकतील एवढा मोठा हॉल, जंगलाच्या पायथ्याशी आहे. ढोलकीच्या तालावर आदिवासी मंडळी त्यांच्या गीतातून नृत्य करीत असतात. त्या नृत्यातून तत्कालीन संस्कृती व चालीरीती यांचं दर्शन घडत असतं. मोहर्लीच्या संकुलात जर असं सभागृह बांधलं, तर त्या स्थळांचा विकास निश्चितच होईल. ताडोबा जंगलाचे व्यवस्थापन आराखडे मंजूर झाले आहेत. व्यवस्थापकीय दृष्टीनं क्षेत्राचे तीन विभाग करण्यात आले आहेत– १) कोअर झोन, २) बफर झोन, ३) पर्यटन झोन. बफर झोनमध्ये मानवी व इतर पाळीव प्राण्यांचा हस्तक्षेप कमीत कमी ठेवायचा आणि पर्यटनविकास वन्य जीवांच्या आश्रयस्थळांना इजा न पोचवता करायचा आहे. त्यासाठी जंगल सफारी गेल्या पंधरा वर्षांपूर्वी करायचं ठरलं होतं. अजूनही ती जंगल सफारी अस्तित्वात नाही. वास्तविक पाहता, चंद्रपूर महाऔष्णिक केंद्र व ऑर्डनन्स हा ताडोबा जंगलाचाच भाग आहे. याचा कब्जा त्यांनी केल्यानं उर्वरित भागतरी या जंगलासाठी सुरक्षित ठेवायला हवा. चंद्रपूर जिल्ह्याचा हा अमूल्य वारसा जतन करणं, त्याचं संवर्धन व विकास करणं आजूबाजूच्या गावांमध्ये जनजागृती करणं व त्यांचं महत्त्व समजणं व समजावून सांगणं हेच तुम्हाआम्हा सर्वांचं कर्तव्य आहे.

चंद्रपूर जिल्ह्यात कोळशाच्या समृद्ध खाणी आहेत. त्यातील भूमिगत कोळशाच्या खाणी पर्यटकांना आकर्षित करण्याची स्थळं होऊ शकतील. १९६६ साली मी चांदा सिमेंट वर्क्स, एसीसी सिमेंट कारखान्यात असताना, जवळच डागांची कोळसा खाण होती. खाणीच्या भागापर्यंत पोचायला सुमारे ८०० ते १००० फूट आत जावं लागायचं. भूमिगत खाणीमध्ये फिरताना कोळसा खाणी उत्खननाची जिज्ञासा व साहस वाटत असे. मुंबईतून येणारे बरेचसे अधिकारी प्रामुख्यानं इंडियन अंडरग्राउंड माइन्स बघायला प्राधान्य देत असत. अमेरिकेत युनिव्हर्सल फोटो स्टुडिओमध्ये मानवनिर्मित असे बोगदे तयार केले आहेत व त्या ठिकाणी पर्यटकांचा मोठा लोंढा असतो. चंद्रपूर–बल्लारशाह भागात कोळशाच्या अशा भूमिगत खाणी तीन–चार तरी आहेत. वेकोलीनं पुढाकार घेऊन व आठवड्यातून एक दिवस तरी पर्यटकांकरता असे प्रकल्प हाती घेऊन, ते पाहण्याची परवानगी द्यावी. खनिजशास्त्राची शास्त्रशुद्ध वैज्ञानिक जिज्ञासा व निसर्ग आणि मानव यांचा संघर्ष असा एक वेगळाच आनंद पर्यटकांना मिळेल.

चंद्रपूर–गडचिरोली जिल्ह्यांत पुरातन स्मारकं बरीच आहेत. केंद्रीय पुरातत्त्व विभागातर्फे तशी त्यांना मान्यता आहे. स्मारकांचं जतन करण्याचं व त्यांचं संगोपन करण्याचं काम पुरातत्त्व विभागाच्या कक्षेत आहे. चंद्रपूर येथील महाकाली मंदिर, अंचलेश्वर येथील गोंड राजाची समाधी. माणिकगड, वैरागड, टिपागड, मार्कंडा, भद्रावती येथील पुरातन स्मारकं मान्यताप्राप्त आहेत. प्रत्येक स्थळाला एक इतिहास आहे. त्यांचं शिल्पकौशल्य अप्रतिम आहे. त्यामागे धार्मिक भावना गुंतलेल्या आहेत आणि त्यासारखी स्थळं चंद्रपूर, गडचिरोली जिल्ह्यांची अस्मिता आहे. त्यांचं जतन करायचं असेल, तर महाराष्ट्र व केंद्र सरकारकडे सतत लकडा लावून, या विभागात पुरातत्त्व विभागाचे उपसंचालक व महाराष्ट्र पर्यटन विभागाचे जिल्हा अधिकारी यांचं कार्यालय चंद्रपूरला आणणं आवश्यक आहे. या स्थळांचं संगोपन व त्यासाठी शासकीय मदत या कार्यालयामार्फत सुलभ होऊ शकेल. पर्यटन हा उद्योग आहे ही मूळ कल्पना जर आमच्या मनात रुजली, तर मला वाटतं, सबंध भारतातून या स्थळांकडे पर्यटकांना सहजपणे आकर्षित करता येईल. जेणेकरून सामाजिक संस्था, मोठे उद्योग आणि अर्थातच राजकीय इच्छाशक्तीच्या बळावर पर्यटनउद्योगाचा विकास होऊ शकतो.

आधुनिक काळातील तीर्थक्षेत्र 'आनंदवन' आहे. बाबांचा संदेश आहे, कर्तव्याच्या समाधानाची प्रशांत निद्रा हीच सर्वोत्तम प्रार्थना! आपल्या कर्मानं सोनेरी पानं लिहिणारा हा कवी–लेखक निष्काम कर्मयोगाची महती सांगतो. आनंदवनाची धुरा ताई आणि बाबा यांनी सांभाळली. तितकीच समर्थपणे डॉ. विकास व डॉ. भारती आमटे सांभाळतात. आनंदवन, महारोग्यांचे वसतिस्थान. उपेक्षेपासून अभिमानापर्यंतच्या प्रवासाच्या गाथेत, जगात कोठेही असं जिवंत उदाहरण नाही, की जिथे उपेक्षितांना अभिमानास्पद वाटावं, असं आदराचं स्थान मिळवलं आहे. आनंदवनाच्या तलावाकाठी वाढलेल्या झाडांवर, असंख्य पक्षी ताडोबाकडून आनंदवनात किंवा आनंदवनाकडून ताडोबाकडे हवामानानुसार भ्रमण करत असतात.

देखणे ते हात ज्यांना निर्मितीचे डोहळे या बा.भ. बोरकरांच्या उक्तीनुसार मागासलेपणाची ऐतिहासिक छाया असणाऱ्या या जिल्ह्यात, ज्या कष्टकरी हातांनी विश्वकर्म्याचा वसा घेऊन उद्योगांचा पाया घातला आणि चंद्रपूर जिल्ह्याला औद्योगिक प्रगतिपथावर नेण्यासाठी कष्ट घेतले; त्या सर्व कामगार तंत्रज्ञ, यंत्रज्ञ आणि उद्योजकांचे हात अजून बळकट करून, महाराष्ट्रात अग्रक्रम असा जिल्हा होण्यासाठी कटिबद्ध आहे.

*यशवंतराव कुळकर्णी इंजिनिअर असून स्वत: उद्योजक आहेत. महाराष्ट्रातील सर्वात पहिल्या सिमेंट प्रकल्पासाठी ते चंद्रपूर जिल्ह्यातील ए.सी.सी.चा कारखाना बांधण्यासाठी आले. रोटरीचे ३०३० चे पूर्व प्रांतपाल असून चंद्रपूर नागरिक मंचचे अध्यक्ष आहेत. उद्योगांचे संचालन त्यांची प्रयत्नपूर्वक तयारी व अंमलबजावणी, अडथळ्यांना तोंड देण्याची जिद्द, संशोधनाभिमुख दृष्टिकोन आणि चौफेर चिकित्सक दृष्टी आणि विषय प्रतिपादनासाठी लागणारे बळ या संवादातून व्यक्त होते.*

**– राजा बोझावार**
राजविलास, जुना वरोरा नाका,
चंद्रपूर – ४४२४०१

# चंद्रपूरदर्शन

**डॉ. अ.तु. काटकर**

प्रवासानिमित्ताने कुठल्याही गावाला गेलो, की तेथील प्रसिद्ध गोष्टींचे, वास्तूंचे, चर्चित स्थळांचे दर्शन ओघाने येतेच. आग्र्याला जाऊन ताजमहाल पाहिला नाही असे सहसा घडत नाही. साध्या गावातही त्या गावाच्या नावापेक्षा तेथील श्रीबालाजीचे किंवा श्रीमुरलीधराचे मंदिरच अधिक प्रसिद्ध असते. याच पार्श्वभूमीवर चंद्रपूरसारख्या ऐतिहासिक व पौराणिक शहराला, आसपासच्या परिसराला विशेष असे महत्त्व आहे.

पूर्वीचा अविभाज्य चांदा जिल्हा अखिल महाराष्ट्रात क्षेत्रफळदृष्ट्या अव्वलस्थानी होता. पुढे उभय जिल्ह्यांच्या मध्यभागातून वाहणाऱ्या वैनगंगा नदीला सीमारेषा ठरवून या जिल्ह्याचे विभाजन केले गेले. त्यातून वैनगंगेच्या पूर्वेकडील भाग गडचिरोली तर पश्चिमेकडील भाग चंद्रपूर म्हणून ओळखला जाऊ लागला.

चंद्रपूर शहरात कुणाही नवागताने प्रवेश केला की आधी त्याच्या डोळ्यांत भरतो तो येथील परकोट. साहजिकच आणखी येथे कोणकोणती प्रेक्षणीय ठिकाणे असावीत असा त्याला प्रश्न पडतो. त्यासाठीच हा लेखनप्रपंच!

आजचे 'चंद्रपूर' हे प्रचलित नाव पूर्वापार चालत आलेले नाव नव्हे. याबाबत इतिहासकारांच्या संशोधनातून पुढे आलेली माहिती अशी–

'कृतायुगात' या नगरीला 'लोकपूर' असे संबोधले जात असे. त्याकाळी या शहराचा विस्तारही बराच औरसचौरस होता. 'कृतध्वज'नामक राजाने हे नगर वसवल्याचा उल्लेख पुराणात सापडतो.

नंतरच्या द्वापारयुगात 'चंद्रहास' राजाच्या अमदानीत. या शहराला 'इंदुपूर' म्हणून ओळखले जात असे. संस्कृतभाषेत 'इंदू' या शब्दाचा अर्थ 'चंद्र' असा होत असल्याने या 'इंदुपूर'चा उल्लेख चंद्रपूर असाही अधूनमधून होत राहिला.

हिंदुस्थानचा शेवटचा बादशहा, बहादूरशाह जफर याचा पराभव करून ब्रिटिशांनी सारा हिंदुस्थान घशात घातला. पुढे स्वतःच्या सोयीसाठी व सुकर उच्चारासाठी म्हणून ब्रिटिशांनी काही गावांची नावेच बदलून टाकली. चंद्रपूरही याला अपवाद ठरू शकले नाही. ब्रिटिशांनी चंद्रपूरचे नाव 'चांदा' केले पण याच नावाने अन्य काही शहरांची नावे असल्याचे दिसून आल्याने नेमकेपण दर्शवण्यासाठी 'चांदा'चा उल्लेख 'चांदागढ' अर्थात 'चांदाफोर्ट' असा होऊ लागला.

**चांदा–चंद्रपूर**

स्वातंत्र्योत्तर काळात मध्यप्रदेश सरकारने आपल्या नव्या राजवटीत ब्रिटिशकालीन नावे बदलून ती पूर्ववत भारतीय वळणानुसारी करण्याचा जो स्तुत्य उपक्रम आरंभला त्यातूनच एलिचपूरचे 'अचलपूर' व 'भांदक' चे 'भद्रावती' असे मूळ नामकरण झाले. पण या फेरीत 'चांदा'चे चंद्रपूर व्हायचे राहूनच गेले.

चंद्रपूर येथे ४ व ५ फेब्रुवारी रोजी विदर्भ साहित्य संघाचे १२ वे साहित्य संमेलन भरले होते. या संमेलनाच्या खुल्या अधिवेशनात सर्वप्रथम पुनर्नामकरणाचा ठराव मांडून तो संमत करून घेण्यात आला. पुढे त्या ठरावाचा पाठपुरावा करण्यात येऊन तब्बल १४ वर्षांनी, १९६४ इ.स. साली, 'चांदा'चे 'चंद्रपूर' असे पुनर्नामकरण करण्यात आले. शासन मान्यता मिळाली व राजपत्रातून ह्या नव्या नावाचा उल्लेख पुढे कायम राहील असे जाहीर करण्यात आले. अशा या 'चंद्रपूर' नामक शहर आणि अवतीभवतीच्या स्थलदर्शनाचा – चंद्रपूर दर्शनाचा परिचय आता आपण करून घेऊ.

विपुल वनसंपत्तीने डवरलेला, आपल्या गर्भातून कोळसा आणि अन्य खनिजे पुरवणारा, उत्तम प्रतीचा तांदूळ पिकवणारा चंद्रपूर जिल्हा आपल्या अनेक वैशिष्ट्यांनी नटलेला आहे. भारत–चीन युद्धात देशाला सर्वाधिक सुवर्णदान करणारा हाच (अविभाजित) जिल्हा होता. या जिल्ह्यावर सृष्टीची अमाप मर्जी आहे. आसोला मेंढा, घोडाझरी, नलेश्वरी तलावाचा फेरफटका मारावा, येथील घनदाट जंगले पाहावीत. मार्कंडा, चंद्रपूर, बल्लारपूर, चिमूर, नेरी या शहरातील विस्मयचकित करणारी शिल्पे पाहावीत आणि त्या शिल्पांतून जुन्या पराक्रमाच्या कथांचे दर्शन घ्यावे असे आगळेवेगळे हे चंद्रपूर शहर नि हा चंद्रपूर जिल्हा.

समुद्रसपाटीपासून ७३१ फूट उंचीवर हे शहर असून उत्तर अक्षांस १९.५७ तर पूर्व रेखांश ७९.१७ वर वसले आहे. शहराच्या उत्तरेस असलेले चंद्रपूर औष्णिक विद्युत केंद्र हे आशिया खंडातील तिसऱ्या क्रमांकावरील विद्युतनिर्मिती केंद्र असून भद्रावती येथील चांदा आयुध निर्माण केंद्राचे स्थान देशाच्या संरक्षण कार्यात अनन्यसाधारण आहे.

**चंद्रपूरचा परकोट**

चंद्रपुरात प्रवेश करताना शहरासभोवती असलेला परकोट दुरूनच दिसू लागतो. या ऐतिहासिक परकोटाचा पाया गोंड राजवंशातील दहावा परंतु चंद्रपूर येथे राज्य करणारा पहिला राजा खांडक्या बल्लाळशहा याने इ.स. १४७२ च्या सुमारास घातला व आपली राजधानी बल्लारपूर येथून चंद्रपुरास हलवली.

राजाच्या पदरी असलेल्या तेल ठाकूर नावाच्या वास्तुषिल्पकाराने या परकोटाचा नकाशा तयार केला व साडेसात मैल परिघाची आखणी करून पायाभरणी केली. परकोटाचा पाया १२ फूट खोल असल्याची खात्री यापूर्वीच करून घेण्यात आली आहे. खांडक्याच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा हीरशहा याने काम सुरू केले. प्रथमतः परकोटाच्या चार वेशी उभारल्या. 'हत्तीवर आरूढ असलेला सिंह' हे शौर्याचे राजचिन्ह ठरवून, प्रत्येक वेशीवर बाजूस खोदवले. या शिल्पात सिंहाचे शरीरआकारमान हत्तीच्या दुप्पट दर्शवले गेले आहे.

हीरशहाचा नातू कर्णशहा याच्या कारकिर्दीत तटाची उंची केवळ अर्ध्यावर बांधून झाली. कर्णशहाचा नातू धुंड्या रामशहा (इ.स. १५९७ – १६२२) याच्या कारकिर्दीत परकोटाचे काम पूर्ण झाले. यानिमित्त मोठे वास्तुपूजन होऊन दानधर्म झाला. खांडक्याने सुरू केलेले काम त्याच्या सहाव्या पिढीत पूर्ण झाले. सव्वा कोट रुपये खर्च व सव्वाशे वर्षांचा कालावधी याच्या निर्मितीस लागल्याचे संशोधनातून पुढे आले आहे. तटाची उंची २० फूट (सुमारे) असून परीघ साडेसात मैल आहे. परकोटाचा आकार दीर्घ वर्तुळाकार असून पूर्व आणि दक्षिण बाजूला झरपट तर पश्चिमेस इरई नदी वाहते.

परकोटाला जटपुरा, अचलेश्वर, पठाणपुरा व बिनबा असे चार दरवाजे असून बगड, हनुमान, विठोबा, चोर व मसाण अशा पाच खिडक्या आहेत. खिडक्यांचा आकारही प्रचंड असून त्यातून ट्रक-ट्रॅक्टरची वाहतूक सहज होत असते. ही सर्व नावे भोसल्यांच्या अमलात पडली आहे. जटपुरा दरवाजावर गणेशराव जाट, अचलेश्वर दरवाजावर भानबा माळी, पठाणपुरा दरवाजावर अलीखान पठाण आणि बिनबा दरवाजावर बिनबा माळी जमादार होते. ते सगळ्या प्रकारच्या आवक-जावकाची नोंद ठेवत असत. त्यांच्याच नावावरून पुढे या दरवाजांना नावे देण्यात आली.

प्रत्येक दरवाजाच्या दोन्ही बाजूंना भव्य व प्रशस्त बुरूज आहेत. त्यावर चढण्यासाठी दगडी पायऱ्या आहेत. या सर्व दरवाज्यात सर्वांना उंच व अधिक देखणा आणि सौंदर्याने युक्त असा पठाणपुरा दरवाजा आहे. इतिहासकाळात चंद्रपूरचा संपर्क मोगलाई व निजामशाहीशी अधिक येत असे. त्यामुळे वाहतुकीची मदार याच दरवाजावर होती. त्यामुळे चंद्रपूर शहराचे तेच प्रमुख द्वार होते. पुढे ब्रिटिशकाळात रेल्वे आली व नागपूर -पुणे- मुंबई- दिल्ली-चेन्नईशी कालान्वये संपर्क वाढला, तसतसे पठाणपुरा दरवाजाचे महत्त्व कमी होऊन जटपुरा दरवाजाचे महत्त्व वाढले. आज सर्व वाहतूक जटपुरा दरवाजानेच होते. तेच शहराचे प्रमुख प्रवेशद्वार आहे.

पठाणपुरा दरवाजाच्या बाहेर इरई व झरपट नदीचा संगम आहे. या नद्यांचा व येथील संगमाचा उल्लेख वाकाटक नृपती द्वितीय प्रवसेनच्या एका ताम्रपटात आला असल्याचे इतिहासकार सांगतात.

संगमाच्या बाजूलाच माना टेकडी असून या टेकडीच्या बाजूलाच एका लहान टेकडीत खडकात कोरलेल्या काही गुहा असल्या तरी त्यास ऐतिहासिक महत्त्व नाही.

चंद्रपूरपासून तेरा किलोमीटर अंतरावर दक्षिणेस असलेल्या बल्लारपूर येथे राज्य करत असलेल्या खांडक्या बल्लाळ या गोंड राजाचा त्याकाळी आपल्या प्रांतावर वचक होता. परंतु या शूरवीर आणि गुणसंपन्न राजाच्या संपूर्ण शरीरावर एका असाध्य रोगाचा प्रभाव पाडून, त्याचे सर्वांग खांडकांनी (फोड) व्यापले होते. या खांडकांचे रूप काहीसे कुष्ठासारखे होते. खांडक्याची राणी सुंदर, सुलक्षणी व पतिभक्तपरायण होती. पतिसेवेबरोबरच आपल्या पृथ्वीमोलाच्या पतीची काया पूर्ववत व्हावी म्हणून तिने अनेक नवस-सायास केले, व्रतवैकल्ये केली पण गुण येईना. पुढे बल्लारपूर-चंद्रपूर यांच्या मध्यावर असलेल्या व वनश्रीने नटलेल्या जुनोना या गावाची, निवड राजाच्या हवापालट व विश्रांतीसाठी केली गेली. तेथे तलाव आधीचाच होता. त्याची दुरुस्ती करून जवळच बंगला बांधला. राजाराणी तेथे विश्रांतीसाठी जात.

खांडक्या बल्लाळ राजाला मृगयेची आवड होती. मनात आले की तो आपल्या निवडक रक्षकसाथीदारांसह मृगयेस निघत असे. अशाच एका वैशाखमासी तो मृगयेसाठी निघाला असताना भटकतभटकत चंद्रपूरलगतच्या झरपट नदीकाठी आला. दिवस उन्हाळ्याचे होते. नदी अगदीच उथळ होती. त्याला तहान लागली होती. पण पाणी कुठेच दिसेना. सर्वत्र शोधाशोध केली तेव्हा नदी कोरडी असूनही जवळच्याच एका खोबणीत थोडेसे पाणी असल्याचे दिसून आले. म्हणून राजा तिकडे वळला. तेवढ्याशा पाण्याने तहान भागणार नव्हती तरी निकड म्हणून तो ते पाणी प्याला. खोबणीतले ते पाणी घेऊनही ती पुन्हा जशीच्या तशी पाण्याने भरली. असे वारंवार झाले. तहान भागली तरी खोबणी पाण्याने भरलेलीच. म्हणून राजाने त्याच पाण्याने तोंड-हात धुतले. चेहरा व मानेवरून ह्या पाण्याचा हात फिरवला. त्यास एकदम प्रसन्न वाटू लागले. ताजातवाना होऊन तो परतीसाठी निघाला तेव्हा एक शिकारही मिळाली. ती घेऊन तो राजवाड्यात आनंदाने परतला. राणी प्रतीक्षेत होतीच. जेवणखाण आटोपून सर्व निद्राधीन झाले.

राणी सकाळी उठल्यावर पाहते तो राजाच्या चेहऱ्यावरील खांडके व डाग जाऊन सारं शरीर पूर्वीप्रमाणे सामान्य दिसलं. धावत जाऊन राणीनं आरसा आणून राजास त्याचं रूप दाखवलं. त्यालाही आश्चर्य वाटलं. हे सारे घडण्यामागे कालच्या त्या पाण्याचाच प्रभाव असावा असं त्याला वाटलं. त्यानं ती सगळी हकिगत राणीला सांगितली. तशी राणीची उत्सुकता वाढली. दुसऱ्याच दिवशी

राजाराणी लवाजमा घेऊन निघाले, पण ते स्थळ लवकर मिळेना. सापडल्यावर राणीनं ते नीट न्याहाळून ती जागा सुंदर व स्वच्छ करवून घेतली. तेव्हा खाली गाईच्या खुराच्या आकाराचं छिद्र दिसलं. तिथून कितीही पाणी काढलं तरी ते तुटता तुटत नव्हतं. राणीनं त्याच पाण्यानं राजाला न्हाऊ घातलं. व्हायचा तो परिणाम होऊन राजा त्या त्वचारोगातून कायमचा मुक्त झाला. सारं शरीर स्वच्छ, व्रणमुक्त व निरोगी झाले. असाध्यास साध्य करणारं ते पाणी राजाराणीसाठी तीर्थासम श्रद्धापात्र ठरलं.

राजवाड्यात परतल्यावर काही दिवसांतच महादेवानं राणीच्या स्वप्नात येऊन दर्शन देऊन ती अचल पिंड असल्याचं सांगितलं व ती तिथेच प्रस्थापित करण्याचा आदेश दिला. महादेव म्हणाले, ''भुयारात 'देवी पार्वती' महाकाली रूपात असून तिथेसुद्धा असंच उत्थापन करून मंदिर निर्माणाचे कार्य करावं!''

दृष्टांत संपला. सकाळी ही हकिगत राणीनं राजाला सांगितली. राजाची उत्कंठा वाढली. शोध घेऊन पुढे दोन्ही ठिकाणी त्यानं मंदिरनिर्मिती केली. आठवड्यातील शिव-पार्वतीच्या सोमवार - मंगळवार या दिवशी ते नित्यनेमानं तिथे दर्शनास जाऊन पूजा करू लागले. भारतभरातील सगळ्या शिवमंदिराची नावं 'ईश्वर' शब्दानं ओळखली जातात. घृष्णेश्वर, पाताळेश्वर, सिद्धेश्वर... तसं हे 'अंचलेश्वर' म्हणून ओळखलं जाऊ लागलं.

अंचलेश्वर दरवाजातून बाहेर पडताच डाव्या बाजूस शिवाचं तर नदी ओलांडून पुढे उजवीकडे शक्तीचं (महाकाली) दर्शन घडतं. श्रीमाता महाकाली ही चंद्रपूरची नगरदेवता आहे.

**श्री महाकाली मंदिर**

खांडक्या बल्लाळानंतर राजा बीरशहा गादीवर आला. त्यास एका युद्धात अनपेक्षित जय मिळाला. या यशासाठी स्वारीवर निघण्यापूर्वीच माता महाकालीला साकडं घालून तो नवस बोलला होता. मनोवांछित घडल्यानं मोठ्या आनंदानं त्यानं मंदिरासाठी बांधकाम सुरू केलं. त्याच्या पश्चात राणी हिराईनं ते पूर्णत्वास नेलं.

महाकाली मंदिराच्या तळघरात पाच फूट उंचीची देवीची मूर्ती आहे. मूर्तीच्या मागील बाजूस आणखी एक तळघर असून तिथे पलंग ठेवला आहे. मातेश्वरी तिथे विश्राम करते अशी भक्तांची धारणा आहे. गच्चीवर जाण्यासाठी बांधकामाच्या भिंतीमधूनच दोन चक्राकार जिने (पायऱ्या) आहेत.

मातेश्वरीला प्रत्येक मंगळवारी-शुक्रवारी आणि विशेष प्रसंगी व नवरात्रीत साजशृंगार चढवला जातो. चैत्रनवरात्रीत देवीचा गाभारा, मंदिर आणि परिसरात चैतन्य सळसळत असतं. चैत्रपौर्णिमेस त्रिपूर चेतवला जातो. इथे महिनाभर यात्रा चालते. दूरदुरून भाविक येतात. पूर्वी मराठवाड्यातील नांदेड परिसरातून भाविक 'पोहा' घेऊन दर्शनास येत. चार दिवस राहत व महापूजा बांधूनच परत जात असत.

महाकाली मंदिरात देवीपुढे गाभारा, त्यापुढे सभामंडप, स्तूप व यज्ञकुंड असून, पूर्वी इथे पशुबळीही दिला जात असे. आता हा प्रकार काही प्रमाणात कमी झाला आहे. मंदिरासभोवती छोटासा परकोट असला तरी त्याचं पूर्ववैभव कालजमा झालं आहे. येथील मंदिराचं वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक स्त्री -पुरुष भक्ताला मातेपर्यंत जाता येऊन स्वहस्ते ओटी भरता येते व चरणस्पर्शही करता येतो.

**हडवाडा (बीरशहाची समाधी)**

अचलेश्वर मंदिरातून बाहेर पडताना उजव्या हाताला, आतल्या बाजूस एका छोट्या परकोटात हे ठिकाण आहे. दारातून आत प्रवेश करताच गोंड राजाची समाधी दिसते. हा भाग चंद्रपूर येथील पेंशनर राजे यादवराव यांच्या मालकीहक्कात अनेक वर्षं राहिला.

दारातून आत प्रवेश करताच एक टोलेजंग समाधी दिसून येते. ती राजा बीरशहा (मृत्यू इस १६७२) याची आहे. राजा बीरशहाचा त्याच्या रजपूत अंगरक्षकांकडून खून झाला. ही समाधी त्याची राणी हिराइनं बांधली. इमारत प्रमाणबद्ध व सुदंर आहे. उत्कृष्ट शिल्पकलेचा आदर्श नमुना म्हणून याकडे पाहिल्या जाते. त्याची एक संगमरवरी प्रतिकृती नागपूर येथील म्युझियममध्ये ठेवली आहे. या समाधीच्या तुलनेत, इतकी सुंदर व टोलेजंग वास्तू नागपूर प्रदेशात तरी दुसरी नाही.

समाधीचं बांधकाम मोगल पद्धतीचं आहे. आत मध्यभागी थडग्याचा चबुतरा होता. तो कोणीतरी धनाभिलाषेने उद्ध्वस्त केला आहे.

फारसी इतिहासात बीरशहाचा उल्लेख आला आहे. औरंगजेब दक्षिणेचा सुभेदार असताना बीरशहाचे त्याच्याशी मैत्रीचे संबंध होते. एकदा जटाशंकर हत्तीच्या प्रकरणात औरंगजेबावर तोहमत आली असता बीरशहानं उत्कृष्ट साक्ष देऊन औरंगजेबावर असलेला शहाजहाँनचा राग व संशय दूर केला होता. इथे बीरशहाच्या समाधीव्यतिरिक्त इतरही आणखी काही समाध्या आहेत.

**गोंडराजाचा राजवाडा**


येथील परकोटाच्या आत राजानं आपला राजवाडा बांधला असून त्याचं बांधकाम काहीसं बालेकिल्ल्यासारखं आहे. चंद्रपूर ब्रिटिशांच्या ताब्यात गेल्यानंतर त्याचं रूपांतर ब्रिटिशांनी कारागृहात केलं. आज हा राजवाडा जिल्हा कारागृहाच्या रूपात उभा आहे.

या वाड्यात कारागृह असलेल्या विहिरीचं पाणी पूर्वीपासूनच अतिशय पाचक असून, कारागृहात येणारा कैदी दोन-चार महिन्यांतच धष्टपुष्ट होऊन बाहेर पडतो.

विहीर वैशिष्ट्यपूर्ण चौकोनी रूपात असून तिची खोली भरपूर आहे. विहिरीत उतरण्यास पायऱ्या असून आत तीन मजले आहेत. प्रत्येक मजल्यावर दालन आहे. विहिरीतून गुप्तमार्ग असल्याच्या खाणाखुणा आजही स्पष्ट दिसून येतात. राजाला दगाफटका झाल्यास गुप्त मार्गानं तेथून पसार होण्यासाठीची ही योजना असावी.

# चंद्रपूरदर्शन...


१. महाकाली मंदिर
२. राजा बीरशहा समाधी
३. मार्कंडी देवालय समूह
४. गोंड राजचिन्ह
५. पठाणपुरा दरवाजा












आनंदवन

# चंद्रपूर : एक पर्यटन

महाराष्ट्राची ओळख एक औद्योगिकदृष्ट्या पुढारलेले राज्य, ही जशी आहे तशीच ओळख पर्यटनाच्या नकाशावरही आहे. भारतातील अन्य राज्यांच्या तुलनेत पर्यटनाच्या विविध संधी उपलब्ध असलेले एकमेव राज्य असे महाराष्ट्राचे वर्णन केल्यास वावगे ठरू नये. ह्या राज्याला ७२० कि. मी. लांबीची नयनरम्य किनारपट्टी, वनश्रीने नटलेली थंड हवेची ठिकाणे, गडकिल्ले, लेणी–गुंफा, विविध धार्मिक स्थळे, वन्यजीवसृष्टी इ. चे वरदान लाभले आहे. म्हणूनच महाराष्ट्र अमर्याद पर्यटन संधी असलेले राज्य आहे. त्यातील बहुतांश जिल्ह्यामध्ये काही ना काही पर्यटनाशी संबंधित बाबी उपलब्ध आहेत.

विदर्भातील चंद्रपूर हा असाच एक जिल्हा आहे. महाराष्ट्राच्या पूर्वेस असलेला हा जिल्हा अनेक गोष्टींसाठी प्रसिद्ध आहे. चंद्रपूरचे पूर्वीचे नाव 'चांदा'. चंद्रपूर ही गोंड राजाची राजधानी होती. नंतर १७ व्या शतकात नागपूरच्या भोसल्यांनी चंद्रपूरवर ताबा मिळविला. सन १९८१ मध्ये त्या प्रदेशातून गडचिरोली हा वेगळा जिल्हा बनविण्यात आला. हा जिल्हा वैनगंगा आणि वर्धा ह्या नद्यांच्या पात्रांदरम्यान वसला आहे. कडक मोठा उन्हाळा आणि सौम्य थंडी हे येथील हवामान वैशिष्ट्य. सुमारे १०,४९० चौ. कि. मी. क्षेत्र असलेल्या ह्या जिल्ह्यात मराठी भाषेच्या जोडीला गोंडी आणि हिंदी ह्या भाषादेखील प्रचलित आहेत.

त्या जिल्ह्यात अनेक महत्त्वाचे उद्योग जसे कागद निर्मिती, सिमेंट कारखाने, विद्युत निर्मिती, कोळसा खाणी तर आहेतच पण ताडोबा व्याघ्रप्रकल्प आणि वरोरा येथील बाबा आमटेंचा 'आनंदवन' प्रकल्प ह्याच जिल्ह्यात आहेत.



ताडोबा – अंधारी व्याघ्रप्रकल्प





भद्रावती जैन मंदिर



महाकाली मंदिर

## पर्यटकांनी भेट देण्यासारखी ठिकाणे :

**ताडोबा – अंधारी व्याघ्रप्रकल्प –** हा केवळ महाराष्ट्रातील नाही तर देशातील महत्त्वाच्या व्याघ्रप्रकल्पांपैकी एक आहे. सुरुवातीला केवळ ताडोबा क्षेत्रापुरता मर्यादित असलेला हा प्रकल्प त्याला अंधारी अभयारण्याचेही क्षेत्र जोडल्याने 'ताडोबा–अंधारी व्याघ्रप्रकल्प' झाला. आता ह्यात ताडोबा अभयारण्याचे ११६.५५ चौ. कि. मी. क्षेत्र अधिक अंधारी अभयारण्याचे ५०८.८५ चौ. कि. मी. क्षेत्र असे एकूण सुमारे ६२५ चौ. कि. मी. क्षेत्र येते. ह्या व्यतिरिक्त ह्या प्रकल्पाच्या सभोवती सुमारे ११०१.७७ चौ. कि. मी. चे क्षेत्र संरक्षित क्षेत्र (बफरझोन) म्हणून राज्य शासनाच्या एका अधिसूचनेद्वारे निर्माण करण्यात आले आहे. ह्यात


सुमारे ७९ गावांचा अंतर्भाव आहे. ह्या अभयारण्याला भेट देण्यासाठी वनखात्याने वाहनांची सोय केली आहे. आधी नोंद करून निर्धारीत शुल्क भरून त्यातून वाघ आणि अन्य प्राणी दर्शनासाठी जाता येते. अभयारण्याच्या सिमेवरच मोहर्ली येथे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचा पर्यटक निवास पर्यटकांना उपलब्ध होऊ शकतो.

**आनंदवन** – समाजाने वाळीत टाकलेल्या एका वेगळ्या अर्थाने 'अस्पृश्य' असलेल्या लोकांना एका नवीन जीवनाची दिशा देणारे त्यांना आत्मनिर्भर बनविणारे, कुष्ठरोग्यांच्या सेवेसाठी असलेले 'आनंदवन' हे ह्याच जिल्ह्यात वरोरा तालुक्यात आहे. एका सधन कुटुंबात जन्मलेले, उच्च विद्याविभूषीत असलेले मुरलीधर देवीदास उर्फ बाबा आमटे यांनी कुष्ठरोगासारख्या महाभयंकर रोगाने पिडीतांच्या सेवेचे अति कठीण व्रत स्वीकारले. त्याच प्रेरणेतून १९५१ साली वरोरा येथे 'आनंदवना'ची स्थापना झाली. कुष्ठरोग्यांची केवळ सेवाच न करता त्यांना आत्मनिर्भर बनविण्याचे अवघड काम त्यांनी केले. त्यासाठी हातमाग, सुतारकाम, लोहारकाम, कुक्कुटपालन इ. आर्थिक स्वावलंबनाचे मार्ग त्यांना दाखविले. त्यांच्या ह्या कार्याबद्दल त्यांना अनेक राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाले.

**भद्रावती जैन मंदिर** – चंद्रपूरपासून ३२ कि. मी. आणि नागपूरहून १३० कि. मी. असलेल्या ह्या ठिकाणी हे प्राचीन जैन मंदिर आहे. त्यातील कोरीवकाम पाहण्यासारखे आहे.

**महाकाली मंदिर** – गोंड राजा खांडक्या बल्लारशहा याने बांधायला घेतलेले मंदिर त्याच्या पत्नीने बांधून पूर्ण केले. चंद्रपूर शहरात इरई नदीच्या किनाऱ्यावर हे अतिशय सुंदर मंदिर पाहायला मिळते. महाकाली देवीची वार्षिक यात्रा येथे भरते.

**इरई तलाव** – चंद्रपूरपासून १८ कि. मी. आणि नागपूरपासून १७३ कि. मी. असलेले हे धरण तलाव औष्णिक विद्युत प्रकल्पासाठी तयार करण्यात आले. याच्याभोवती नयनरम्य वनश्री आहे.

**घोडाझरी तलाव** – नागभीड–चंद्रपूर रस्त्यावर दाट अशा जंगलात हा प्रचंड तलाव आहे. सर्व प्रकारच्या जलक्रिडांसाठी प्रसिद्ध आहे.

**माणिकगड** – यादवकालीन १००० मीटर उंचीच्या ह्या किल्ल्यावर ३ मीटर लांबीची तोफ आहे. हा किल्ला चंद्रपूर पासून ३५ कि. मी. वर आहे.

**नलेश्वर तलाव** – हा तलाव नलेश्वर मध्यम प्रकल्पाचा एक भाग आहे. येथील नयनरम्य देखावे पर्यटकांचे मन मोहवून टाकतात. हा तलाव चंद्रपूरपासून केवळ ३५ कि. मी. अंतरावर आहे.

जिल्ह्यातील ह्या ठिकाणांशिवाय शेजारील गडचिरोली जिल्ह्यातील मार्कंडा येथील शिल्पे आणि चपराळा अभयारण्य ह्या ठिकाणांनाही भेटी देता येतील.

■ ■ ■



## चंद्रपूरदर्शन...

१. पहिले शासकीय
ज्युबिली हायस्कूल, १९०६
२. चंद्रपूर महाऔष्णिक वीजकेंद्र
३. राजीव गांधी
अभियांत्रिकी महाविद्यालय
४. जिल्हा परिषद चंद्रपूर
५. गांधी चौक, नगरपरिषद
६. दीक्षाभूमी



















## नव्या चंद्रपूरचे शिल्पकार



साधनाताई आणि बाबा आमटे



चंद्रपूर साहित्य संमेलनाचे
स्वागताध्यक्ष
चंद्रपूरभूषण
शांताराम पोटदुखे



डॉ. विकास आमटे



डॉ. कीर्तिवर्धन दीक्षित

विहिरीच्या मागे गैबीशाह नावाच्या पीर बाबांची समाधी असून दरवर्षी मोहरमला इथे बाबांच्या दर्शनासाठी सवाऱ्या आणल्या जातात. तेव्हा जनतेसाठी हे कारागृह दर्शनार्थ मोकळं ठेवलं जातं. राजवाड्याची अंतर्गत भव्यता प्रत्यक्ष अवलोकिल्यानंतरच मनात ठसते.

**गंगासिंगाची समाधी**

गंगासिंग जाट याचं पूर्ववृत्त अज्ञात असल्याचं इतिहासकार सांगतात. नागपूरच्या गादीवर आप्पासाहेब भोसले विराजमान झाल्यावर त्यानं आपला एक विश्वासू कारभारी गंगासिंग जाट यास चंद्रपूर इथे किल्लेदार नेमलं. त्याचा व्याही गणेशराव जाट जटपुरा दरवाजावर पहारेदार होता. आप्पासाहेबानं तैनाती फौजेचा तह मोडून बंडावा केला. तेव्हा त्यास व त्याचा मित्र द्वितीय बाजीराव पेशवे या दोघांना चंद्रपूरच्या किल्ल्यात आश्रय घेता येऊ नये म्हणून कॅप्टन स्कॉट यानं किल्ल्यास वेढा दिला. माना टेकडीवरून तोफा डागताच परकोट ढासळला. इंग्रज लष्कर आत घुसलं. मात्र या झटापटीत पठाणपुरा दरवाजावरील जामदार अलीखान पठाण यानं तोफेच्या एका गोळ्यानं मेजर कोरहॅमला ठार केलं. नंतर मराठ्यांचा प्रतिकार मोडत इंग्रज फौज आत घुसली. गंगासिंगाच्या कचेरीसमोर (सध्याचं शहर पोलिस ठाणं) हातघाईची लढाई होऊन गंगासिंग ठार झाला. प्राण सोडण्यापूर्वी त्यानं अलीखानाचा गौरव करून, त्यानं दाखवलेल्या बहादुरीबद्दल त्यास बक्षीस दिले. अलीखान जिवंत होता. गंगासिंगाची समाधी जटपुरा दरवाजाच्या बाहेर श्री. महादेवसिंगजी ठाकूर (दीक्षित) यांच्या घरासमोर आहे. मात्र गोंडराजाच्या समाधीवर जशी छत्री (बांधकाम) आहे, तशी इथे नाही. ही समाधी छोटी व अत्यंत साध्या रूपात आहे. समाधीच्या मागे महादेवाचे मंदिर आहे. देऊळ व समाधी गंगासिंगाची सून रत्नमालाबाई हिनं बांधलं. लढाईनंतर सर्व निरवानिरव झाल्यावर रत्नाबाईनं समाधी बांधली असावी. पण देऊळ मात्र इ.स. १८५२ साली बांधलं आहे. महादेवाच्या देवळात दरवाजाच्या दोन्ही बाजूंस भिंतीत कोरलेले दोन शिलालेख आहेत. त्यावरून वरील माहिती मिळते.

**दशमुखी दुर्गा व इतर मूर्तिसमूह**

वर्तमान राजीव गांधी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मागील परिसरात असलेल्या मूर्तिसमूहास पाहून आश्चर्यानं बोटं तोंडात घालावयास लावणाऱ्या या कलाकृती आहेत. त्या पाहिल्यानंतर पूर्वीच्या काळी गोंडवनातील शिल्पकला किती प्रगत होती याची साक्ष पटते.

आवाराच्या फाटकातून आत प्रवेश करताच जमिनीवर सपशेल निद्रिस्त असलेली एक २६ फूट लांब व १८ फूट रुंद व ३ फूट जाड अशी, सर्वांत मोठी मूर्ती आहे. तिला दहा तोंडं आहेत. त्यामुळे रावण समजून पूर्वी दरवर्षी विजयादशमीला सीमोल्लंघन केल्यानंतर लोक बहुसंख्येनं त्या मूर्तीवर दगडफेक करत असत. त्यामुळे ती काहीशी

विद्रूप झाली आहे. दशमुखी दुर्गा, महिषासुर मर्दिनी, मत्स्यावतार, कूर्मावतार, शिवलिंग, नंदी, हत्ती, गणेश, मारुती, कालभैरव, दोन नागिणींसह शेषशायी, चतुर्भुज शंकर, दिगंबर शिव, गरुड, द्वारपाल असा एकूण १५ मूर्तींचा समूह इथे आहे.

**बल्लारपूरचा किल्ला**

चंद्रपूर शहरापासून बल्लारपूर शहर १३-१४ किलोमीटर अंतरावर असून खांडक्या बल्लाळ राजानंच येथील वर्धा नदीच्या तीरावर किल्ला बांधवला. त्यात तो राहत असे. ही वास्तू आज भग्नावस्थेत आहे. तरी तो किल्ला आणि सभोवतीच्या परिसराकडे पाहताना त्या काळाचे स्मृतिशेष अजूनही वातावरणात विहार करत असल्याचा भास होतो. किल्ल्याच्या भिंतीवरून वर्धानदीचं पात्र व क्षितिजापर्यंत चौफेर पसरलेली भूमी अवलोकन करताना किल्ल्याकरता किती योग्य अशा जागेची निवड केली होती हे आजही प्रत्ययास येतं.

**आनंदवन व सोमनाथ : आधुनिक तीर्थक्षेत्रं**

इ.स. १९५० साली प्रारंभ झालेले वरोरा येथील जगप्रसिद्ध 'आनंदवन' म्हणजे आधुनिक तीर्थक्षेत्रच! पूजनीय साधनाताई आणि बाबा आमटे यांच्यापासून सुरू झालेलं कुष्ठरोग्यांचं हे सेवाकेंद्र आज आमटे परिवारातील तिसऱ्या पिढीपर्यंत अव्याहत सुरू आहे.

निरपेक्ष सेवाभावनेची ज्यांना मनस्वी आवड आहे अशांनी येथील पुण्यप्रद सेवाभाव पाहून कृतकृत्य व्हावं. या सेवाकार्याला जगाच्या पाठीवर तोड नाही. 'आनंदवन ' चंद्रपूर-नागपूर मार्गावर चंद्रपूरपासून ४५ किमी अंतरावर तर सोमनाथ ५० किमी. अंतरावर (मूल तालुक्यात) आहे.

**श्रीक्षेत्र मार्कण्डा**


चंद्रपूरपासून ७० किलोमीटर अंतरावर मार्कण्डा नावाचं गाव वैनगंगेकिनारी वसलं असून इथे वैनगंगा उत्तर वाहिनी आहे. वैनगंगेच्या काठावर मार्कण्डेय ऋषीचं हेमाडपंती मंदिर आहे. हे स्थान प्राचीन देवळांकरता प्रसिद्ध असून, परिसरात एकूण १५ देवळं आहेत. येथील मुख्य मंदिर शिवाचं असून दरवर्षी शिवरात्रीला मोठी यात्रा भरते. शिल्पकृतींवरून वाटतं, हे मंदिर दहाव्या किंवा अकराव्या शतकात बांधलं गेलं असावं. मुख्य शिवमंदिरावर तडिताघात झाल्यानं देवळाचा कळस कोलमडून सभामंडपावर पडल्यानं सभामंडपही बराचसा भग्न पावला आहे. राणी हिराईनं तो आपल्या कारकिर्दीत पुन्हा बांधून, त्याचा जीर्णोद्धार केल्याचं सांगितलं जातं. सदर मंदिराबद्दल अनेक दंतकथा असून शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना म्हणून या मंदिराकडे पाहिलं जातं. प्रख्यात वास्तुशिल्पअभ्यासक गो.बं. देगलूरकर यांचा अभ्यासपूर्ण ग्रंथ यावर प्रसिद्ध असून, हे तीर्थक्षेत्र सध्या गडचिरोली जिल्ह्यात आहे.

**भद्रावती**

चंद्रपूरपासून साधारणत: २८ किलोमीटर अंतरावरील, चंद्रपूर-नागपूर मार्गावरील हे गाव. पुरातनकाळी ती यौवनाश्व राजाची राजधानी असल्याचं इतिहास संशोधक सांगतात. त्याचे अवशेष आजही दृष्टोत्पत्तीस येतात, त्यावरून हे सत्य मानण्यास हरकत नाही. बौद्धकालीन युगात सांची-नालंदासारखी जी विद्यापीठं निर्माण झाली तशी इथेही मोठ्या प्रमाणात झाली असावी. भद्रावतीपासून काही अंतरावर विद्यासन नावाची टेकडी असून तेथील बुद्धांच्या मूर्ती व सभामंडप या गोष्टींची आजही साक्ष देतात.

पुरातन काळापासून इथे असलेलं श्री भद्रनागोबा मंदिर



**प्रवीण बर्दापूरकर** यांची प्रकाशित झालेली दोन पुस्तके




**दिवस असे की...**

**मूल्य २२५ रु.**

**सवलतीत १३५ रु.**




**नोंदी डायरीनंतरच्या**

**मूल्य २०० रु.**

**सवलतीत १२० रु.**

भाविकांसाठी श्रद्धास्थानी आहे. लग्न, मुंज, जावळेफेड आदी धर्मप्रकार येथे सदैव चालतात. रविवारी इथे बरीच गर्दी असते.

**श्री पार्श्वनाथ मंदिर**

भद्रावतीचं आणखी एक आकर्षण म्हणजे श्री पार्श्वनाथ मंदिर. जैनबंधूंनी ते बांधलं असून तीर्थंकराचं ते स्थानक म्हणून देशभर विख्यात आहे.

चिमूरचा घोडा,
चंद्रपूरचा वडा,
चिमूरचा घोडा, ब्रह्मपुरीचा जोडा, भद्रावतीचा सिंगाडा
जगन्नाथाचा भात, जग पसारे हात!

अशी जुनी म्हण आजही प्रचलित आहे. चिमूरचा घोडा की घोड्याचं चिमूर असा संभ्रम निर्माण व्हावा असं येथील श्री बालाजीचे मंदिर प्रवेशद्वार पाहिलं असता वाटतं. कधीकाळी, या ठिकाणी किल्ला असावा पण त्याची एकही भिंत आज इथे शिल्लक नाही. उंचवटा तेवढा मात्र कायम आहे.

तीर्थस्थान म्हणून चिमूरची पूर्वी फार प्रसिद्धी होती. सुमारे साडेतीनशे वर्षांपूर्वी श्री व्यंकटेश्वराची मूर्ती येथील भिकू पाटील डाहुले घराण्याच्या गृहस्थाला, घरी गोठा बांधण्यासाठी पायवाट खोदताना सापडली. त्यावर साधं झोपडं उभारण्यात आलं. पुढे सखाराम, देवाजी, विठ्ठल यांपैकी एका भावंडाला स्वप्नात दृष्टांत देऊन व्यंकटेश्वरानं, ''आपण स्वयंभू असून आपली स्थापना केली जावी व मंदिर बांधावं, लागणारा पैसा राजाश्रयाकडून प्राप्त करावा,'' असे सांगितलं, अशी आख्यायिका आहे.

मंदिराची रचना अवर्णनीय आहे. दर्शनीभागावरील महाद्वार, आत सभोवताल परकोट तर चार कोनांस चार बुरूज आणि ध्रुवताऱ्याचं लक्ष वेधणारा सभामंडप पाहून मन सुखावतं. परकोटास पूर्व व पश्चिमेला प्रवेशद्वार असून तिथेही बुरूज आहे. सभामंडपातील लाकडी कोरीवकाम अतिशय कलात्मक आहे.

आतील गाभाऱ्यातील पाषाणस्तंभांनी मंडित केलेला मंडप उत्कृष्ट स्थापत्यकलेचं दर्शन घडवतो.

**नेरीचे हेमाडपंती देवालय**

जिल्ह्यातील चिमूर, भिसी व महादवाडी ह्या पुण्यपावन क्षेत्राच्या परिसरांत, मेडूर नदीच्या तीरावर वसलेल्या नेरी इथे तलावाच्या काठावर एक पुरातन हेमाडपंती शिवमंदिर असून ते प्रेक्षणीय आहे. देवालयाचा घुमट अतिशय कोरीव-रेखीव आहे. तलावाच्या पायऱ्या दगडांनी बांधल्या आहेत. मंदिराचा सभामंडप पाषाणाचा असून मूर्तीची घडण कौशल्यपूर्ण आहे. मंदिर परिसरात अनेक संत-महात्म्यांनी आपली साधनापूर्ती करून घेतल्याचा इतिहास आहे. कोलारीचे एकनाथ व कापसीचे नानाजी महाराज तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ह्या साऱ्यांचं बालपण ह्याच नेरीच्या परिसरात गेलं. जवळच राष्ट्रसंताचं 'तपोधाम' गोदोडा हे महत्त्वाचं ठिकाण आहे. गोंदोडा येथील गुंफेत बसूनच महाराजांनी परमात्मस्वरूपाची प्राप्ती करून घेतली.

**चिमूरचं हुतात्मा स्मारक**

येथील हुतात्मा स्मारक अखिल भारतात आपलं वेगळेपण राखून असून, येथील ऑगस्ट क्रांतीच्या घटनेशी निगडीत आहे.

अब काहे को धूम मचाते हो?
दुखवाकर भारत सारे!
आते है नाथ हमारे!
झाड-झडूले शस्त्र बनेंगे,
भक्त बनेगी सेना!

ऑगस्ट १९४२ मधील राष्ट्रसंतांच्या या वीर रसात्मक काव्यानं राष्ट्राभिमानाचं स्फुल्लिंग चेतवलं गेलं. जनता पेटून उठली. यात कुमार बालाजी रायपूरकर हा बालक पहिला शहीद ठरला. समस्त हिंदुस्थानात ब्रिटिशसत्ता नांदत असूनही चिमूर मात्र सतत चार दिवसांपर्यंत स्वतंत्र राहिलं. या इतिहासाची नोंद घेतल्याशिवाय भारतीय स्वातंत्र्यसंग्रामाची गाथा पूर्ण होऊ शकणार नाही.

**महाविद्यालयं**

अख्ख्या देशात नावाजलेलं येथील राजीव गांधी अभियांत्रिकी महाविद्यालय आज शिक्षणक्षेत्रात आपल्या वैशिष्ट्यांनी तळपत असून सरदार पटेल महाविद्यालय रा.तु.म. नागपूर विद्यापीठात अग्रस्थानी आहे.

शांताराम पोटदुखे विधी महाविद्यालय आणि श्रीमती सुशीलाबाई मामीडवार समाजकार्य महाविद्यालय ही मूळ स.प. महाविद्यालयाचीच अपत्यं असून उभय महाविद्यालयांनीही आपली वैशिष्ट्यं कायम राखली आहेत.

८५ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष, माजी केंद्रीय अर्थराज्यमंत्री, चंद्रपूरभूषण शांतारामजी पोटदुखे यांच्या मार्गदर्शनाखाली या सर्व महाविद्यालयांची घोडदौड आज अश्वगतीनं यशस्वीरीत्या सुरू आहे.

इ.स. १९८४ नंतर शेकडो लोकांची कुटुंबं उदरनिर्वाहासाठी कामाच्या शोधात चंद्रपूरला आल्याने येथील लोकसंख्येत झपाट्याने भर पडली. मात्र शहरातील रस्ते तेच राहिले. त्यामुळे इथे सतत वाहतुकीची कोंडी होते. वाढती लोकसंख्या आणि महानगरपालिकेला नव्यानं मान्यता यामुळे येथील जमिनींचे भाव आज गगनाला भिडले आहेत. नवे चंद्रपूर वसल्यानंतरच ही समस्या थोडीफार सुटू शकेल.

(सौजन्य अ.ज. राजूरकर. चंद्रपूर , प्र. जोशी, चिमूर)

– **डॉ. अ.तु. काटकर** (निवृत्त प्राचार्य)
पत्रकार नगर, मूल रोड,
चंद्रपूर-४४२४०१

## ग्रंथालीची २०११ साली प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांचा संच



ग्रंथाली

४० पुस्तकांचा संच मूळ किंमत ८००० रुपये सवलतीत
४००० हजार रुपयांत उपलब्ध

ग्रंथाली

**१९७१चा रणसंग्राम**
अनुराधा गोरे मूल्य ३५० रु.
**शांताराम व्यक्ती आणि वाङ्मय**
सुरेखा सबनीस मूल्य २५० रु.
**दिवस असे की...**
प्रवीण बर्दापूरकर मूल्य २२५ रु.
**नोंदी डायरीनंतरच्या**
प्रवीण बर्दापूरकर मूल्य २०० रु.
**टिळक ते गांधी मार्गे खाडिलकर**
मुकुंद वझे मूल्य १२० रु.
**मराठी भाषेतीलअसभ्य म्हणी आणि वाक्यप्रचार**
अ.द. मराठे मूल्य २५० रु.
**ओंजळ काव्यफुलांची**
सुभाषचंद्र मयेकर मूल्य १२५ रु.
**अहिराणी लोकपरंपरा**
डॉ. सुधीर देवरे मूल्य १५० रु.
**प्रिय आयुष्यास सप्रेम नमस्कार**
संगीता धायगुडे मूल्य १८० रु.
**आठवणींची साठवण**
डॉ. सुरेश नाडकर्णी मूल्य १८० रु.
**माझ्या मनाचा मुरांबा**
वसुमती धुरू मूल्य २७५ रु.
**संवादने**
विद्या हर्डीकर-सप्रे मूल्य १५० रु.
**परक्या भूमीवर**
स्मिता भागवत मूल्य १५० रु.
**तेजस्विनी**
स्मिता भागवत मूल्य १५० रु.
**मनातल्या वावटळी**
प्रगती कोलगे मूल्य १०० रु.
**आकार**
सदाशिव साठे मूल्य २५० रु.
**तमाशा : विठाबाईच्या आयुष्याचा**
योगीराज बागूल मूल्य २५० रु.
**आचंद्र-सूर्य नांदो**
अनुराधा गोरे मूल्य १६० रु.
**गाऊ त्यांना आरती**
अनुराधा गोरे मूल्य ३०० रु.
**बाळाची चाहूल**
अनुराधा गांगल मूल्य ६० रु.
**भारती सृष्टीचे**
अनुराधा गांगल मूल्य १२० रु.
**संस्कार**
अनुराधा गांगल मूल्य ६० रु.
**रांगोळी**
अनुराधा गांगल मूल्य १८० रु.
**महाराष्ट्राची सुवर्णगाथा**
वसंत देशपांडे मूल्य १८० रु.
**मी विंदा बोलतेय**
जयमाला देसाई मूल्य १२० रु.
**शांबरिका खरोलिका**
श्रीकांत पेटकर मूल्य ६० रु.
**प्रेरक संघर्षाचा अमृतमयी ठेवा**
दादासाहेब पाटील मूल्य १८० रु.
**आनंदाकार**
प्रकाश पेठे मूल्य १०० रु.
**हवा, पानी और...**
भारत गजेंद्रगडकर मूल्य ७५ रु.
**एका पत्रकाराची दुनिया**
भारत गजेंद्रगडकर मूल्य १५० रु.
**भयशून्य चित्त जेथ...**
अनुवाद व संपादन डॉ. नरेंद्र जाधव मूल्य ५०० रु.
**रवींद्रनाथ टागोर : युगनिर्माता विश्वमानव**
डॉ. नरेंद्र जाधव मूल्य ७०० रु.
**रवींद्रनाथ टागोर : समग्र साहित्यदर्शन**
अनुवाद व संपादन डॉ. नरेंद्र जाधव मूल्य ५०० रु.
**आठवणींच्या जगात**
निरुपमा सोनाळकर मूल्य ३५० रु.
**ईश्वरविरहित जीवन (खंड १)**
शरद बेडेकर मूल्य १५० रु.
**ईश्वरविरहित जीवन (खंड २)**
शरद बेडेकर मूल्य १५० रु.
**नोबेलनगरीतील नवलस्वप्ने-२०११**
सुधीर-नंदिनी थत्ते मूल्य ८० रु.
**अस्फुट आवाजांचा प्रदेश**
डॉ. जयश्री गोडसे मूल्य १८० रु.
**अजब सहवास**
गो.आ. भट मूल्य १०० रु.
**सव्वाशे बोधकथा**
दिलीप पांढरपट्टे मूल्य १२० रु.

# वन-वन्य जीवनाचे भाष्यकार : अतुल धामनकर

## प्राचार्य मदन धनकर

लालू दुर्वे यांचं 'डॉ.प्रकाश आमटे यांचे ॲनिमल आर्क' हे पुस्तक हाती पडलं. एकाच बैठकीत वाचून संपवलं. डॉ. प्रकाश आमटे यांची लोकबिरादरीतील वन्य प्राण्यांशी सलगी थक्क करणारी आहे. त्याचा प्रत्यक्ष पाठ अनेकदा अनुभवला. पण 'ॲनिमल आर्क'ची कल्पना मला खूपच भावली. लालू दुर्वे हिंदुस्थान पेट्रोलियममध्ये उच्चपदावर होते. आपल्याकडे युगान्त किंवा कल्पान्ताची कल्पना आहे. 'जगबुडी' झाल्यावर ॲनिमल आर्क ची कल्पना बायबलमध्ये आली आहे. त्या कल्पनेनं मी भारावून गेलो, पण त्याहीपेक्षा पुस्तकातील अतुल धामनकरच्या उल्लेखानं चकित झालो. हेमलकसा येथील लोकबिरादरी प्रकल्पात जाण्यासाठी लालू दुर्वे चंद्रपूर येथील अतुल धामनकरला घेऊन जातात हे पुस्तक वाचून लक्षात आलं. माझा अतुलशी परिचय नाही या जाणिवेनं अस्वस्थ झालो.



अतुल धामनकर

अतुल धामनकरच्या शोधात निघालो. छोटुभाई पटेल हायस्कूलसमोरील शिवाजी चौकात पोचलो. अतुलची चौकशी करत ज्या इमारतीसमोर मी उभा होतो त्याच इमारतीच्या पहिल्या माळ्यावरील खिडकीतून अतुल मला न्याहाळत होता. 'सर, कोण पाहिजे?' म्हणत अतुलच जिना उतरून खाली आला. 'मला ओळखलं नाही? मी सरदार पटेल महाविद्यालयाचा विद्यार्थी आहे. समाजशास्त्र विभागात एम.ए. करतोय.' या परिचयानं अतुलची ओळख पक्की झाली. समाजशास्त्र हा माझ्या अध्यापनाचा विषय नसला तरी प्राचार्य झाल्यावर विद्यार्थ्यांत पडणारं अंतर जंगल तुडवण्याइतकं मोठं वाटलं. या घटनेला आता दशक झालं. पण दशकाच्या अंतरात विकसित झालेला लेखक अतुल धामनकर अजूनही माझ्यासाठी कुतूहलाची मचाण बांधून आहे. बंदुकीच्या नळीतून सुटणाऱ्या भूतकाळाला गाडून, शब्दवैभवानं वन-वन्य जीवनाला अलंकृत करणारा लेखक म्हणून पुस्तकांच्या रंगीत पानांतून खुणावत आहे.

एक शतक होऊन गेलं. जेम्स बेस्ट नावाचा भारतीय वन प्रशासन सेवेतील अधिकारी आलापल्ली इथं रुजू होण्यासाठी चंद्रपूरला आला. बैलगाडीनं आलापल्लीला पोचण्यासाठी त्याला एक आठवडा लागला. अनेक ज्येष्ठ वन अधिकाऱ्यांशी चर्चा करण्याची संधी मिळाली. भारतातील जवळजवळ प्रत्येक अधिकाऱ्याला एकदा तरी आपल्या सेवाकाळात इथं यावं लागतं. आलापल्ली म्हणजे आमच्या विभागाची काशी किंवा मक्का आहे. दर्शन घेतल्याशिवाय नोकरीची परिक्रमा पूर्ण होत नाही असं तो सहज बोलून गेला. जेम्स बेस्टनं आपल्या प्रवासावर 'टायगर डेज' हे पुस्तक लिहिलं. अनेक अधिकारी वनभ्रमणावर सतत लिहीत राहिले. जंगल तुडवणं सोपं आहे. समजून फिरणं कठीण. समजलेलं लिहून काढणं महाकठीण, अशी वस्तुस्थिती आहे.

अतुल धामनकर गेली २० वर्षं जंगलात फिरत आहे. आता तर भारतातील सारीच प्रमुख जंगलं त्यानं पिंजून काढली आहेत. पायपीट त्याच्या जीवनक्रमाचा भाग झाला आहे. भ्रमण, प्रबोधन अन् लेखन असा त्याचा त्रिवेणी प्रवास आहे. गळ्यात कॅमेरा अन् सोबत त्या जंगलातील असली तरी एखादी परिचित आसामी. आपल्या भ्रमंतीला अधिक बोलकं व परिणामकारक करण्यासाठी विद्यालयीन-महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी त्यानं शिबिरं घेतली. 'भ्रमणगाथा जंगलाची' कार्यक्रम सुरू केला. भौगोलिक परिस्थिती व जैविक विविधता नुसती बघायची नसून अनुभवायची संकल्पना त्यात गृहीत आहे. नवेगाव बांध, ताडोबा व नागझिरा अभयारण्य अथवा राष्ट्रीय उद्यानात सतत शिबिरांचं आयोजन करून, अतुलनं नव्या पिढीत ही संकल्पना रुजवण्याचा प्रयत्न केला. त्याला उदंड प्रतिसाद लाभला.

ऋतुपरत्वे बदलणारं वनवैभव आणि पशुपक्षी जीवनाचं विलोभनीय नाना रंग अशा शिबिरांतून पकडण्याचा प्रयत्न असतो. डोळ्यांनी जंगल केवळ पाहण्यापेक्षा सारी पंचेंद्रियं एकवटून त्याचा अनुभव घेण्याचा प्रयत्न यात असतो. पुणे, मुंबई, ठाणे, नाशिक व नागपूर या मोठ्या शहरांतून अतुल सतत नव्या पिढीला वनभ्रमण

समजावून देत, त्यांच्या आवडी समजून घेण्याचा प्रयत्न करत असतो. स्लाइड शो, व्याख्यानं व निसर्ग अभ्यासशिबिरं यातून नव्या अभ्यासकाची जिज्ञासा, दृष्टिकोन समजून घेण्याचा त्याचा प्रयत्न असतो. या प्रयत्नातून गवसलेलं संचित वृत्तपत्रीय स्तंभात ओतण्याचा त्याचा प्रयत्न अव्याहत सुरू असतो. आपल्या लेखनाची वाचनीयता वाढवताना त्यास शास्त्रीय वळण व आधार देण्याचं भान ठेवतो. मध्यप्रदेशातील जगप्रसिद्ध कान्हाकेसली, मध्यप्रदेश व महाराष्ट्र यांच्या सीमेवरील पेंच व्याघ्र प्रकल्पातील कर्माझरी आणि राजस्थानातील भरतपूर अभयारण्य यांत अतुलनं घेतलेली शिबिरं गाजली आहेत. यातील शिबिरार्थी राज्यांच्या सीमा पार करून येतात. त्यामुळे अभ्यासकाचे कष्ट फलद्रूप करण्याचं दायित्व आयोजकावर असतं. अनेक शिबिरांतून अतुलनं त्यांच्या छंदाला नवं परिमाण दिलं आहे.

शिबिर म्हणजे आयोजक मार्गदर्शकाचा अभ्यास दृढ करणारी क्षणोक्षणीची परीक्षाच असते. मान्सून मॅजिक, समर मॅजिक आणि विन्टर मॅजिक यांसारखी शिबिरं घेऊन, नव्या अभ्यासकांना प्रवृत्त करत विषयाची गोडी लावण्याचं त्याचं काम सुरू आहे. अभ्यासक, वनखात्याचे अधिकारी, आणि सर्वसाधारण हौशी प्रवासी यांच्या समन्वयातून व सहभागातून वनं, वन्य जीवन आणि वनविषयक लेखन, वाचक, छायाचित्र प्रदर्शन यांचा मेळ त्यानं सतत घातला आहे. ईटीव्हीवर 'संवाद' मध्ये राजू परूळेकर यांनी घेतलेली त्याची खुमासदार मुलाखत दोन भागांत झाली. वनजीवनविषयक नव्या अभ्यासकांना यातील अनेक जागा खुणावून गेल्या. अतुलच्या या जागा स्वकष्टार्जित आहेत.

गेल्या एक दशकात अतुलनं लिहिलेली पुस्तकं वाचकांच्या पसंतीस उतरली आहेत. २००० साली मृगकथा, २००३ साली वाघ, २००४ साली अरण्यवाचन, २००६ साली नवरंगाचं घरटं आणि अरण्याचं अंतरंग ही पुस्तकं आली. २००७ साली 'ताडोबा : वाघाचं जंगल', २०१० साली 'महाराष्ट्रातील वन्य जीवन' व 'मॅमल्स ॲन्ड बर्डस्' ही फिल्ड गाइड वाचकांपुढं ठेवली आहेत. प्रत्ययकारी लेखन व अनुभवजन्य मांडणी, रंगीत वैशिष्ट्यपूर्ण चित्रांनी खुलवणारी पुस्तकं केवळ वाचकाला नव्हे तर वन-वन्यजीवनाच्या अभ्यासकांना सोबत करून गेली आहेत. मृगकथा २००० साली प्रकाशित झालं. या पुस्तकावर आधारित १६ भागांची मालिका पुणे आकाशवाणी केंद्रानं प्रसारित केली. 'नातं निसर्गाशी' अशी ही मालिका होती. अरण्यवाचन पुस्तकानं जंगलशी जवळीक साधण्याचा प्रयत्न करणारे वाचक व फिरस्ते यांना साथ दिली. हौसेला मोल नसतं हे खरं. हौसेनं काढलेली चित्रं घराच्या भिती सुशोभित करण्यापुरतीच राहिली तर पुढील वाट खुंटते. जंगलाची वाट क्षणोक्षणी नवं कुतूहल, जिज्ञासा व साहस यांची सोबत घेऊनच शोधली पाहिजे. हे फिरस्ते अन् वाचक यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न अतुल सतत करत आहे. त्यामुळे त्याचं अभ्यासक्षेत्र जसं व्यापक होत आहे तसं सखोलदेखील.

'अरण्यवाचन' या डबल क्राउन ३०० आकाराच्या, पृष्ठांच्या देखण्या पुस्तकात ३०० रेखाचित्रं असून सारे भारतीय वन्यजीवन एकाच पुस्तकात एकत्र देण्याचा प्रयत्न झाला आहे. अरण्यवाचन कसं करावं, माझे अरण्यवाचनाचे अनुभव, भारतीय वन्य प्राणी, भारतीय पक्षी, सरपटणारे प्राणी व सामान्य फुलपाखरं आदी प्रकरणांतून पुस्तक फुलतं. निसर्गजीवन, वन्य वातावरणाचा मागोवा आणि वनं व जंगलं यांचा लोभस परिचय करून देणारी पुस्तकं मराठीत कमी आहेत. गेल्या दोन दशकांत अनेक स्तंभलेखक आणि जंगलातून मनुष्य व प्राणी जीवनाचा अनुबंध शोधणाऱ्या अनेक लेखकांनी मराठीतील या विषयाचे दालन समृद्ध करण्यासाठी केलेले प्रयत्न मात्र लक्षणीय आहेत. इंग्रजीत असणारी पुस्तकं महागडी असून जिल्हा पातळीवर, फार काय, जिल्हा वाचनालयं व महाविद्यालयांच्या ग्रंथालयातून देखील उपलब्ध नसतात.

पशुपक्ष्यांचा परिचय त्यांच्या निवासाचा मागोवा घेऊन होऊ शकतो. रस्त्यावरील पाऊलखुणा जनावरांचा परिचय देतात. झाडावर घासलेल्या शिंगातून त्यांचे अस्तित्व कळतं. वाघानं मागील पायांनी केलेली उकीर सहज लक्षात येते. वाघ पाऊलवाटेच्या कडेला विष्ठा टाकतो, तेव्हा संचाराची हद्द नमूद करून जातो. रानकुत्री रस्त्याच्या मधोमध एकत्र विष्ठा करतात.

प्रतिस्पर्धी टोळीस आपलं संख्याबळ कळावं, अशी चेतावणी त्यात असते. तृणभक्ष्यी प्राण्यांचं अस्तित्व त्यांच्या आवाजावरून लक्षात येतं. चौशिंगा व काकर यांना वाघाचा वास आला, तर ते भुंकू लागतात. फार काय, तृणभक्ष्यी प्राण्यांचा परिचय त्यांनी टाकलेल्या लेंड्यांवरून घेता येतो. जनावरांच्या पाऊलखुणा वाचताना वाघ आणि वाघीण अथवा बछडा व बिबट्या स्पष्ट करणारा फरक समजून घ्यावा लागतो. दोन पावलांतील अंतर व ठसे हे अभ्यासाचं एक साधन आहे. या साधनांचे सचित्र वर्णन धामनकर यांनी केलं आहे.

धामनकर व्यावसायिक कलाकार आहेत. डिझायनिंग व पेंटिंगची अनेक कामं त्यांनी केली आहेत. जाहिरातीसाठी आकर्षक मजकूर तयार करण्यात ते वाकबगार आहेत. त्याचं प्रतिबिंब 'अरण्यवाचन'मधून दिसतं. प्रवासास निघताना करावी लागणारी पूर्वतयारी नमूद करताना प्राण्यांना त्रास न देता अथवा न डिवचता वननिरीक्षण कसं करायचं, ते सांगितलं आहे. तलावाच्या काठी मचाणावर अथवा लपनगृहात राहून प्राण्यांचं निरीक्षण कसं करता येतं, हे विस्तारपूर्वक नमूद आहे. संरक्षित जागी राहून प्राण्यांचं चालणं आणि संचारातून त्यांचा स्वभाव जाणून घेण्याची दृष्टी धामनकरांनी दिली आहे. याच काळात रेखाटनं त्यांनी केली. आता रंगीत चित्रांतून आपला वर्ण्य विषय ते सहज मांडतात.

प्रारंभी धामनकरांनी अरण्यवाचनातील आपले अनुभव विस्तारानं नमूद केले आहेत. त्यानंतर भिन्न प्रकरणांतून पशुपक्ष्यांचा परिचय करून दिला आहे. निसर्गातील प्रत्येक घटकाशी सलगी करण्याचा आत्मविश्वास दाखवला आहे. मार्जार व श्वानवर्गातील पशूंचं निरीक्षण स्वतंत्र प्रकरणात मांडलं आहे. रानमांजर ते

वाघवर्गातील प्राणी यात मोडतात. रानकुत्रा, लांडगा, अस्वल, तरस, साळिंदर व खोकड (इंडियन फ्रॉक्स) यांच्यासंबंधी आपण वाचत असतो. तृणभक्ष्यी हरीणवर्गीय प्राण्यांत रानगवा, रानडुक्कर, मुंगूस, उदमांजर यांचा परामर्श वेगळ्या प्रकरणात आहे.

यात १२० पक्षी स्वतंत्र प्रकरणात आहेत. त्यात आपल्यास दिसणाऱ्या सामान्य ६० पक्ष्यांचा, तर जल व शिकारी अशा ६० पक्ष्यांची ओळख वेगळ्या प्रकरणात आहे. मगर, कासव, साप, घोरपड, पाल व सरडे या सरपटणाऱ्या प्राण्यांबद्दल वेगळे जग दृष्टीस पडतं. आपल्याकडे भिंतीवर धावणारी पाल आणि गडचिरोली जिल्ह्यात भिंतीवर सरपटणाऱ्या पाली यांचा आकार, रंग व रूप यात खूप अंतर दिसून येतं. ७० जातींच्या फुलपाखरांची ओळख यात प्रथम आली असून, मराठीत नवीन आहे.

या पार्श्वभूमीवर अतुलच्या 'ताडोबा : वाघाचे जंगल' पुस्तक ताडोबाचा सर्वस्पर्शी परामर्श घेणारं आहे. वन व वन्यजीवनविषयक कुतूहल सतत वाढत आहे. त्यामुळे जंगलचा फेरफटका करणाऱ्यांची संख्या वाढत आहे. त्या तुलनेत अभ्यासकांची संख्या वाढली नाही. निसर्गसौंदर्य व वन्यप्राण्यांचा विहार यावर लेखनं वाढलं. परंतु प्राणिजीवन फारच थोडं लेखनात आलं. वाघ प्रजननासाठी ताडोबा सुयोग्य अधिवास आहे हे अतुल धामनकर यांनी हेरलं. उपलब्ध पाणी, खाद्य व जैवविविधता यामुळे ताडोबाची मिरास वेगळी आहे. संपूर्ण भारतात मध्यप्रदेशातील बांधवगड, कान्हा व पेंच, उत्तराखंडातील जिम कॉर्बेट आणि महाराष्ट्रातील ताडोबा आता जगप्रसिद्ध आहेत. याबाबत जगातील १० देशांत भारत एक आहे. चांगले अभ्यासक व संशोधक एकीकडे प्रगत ग्रांथिक अभ्यास व दुसरीकडे जंगलात वर्षानुवर्षं रात्रौ आकाशातील तारे अन् दिवसा जंगलातील प्राण्यांच्या पायांचे ठसे मोजत आयुष्य न मोजता घालवणारे पारंपरिक ट्रेकर्स आहेत.

अतुल धामनकरला नारायणसिंह, सुरेश खोब्रागडे, प्रकाश येसांबरे, सुधाकर दडमल यांच्यासारखे जंगलचे सोबती लाभले. 'वाघ' अतुलनं नारायणसिंह करखेले यांच्या स्मृतीस अर्पण केलं आहे. पशू व पक्षी अभ्यासाची शास्त्रीय दिशा निश्चित करताना 'वनवास' भोगणारे अनुभवी उपयोगी पडतात. प्राणिशास्त्र प्राण्यांचे असे सोबती घेऊन लवकर कळतं. त्यात परंपरेचा धागा असतो. लेखक एका दिवसात उभा होत नाही. बहरलेली जंगलं व पशुपक्ष्यांचं निवास सर्चलाइटनं दिसतात पण शोधता येत नाहीत. आपला आयुष्यभराचा अभ्यास घेऊन जगणाऱ्या मारुती चितमपल्ली यांना माधवराव पाटील डोंगरवार भेटतात, तेव्हा त्यांच्या लेखनाचं पंचामृत सिद्ध होतं.

ताडोबात वही, पेन आणि कॅमेरा घेऊन अतुल धामनकरची भ्रमंती सुरू आहे. प्रस्तुत पुस्तकात १२ प्रकरणं आहेत. ताडोबाचं अरण्य, बहरणारा निसर्ग, तळं, नदी आणि पाणझरी, रानातली हरणं, वन्यजीवांचा स्वर्ग, नजरेआडचं वन्यजीवविश्व, जंगलातलं रात्रीचं जग, भक्षकांच्या मागावर, विहंगगान, सरपटणारे जीव व कीटक, काही थरारक प्रसंग, ताडोबातील दिवस आदी. प्रारंभी जंगलाची वाट रेखणारं चित्र आहे. 'ताडोबा देव'च्या रंगीत चित्रानं ही वाट लोकाश्रयी केली आहे. कारण लोकवाङ्मयातून मुखरीत हे स्थळ दिलासा देणारं आहे. 'मनोगत' अतुल धामनकरच्या अभ्यासाची एकीकडे दिशा दर्शवणारं तर दुसरीकडे ताडोबांशी असलेलं त्याचं जीवलग नातं स्पष्ट करणारं आहे. हे नातं वाचकाला भारून टाकणारं आहे. ताडोबाचा फेरफटका मारून सजलेले अनेक लेख गेल्या अर्धशतकात खूप प्रकाशित झाले आहेत. त्यांना वर्णनाचा अवर्णनीय रंग असेल, पण ताडोबाचं इंद्रधनुष्य खुलवणारी खुमारी नाही. त्याचा शोध अतुलनं घेतला आहे. ताडोबात ४५ जातींचे सस्तन प्राणी आहेत. २७९ जातीचे पक्षी आहेत. ९४ जातींची फुलपाखरं आहेत. यात बिबट्या, गवा, नीलगाय, सांबर, काकर, चौशिंगा, चितळ, रानडुक्कर, अस्वल व कोल्हा आहे. या सर्वांचा अभ्यास सोपा नाही. अतुलनं प्रस्तुत पुस्तकात तो सोपा केला आहे.

अतुल धामनकर याचं पुस्तक ताडोबा समजावून सांगणारं अंजन आहे. कारण कॅमेऱ्यानं टिपलेलं, झाडीनं घेरलेलं अन् शब्दांनी साकार केलेलं हे जंगल आहे. सूर्योदयानं हलणारं अन् सूर्यास्तानं फिरणारं हे जंगल अतुलनं पिंजून काढलं आहे. ताडोबातील लेखकाची भ्रमंती पुस्तक वाचताना आपली होते. लेखकानं स्वत: काढलेली रंगीत चित्रं भन्नाट आहेत. अलीकडे अतुलच्या गळ्यात अडकलेल्या कॅमेऱ्यानं असंख्य चित्रं काढली आहेत. सराईत चित्रकारासारखी त्यांची प्रदर्शनं प्रेक्षकांची गर्दी खेचून गाजत आहे.

रेखाचित्रांची पेरणी अतुल धामनकरचं खास वैशिष्ट्य आहे. पशुपक्ष्यांची रेखाटनं वाचकांना खिळवून ठेवतात. मुखपृष्ठावरील चितळ जितका उमदा तितकाच आतील तृषार्त वाघ डोळ्यांत साठवून ठेवावा असा. उत्तम रेखाचित्रासाठी पशुपक्ष्यांच्या लकबी लक्षात घ्याव्या लागतात. छायाचित्रणात अँगल महत्त्वाचा तसा रेखाचित्रात त्याची 'पोज' सर्व बाजूंनी समजून घेतल्याशिवाय व्यक्त करता येत नाही. पशुपक्ष्यांची १५० वर असलेली रेखाचित्रं ताडोबाचं वनवैभव व्यक्त करणारी आहेत. रेखाचित्रांतून पशुपक्ष्यांचा स्वभाव व्यक्त करणारी किमया लेखकाजवळ आहे. चित्रकाराचा कुंचला फिरत राहावा, शेतकऱ्याच्या नांगरानं जमिनीशी सतत मैत्री करत असावं, शिक्षकाचा खडू फळ्यावर सतत बोलत असावा आणि वक्त्याचे शब्द सतत निनादत असावे, त्याप्रमाणे अतुलचा लेखनप्रवास सुरू आहे, नवे आशय व अभिव्यक्ती यांची सोबत घेत.

**– प्राचार्य मदन धनकर**
विद्यानगर, गजानन महाराज मंदिर मार्ग,
चंद्रपूर-४४२४०१

# नवा विदर्भ, ओळख नवी

## वसंत वाहोकार

पूर्वी विदर्भ म्हटला की आधी नागपूरचे नाव डोळ्यांसमोर येत असे. ज्यांच्याकडे लक्ष वेधले जावे अशी कर्तृत्ववान, गुणी माणसे नागपुरात आहेत असे मानले जात होते. मात्र गेल्या काही वर्षांत झपाट्याने बदलणाऱ्या जगाबरोबर विदर्भही बदलला आहे आणि हा बदल सर्वच क्षेत्रांत अनुभवायला मिळत आहे. नवनवी कार्यक्षेत्रे आणि नवी क्षितिजे यात विदर्भातल्या लहानसहान गावांतला तरुणही पाऊल ठेवतो आहे आणि पाच-दहा वर्षांत आपल्या कार्याचा ठसा उमटवतो आहे. जगाचे लक्ष आपल्या कर्तृत्वाकडे आकर्षून घेत आहे. नागपूर विदर्भातले, चाळीशीच्या आतबाहेरचे युवक आज सर्व चळवळींचे सूत्रधार म्हणून ओळखले जात आहेत. अशा काही परिचित युवक कार्यकर्त्यांच्या कामाची तोंडओळख म्हणून का होईना, परंतु तो परिचय करून देण्याचा हा एक प्रयत्न म्हणावा लागेल. तो पूर्ण नाही आणि पुरेसा तर मुळीच नाही. तरीही एखादी व्यक्ती आणि तिचे कार्य याची दखल घेतली जावी, असे काही सहज हाती आलेले परिचय तेवढ्याच सहजतेने देण्याची ही एक धडपड.

मंजुश्री गोविंद कुळकर्णी, अकोल्याची. तिथे तिची 'क्षितिज' ही संस्था कार्यरत आहे. आता या 'क्षितिज'चे कार्य पुण्यातही सुरू झाले आहे. खरे तर मंजुश्रीला आनंदवन येथे साधनाताईंसोबत काम करण्याची इच्छा होती. परंतु साधनाताईंना ते मान्य नव्हते. तुम्ही जिथे राहता तिथेच नंदनवन उभारा, हा त्यामागचा हेतू. त्यामुळे मंजुश्रीने अकोल्यात जठारपेठेतील ठोंबरे वाचनालयात ब्रेक लिपीतील पुस्तकांचे वाचनालय सुरू केलं. संजय मुळे यांचं सहकार्य आणि डॉ. चिन्मय दामले, डॉ. राजेंद्र मेंडकी, मंजिरी ठोसर या सहकाऱ्यांची मदत मिळाली. त्यातून ब्रेल लिपी आत्मसात करणे, पुस्तके उपलब्ध करणे, तयार करणे असे व्याप वाढत गेले. पुस्तके आणि रेकॉर्डेड सीडी ही साधने हाती असताना अंध विद्यार्थ्यांना शिकवणे सुरू केले. पुढे घरीच हे पुनर्वसन केंद्र सुरू करण्याची तयारी दाखवली. जून २००९ मध्ये 'क्षितिज अंध-अपंग विरंगुळा पुनर्वसन केंद्र' मंजुश्रीच्या घरी सुरू झाले. नंतर दीप्ती जोशी, प्राची उदगीरकर आणि माणिक नेरकर अशा मैत्रिणी पुढे आल्या. संगणक शिकवण्यासाठी मोहिनी मोडक यांची मदत झाली. दहावी, बारावी, डी.एड.चे शिक्षण घेता येईल, एवढी सक्षम पिढी येथे तयार होत गेली. नागपूरच्या सक्षम संस्थेनेही लक्ष घातले आणि मदत केली. मंजुश्रीचे पती, मुलगा आणि मुलगी असे अवघे कुटुंब आता यात लक्ष घालून पुढे जात आहे. आर्थिक सहकार्य आणि संसाधन जुळणी असे प्रश्न अनेकदा उभे राहतात. परंतु समाजात समंजस दाते, आश्रयदाते आहेत. त्यांचा आधार आणि पाठबळ यामुळे 'क्षितिज'चे कार्य विस्तारत राहील असे वाटते.

अंध युवक युवतींचे पुनर्वसन असो, प्रशिक्षण असो हे एक नवे क्षेत्र आपलेसे करणारी मंजुश्री कुळकर्णी पुढे एकटीच नसेल. अशा काही मंजुश्री अजून पुढे येतील. अनेक नवी क्षेत्रेही साद घालीत असतील. रूढ आणि मळलेल्या वाटा सोडून नव्या वाटा धुंडाळणारे युवकांचे जग झपाटल्यागत पुढे येईल. वन, अरण्य, निसर्ग, पक्षी, प्राणी, आदिवासी, औषधी, वन-उपज असे काय काय चालले असेल, आणि नवी नावे व थक्क करणारे नवे काम याचि डोळा पाहायला मिळेल.

अमरावतीचे किशोर रिठे यांचे नाव आज निसर्ग पर्यावरण झपाट्याने पुढे आलेले नाव. खरे तर ते एक सॉफ्टवेअर इंजिनीयर. पुण्यात नोकरी आणि परदेशी जाण्याच्या भरपूर संधी. परंतु डोक्यात पूर्णवेळ निसर्ग संरक्षक बनण्याचा ध्यास. म्हणूनच नोकरी सोडली. प्राध्यापकी स्वीकारली. अभियांत्रिकी विद्यालयातली प्राध्यापकी. महाविद्यालयीन आयुष्यात कधीतरी मेळघाटात जाणे झाले होते. तिथे प्रसिद्ध लेखक मारुती चितमपल्लींची भेट घडली होती. पुढे कधीतरी नवेगाव बांध जवळून पाहता आले आणि निसर्ग, पर्यावरण, वनरक्षण या सगळ्यांनी त्यांना गळामिठीच मारली. ती एवढी, की दोन महाविद्यालयांत मिळालेल्या प्राध्यापकीचाही मोह पडला नाही. 'सातपुडा बचाव' सारखे अभियान सुरू झाले. मेळघाटाचे प्रश्न हाताशी असतानाच मध्यप्रदेशानेही हाक दिली. कशाला? पेंच प्रकल्पात मासेमारांचे आणि वनविभागाचे भांडण होतेच. त्यासाठी वनविभागाला कोर्टात उभे करण्याचे धाडसही करावे लागले. मग पुन्हा नोकरीचा राजीनामा आणि दिल्लीच्या संस्थेची फेलोशिप. युगांडा येथे यासंबंधीचे प्रशिक्षण पार पडले होतेच. निसर्ग आणि वन्यजीव संरक्षक अशी ओळख झाली होती. त्यातूनच 'टायगर लिंक ॲवार्ड' आणि जिप्सी गाडी यांचा लाभ झाला. मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील

एकवीस गावांचे पुनर्वसन हा प्रश्नही हाती घेतला होता. त्यांच्या कार्यामुळेच त्यांना विदेशात जावे लागते. केंद्रीय वन्य जीव बोर्ड आणि स्थायी समितीचे सदस्यत्व त्यांच्याकडे आहे. लंडन येथील ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीच्या झुऑलॉजी डिपार्टमेंटच्या वन्यजीव अभ्यासक्रमाची पूर्तता त्यांनी केली. हा गौरव मोठा आहे. वाघ वाचला तरच जंगल वाचेल, ही त्यांची धारणा आहे. पर्यावरण रक्षणासाठी सरकारलाही अडवण्याची त्यांची क्षमता आहे. आता निसर्ग, पर्यावरण, वन्यजीवरक्षण यासाठीच त्यांनी आयुष्य ओवाळून टाकले आहे. पत्नी डॉ. संगीता रिठे पाठीशी आहेत. त्यामुळे ही लक्षवेधी वाटचाल राष्ट्राला उपकारकच असेल ही खात्री बाळगावी.

ध्यानीमनी नसताना वन्यजीव संरक्षण क्षेत्रात आलेला असाच एक तरुण म्हणजे यवतमाळ जिल्ह्यातल्या नेर गावातील कुंदन हाते. त्याला खरे तर चित्रकार व्हायचे होते. 'जे. जे.'मध्ये रमायचे होते. मात्र ते शक्य झाले नाही. अमरावतीला शिकत असताना निसर्गसंरक्षण संस्थेशी संबंध आला आणि कार्याची जणू दिशाच हाती आली. त्यावेळी सी.ई.ओ. असणारे प्रवीण परदेशी इतरांसारखेच कुंदनचे मार्गदर्शक व मित्र म्हणून पुढे आले. मोठ्या भावाचीही मदत कामी आली. पुढे सातपुडा बचाव अभियान सुरू झाले आणि कुंदन नागपुरात आला. चित्रकला महाविद्यालयातून बी.एफ.ए. झाला. अमरावती निसर्ग संस्था नागपुरात कार्यरत होती. कुंदन तिथे होता. तरीही वनविभाग कार्यालय गाठण्यात त्याला त्रास झाला, अडथळे आले. अडवणूकही झाली. पुढे त्याचा या विभागात क्राईम सेलमध्ये प्रवेश झाला. प्लॅनिंग ऑपरेशन या आघाडीवर तो होताच. तो नियमित कर्मचारी नसूनही वाटेल तो धोका पत्करत होता. 'रेस्क्यु ऑपरेशन'सारखी जबाबदारी पार पाडत होता. एकदा तर थ्री नॉट थ्री गोळीही झेलावी लागली. 'ऑपरेशन रेस्क्यु बजरंग'मध्ये माकडं वाचवण्यात त्यानं हिरीरीने भाग घेतला. अगदी वाघ-वाघिणींची सुटका देखील करण्यात आली. महाराजबागेत वाघांच्या बछड्यांची काळजी घेण्यातही कुंदन समोर असतो. कुंदनची पत्नी लीना ही 'ऑर्किऑलॉजी' क्षेत्रात कार्यरत आहे आणि तो सगळे धोके पत्करणाऱ्या वेड्या कुंदनच्या पाठीशी खंबीरपणे उभी असते. असा हा धडपडणारा आणि वन्यजीव संरक्षण क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाने नावलौकिक प्राप्त करणारा कुंदन हाते म्हणजे एक विलक्षण व्यक्तिमत्त्व आहे.

बुलडाणा ते नागपूर असा प्रवास केलेला अमोल खंते हा एक असाच युवक. आज सी.एससी.ऑल राऊंडर आणि अमोल खंते ही एकच ओळख सांगता येईल. हिमालयीन शिबिरे भरवण्यात या संस्थेचे मोठे योगदान आहे. मनाली येथे तर त्यांची स्वत:ची जागा आहे. एअरफोर्स अधिकारी प्रशिक्षणात त्यांची फार मोठी मदत आहे. पॅरामोटर्स सफरी घडवणे असो किंवा रामटेक येथील पॅरामीटर हवाई उड्डाण असो, 'पॅराग्लायडिंग' असे विविध उपक्रम अमोल राबवत असतो. अमोल या संस्थेचा प्रबंध संचालक आहे. 'मैत्रबन'सारख्या ठिकाणीही शिबिरे आयोजित करण्यात अमोल पुढे असतो. अनेक रेस्क्यु ऑपरेशनमध्ये त्याचा सहभाग असतोच. निसर्ग, वन्यजीव आणि ॲडव्हेंचर या क्षेत्रांतील आघाडीवर असणाऱ्या नावांमध्ये अमोलचे नाव घ्यावेच लागते. यवतमाळ, बुलडाणा, अमरावती, अकोला अशा गावांतून आलेले हे युवक विदर्भाची ओळख झाले आहेत.

ग्रंथ आणि ग्रंथपालन हे अगदी रोजच्या आयुष्याशी संबंधित क्षेत्र किती सुंदर असू शकते याची ओळख देता येणारे नाव आहे, बुलडाणा येथील नरेंद्र लांजेवार या तरुणाचे. भारत विद्यालयात ग्रंथपाल असणारा नरेंद्र कवी आणि कार्यकर्ता आहे. एकदा तरी भेट द्यावे असे हे विद्यालय आहे. नरेंद्रचे प्रयत्न त्यामागे दिसतात. विदर्भ साहित्य संघ शाखेचा तो अध्यक्ष आहे. त्यातून त्याला अ. भा. मराठी साहित्य महामंडळात काम करण्याची संधी प्राप्त झाली. साहित्यिक-वाङ्मयीन उपक्रमात तो असतोच. विशेष म्हणजे 'शेतकऱ्यांच्या आत्महत्या, चिंतन आणि उपाय' हा त्याचा पुस्तक विषय आणि प्रत्यक्ष कार्य आहे. मुलांसाठी पुस्तकमैत्री, बालवाचनालये असे उपक्रम त्याने राबवले आहेत. चिल्ड्रेन फाईन आर्ट ॲण्ड लिटररी सोसायटीचे अध्यक्षपद त्याच्याकडे आहे. मुलांनी वाचन आणि लेखन दोन्ही करावे ही त्याची भूमिका असते. स्वत: लिहीत असतो. त्यासाठीचे पुरस्कारही त्याने प्राप्त केले आहेत. अभिव्यक्तीची क्षितिजे, अभिव्यक्तीची स्पंदने - वाचू आनंदे मिळवू परमानंदे ही त्याची वाचकप्रिय पुस्तके असून लवकरच 'एका ग्रंथपालाची प्रयोगशाळा' हे पुस्तक प्रकाशित होत आहे.

व्यवसायाने पत्रकार असलेला मनजीतसिंग शीख हा स्वत: पुढाकार घेऊन खामगाव येथे तरुणाई फाउंडेशन ही स्वायत्त संस्था चालवत आहे. आनंदवन आणि सोमनाथ येथून प्रेरणा घेत मनजीत युवकांमध्ये पर्यावरण जागृती व व्यसनमुक्तीचे धडे देतो आणि वनीकरणाकडे त्यांना प्रवृत्त करत असतो. वृक्षारोपणाचे मोठे काम युवक करत आहेत. राज्य शासनाने त्यांना पुरस्कार दिला आहे. तंटामुक्त अभियान उत्कृष्ट वार्तांकन केल्याचा लक्ष रुपये पुरस्कार प्राप्त मनजीत अंधश्रद्धा निर्मूलनाचे कामही करत असतो. स्वत: पत्रकार असल्याने पत्रकारांची संघटना स्थापन करून, त्या माध्यमांतून विविध वृत्तपत्रे, सामाजिक, सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन तो करत असतो. असे हे बुलडाणा जिल्ह्यातील दोन युवक आपापले कर्तृत्व गाजवत आहेत.

प्रदीप अवचार अकोल्यात सेव्ह द चिल्ड्रेन सीआरसी प्रोजेक्टचे काम करत आहे. तो शहर समन्वयक म्हणून चाईल्ड इंडिया फाऊंडेशन आणि चाईल्ड हेल्पलाईनचा कर्ता-धर्ता आहे. खरे तर तो व्यवसायाने व्याख्याता आणि त्याचबरोबर मार्गदर्शन-समुपदेशन ही कामेही करत आहे. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात त्याने मानद व्याख्याता म्हणून खास विषयांचे व्याख्यान, समुपदेशन केले आहे. त्याने जनसंवाद व वृत्तविद्या व्यवसायाची पदविका प्राप्त केली आहे. युथ डिझास्टर मॅनेजमेंट चेन्नई, कमिटमेंट ऑफ युथ फॉर सोशल

वेल्फेअर-ग्वालियर, युथ फॉर इंटरनॅशनल अंडरस्टॅडिंग अँड कम्युनल हार्मनी-कैरो, इजिप्त, नीड ऑफ इव्होकिंग द युथ-पणजी, गोवा, नीड फॉर साऊंड एकॉनॉमिक कंडिशन ऑफ फार्मर्स-दिल्ली अशा अनेक संस्थांशी संबंध, जवळीक राखून त्यांचे कार्य प्रदीप मनापासून करत आहे. इंदिरा गांधी आय.एस.एस. अवॉर्ड, नॅशनल युथ अवॉर्डस् या काही पुरस्कारांनी त्याला गौरवले गेले आहे. भारत सरकारचा प्रतिनिधी म्हणून तो इजिप्त येथेही जाऊन आला आहे. पंचविशीच्या आत हे सारे करू शकणारा प्रदीप अवचार नवी क्षितिजे धुंडाळत जाणार हे नक्की.


व्यवसायाने सॉटवेअर आर्किटेक्ट असणारा नागपूरचा तुषार जोशी हा तसा धडपड्या, उपक्रमशील कवी आहे. तो मराठी आणि हिंदीत कविता लिहितो आणि अनुवादाचे कामही करतो. गेल्या वर्षभरापासून 'नागपूर कविता संमेलन' दर महिन्यात तो घेत असतो. अंबाझरी उद्यानात हा उपक्रम चालतो. शिवाय, 'मराठी कविता समूह' या फेसबुक, आर्कुट उपक्रमाचे यजमानपद तो सांभाळतो. कविता आणि गझल यातील लेखनप्रयोग आणि कार्यशाळा, काव्यस्पर्धा असे विविध उपक्रम या माध्यमातून राबवले जात आहेत. युवकांमध्ये कवितेचे भान, जाण आणि शास्त्रीय ज्ञान, संवर्धन ही गरज ओळखून आपल्या मोजक्या मित्रांसह नियमितपणे लक्ष घालणारा तुषार या उपक्रमांमुळे कवीप्रिय आहे.

SETU. A Concious Parents Forum हा उपक्रम आजपासून दहाएक वर्षे आधी नागपुरात सुरू झाला. सेतू आणि स्नेहा अमर दामले अशी ओळख नागपूरकरांना पक्की माहीत आहे. रामदासपेठ कॅनॉल रोड येथे अमर प्री स्कूल आहे. ती आपले लक्ष वेधून घेते. पती, सासुबाई आणि सहकारी यांच्या सहकार्यातून सेतूचे कार्य स्नेहा करत आहे आणि संस्था नावलौकिकास नेत आहे. एक पालक म्हणून काय आत्मभान असावे यासाठी 'सेतू'ची धडपड आहे. पालक, त्यांची जबाबदारी, बदलती सामाजिक परिस्थिती यात सेतू उभी आहे. त्यामुळे दर महिन्याला कुठल्यातरी एका तज्ज्ञाशी चर्चा आणि प्रश्नोत्तरे हा कार्यक्रम असतो. मानसशास्त्र आणि पालकत्व या विषयीचे लिखाण, पुस्तके, चित्रपट, वाङ्मय जमवणे आणि ते वितरित करणे हे एक वेगळे काम असतेच. Aptitude Testing Councelling व्यवसाय मार्गदर्शन केले जाते. वेगवेगळ्या शाळांमधून हे उपक्रम राबवण्यात येतात. शिक्षकांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले जातात. व्यक्तिमत्त्व विकास आणि अभिव्यक्ती क्षमता विकास या दृष्टीने कार्यक्रम असतात. गेल्या पाच वर्षांपासून 'छंदोत्सव' हा उपक्रम सुरू असून त्याला फार मोठा प्रतिसाद लाभत आहे. सेतूद्वारे लहान मुलांना व्यासपीठ मिळावे यासाठी स्नेहा दामलेंचे कार्य नजरेत भरण्यासारखे नक्कीच आहे.

एकूणच विदर्भात सर्वच जिल्हे आणि तेथील युवक आज विविध क्षेत्रे काबीज करीत आहेत, आपल्या कर्तृत्वाने ती उजळून काढत आहेत. तुम्ही त्यांच्यापर्यंत जा अथवा नका जाऊ, दखल घ्या अथवा नका घेऊ, त्यांचे काम कधीही थांबणार नाही. नवी पालवी फुटेल. नवे वृक्ष उभे राहतील. ही गती, प्रगती थांबणार नाही. आपणही पुढे येऊ आणि त्या हातांना आपला हात देऊ.

**- वसंत वाहोकार**
२६, गजाननगर, वर्धा रोड, नागपूर-१५
भ्रमणध्वनी ८००७७३१५०५
vwahokar@rediffmail.com


## वाचकदिनी प्रकाशित झालेली पुस्तके




**अस्फुट आवाजांचा प्रदेश**
स्वैर अनुवाद
**डॉ. जयश्री गोडसे**

**मूल्य १८० रु. ● सवलतीत १०० रु.**

**सव्वाशे बोधकथा**
**दिलीप पांढरपट्टे**




**मूल्य १२० रु. ● सवलतीत ७५ रु.**

# पंखांचे मूळ आणि कर्तृत्वाचे कूळ

**श्रीकांत पाटील**

गंध घेऊन उमलणारी फुले पूर्णपणे उमलली की वाऱ्यासोबत त्या फुलांचा गंध रानावनात पसरतो, आणि सारा आसमंत फुलांच्या गंधाने गंधाळतो. कर्तृत्ववान माणसांचंही असंच असतं. ती जिथे जातात तिथे त्यांच्या कर्तृत्वाला ती अधोरेखित करतात. या कर्तृत्वाचे कूळ कधी दुसऱ्यासारखे नसते. प्रत्येकाचे रंग वेगळे असतात. पुष्कळदा या कर्तृत्वाची भरारी वेगळीच दिसते. त्यांच्या पंखावरील रंगावरून, त्यांनी कवेत घेतलेल्या क्षितिजाचा अदमास घेता येत नाही. ते ज्या घरट्यात लहानाचे मोठे होतात, त्या घरट्यातील चिवचिवणाऱ्या वयातील पंख फुलपाखरासारखे दिसतात; पण त्याच पंखांना जेव्हा भरारी घेण्याचे बळ येते, त्यावेळेस ती भरारी बघून बघणारेही स्तिमित होतात.

आमचा चंद्रपूर जिल्हा म्हणजे, महाराष्ट्राच्या नकाशातील पूर्वेकडचे अगदी शेवटचे टोक. वैशाखाच्या रणरणत्या उन्हात अंगाची लाही लाही करणारी लाल माती. शिशिराच्या पानगळीत रानारानात कोसच्या कोस भुई पांघरणारा पिवळाशार पाचोळा, आषाढ-श्रावणाच्या झडीच्या दिवसांत, महिना-महिनाभर ओथंबून येणारा आभाळाचा उमाळा, कार्तिकाच्या टिपूर चांदण्यात हिरव्याशार धानातील गर्भवती लोंब्यांचा दरवळणारा भाताचा गंध; अशा विविधतेने नटलेला हा चंद्रपूर जिल्हा. आजचा चंद्रपूर-गडचिरोली म्हणजे पूर्वीचा एकसंध चंद्रपूर जिल्हा. आदीम वन्य जमातींच्या संस्कृतीला जपणारा. तसा, शहरी संस्कृतीचा फारसा वारा न लागलेला. विकासाच्या प्रकाशाला आसुसलेला.

पण, येथील माती मात्र सृजनशील. या मातीत जन्माला आलेल्या प्रतिभावंतांनी निरनिराळ्या क्षेत्रांत कर्तृत्व दाखवले. आपल्यातील गुणांचा क्षितिजशोध घेण्यासाठी ती चंद्रपूर जिल्ह्याच्या बाहेर पडली. राजकीय, सामाजिक, वैज्ञानिक, प्रशासकीय वाङ्मयीन अशा विविध क्षेत्रांत त्यांनी आपल्या व्यक्तिमत्त्वाची नाममुद्रा उमटवली. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांच्या कर्तृत्वाची नोंदही झालेली आहे. अशा काही प्रातिनिधिक कर्तबगार माणसांच्या नोंदी या लेखात घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**सर्वोदयी कार्यकर्ते स्व. रा. कृ. पाटील**

चंद्रपूर जिल्ह्याचा राजकीय इतिहास जेव्हाकेव्हा लिहिला जाईल व जो कोणी लिहील, त्याला राजकारणातील तीन 'दादां'च्या कार्याची नोंद घेतल्याखेरीज पुढे जाता येणार नाही. ते तीन दादासाहेब म्हणजे रा.कृ. पाटील, मुख्यमंत्री मा.सा.कन्नमवार आणि वन व परिवहन मंत्री रा.ज. देवतळे. यातील पहिले दादासाहेब म्हणजे प्रसिद्ध सर्वोदयी कार्यकर्ते रा.कृ. उपाख्य दादासाहेब पाटील. दादासाहेब मूळचे चंद्रपूर जिल्ह्यातील वरोडा या गावचे. मालगुजार घराण्यात त्यांचा जन्म झाला. पण, त्यांच्या राहण्यात-वागण्यात-बोलण्यात कुठेही लक्ष्मीपुत्राच्या खुणा नव्हत्या, आढ्यता नव्हती. बालपणातील संस्कार आणि व्यक्तित्वातील जडणघडण यात ऋजुता, नम्रता आणि प्रसिद्धीविन्मुखता ओतप्रत भरलेली होती. दादासाहेब चंद्रपूर जिल्ह्यातील पहिले आयसीएस झालेले उमेदवार. १९३१ मध्ये आयसीएस परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर ते रायपूर येथे एसडीओ या पदावर रूजू झाले. रायपूर-बिलासपूर-खांडवा-बुलडाणा-खामगाव या ठिकाणी त्यांनी असिस्टंट कमिशनर व जिल्हाधिकारी म्हणून काम पाहिले. हे सर्व जिल्हे त्यावेळेच्या मध्यप्रांतात होते. परंतु, या जिल्हाधिकाऱ्याने इंग्रजांच्या राजवटीत स्वतःच्या बंगल्यावर ब्रिटीश झेंडा लावण्याचे नाकारले. वरिष्ठ अधिकाऱ्याने याबाबत त्यांना विचारणाही केली. तेव्हा, शासकीय कार्यालयावर झेंडे असतील, पण माझ्या निवासस्थानावर कोणतेही निशाण लावण्याचे बंधन शासनाला करता येणार नाही, असे निर्भयपणे त्यांनी सांगितले. पुढे १९४३ मध्ये गांधीजींनी जेव्हा तुरुंगात उपोषण केले, तेव्हा स्वातंत्र्याच्या चळवळीत भाग घेण्यासाठी त्यांनी स्वतःहून नोकरीचा राजीनामा दिला.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ते मध्यप्रांताचे राजस्व, अन्न व पुरवठा खात्याचे मंत्री झाले. पुढे १९५० ते १९५२ या काळात ते पंडित नेहरूंच्या इच्छेवरून केंद्रीय नियोजन मंडळाचे सभासद झाले. निरनिराळ्या पदांची जबाबदारी सांभाळताना त्यांचे सत्याशी इमान कधी ढळले नाही. आपल्या उच्चपदस्थ नेत्यांकडून सत्याचा अधिक्षेप होतो आहे हे जेव्हाजेव्हा त्यांच्या लक्षात येई, त्यावेळी दादासाहेब राजीनामा देऊन मोकळे होत असत.

गांधीजी आणि विनोबाजी ही त्यांची श्रद्धास्थाने होती. विनोबाजींच्या इच्छेवरूनच पुढे दादासाहेब भूदान चळवळीत सहभागी झाले. स्वतःच्या मालकीच्या जमिनीपैकी एकषष्टांश जमीन त्यांनी

भूदानयज्ञात दिली. पण त्याची कुठे साधी वाच्यताही त्यांनी केली नाही. गांधी-विनोबांच्या सर्वोदयी विचारांवर त्यांची इतकी प्रगाढ श्रद्धा होती की, 'पुढला जन्म मला माणसाचा मिळाला तर त्याही जन्मात मी गांधीवादी म्हणूनच जगेन', असे ते सांगत. त्यांना शंभर वर्षांचे आयुष्य लाभले होते. आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत त्यांचे वाचन, चिंतन, लेखन सुरूच होते. शेवटची पंधरा-वीस वर्षे त्यांच्या कानांनी असहकार पुकारला होता. त्यामुळे त्यांचे अडले नाही. स्वतःच्या गरजा, स्वतःचे चिंतन ते लिहून सांगत. या लेखनात कधी भारताची काश्मीरसमस्या असे, कधी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे रिडल्स असे, तर कधी शंकराचार्य-मध्वाचार्य किंवा रामानुजाचार्य यांच्या अद्वैत-अखंडाद्वैत-विशिष्टाद्वैताची चर्चा असे. रा.कृ. पाटील म्हणजे त्यागाचे अधिष्ठान असलेली 'शतायुषी सात्विकता' होती. त्यांनी गांधीजींच्या संकल्पनेतील साधनशुचितेला स्वतःच्या राजकीय, प्रशासकीय आणि सार्वजनिक जीवनात अनन्यसाधारण महत्त्व दिले. साधनांची शुद्धता राखली तर साध्यसुद्धा शुद्ध राहील यावर त्यांचा विश्वास होता.

**मुख्यमंत्री मा.सा. कन्नमवार**

चंद्रपूर जिल्ह्यात जन्मलेले व पुढे महाराष्ट्राच्या राजकीय क्षितिजावर मुख्यमंत्री म्हणून नावलौकिक मिळवलेले दुसरे दादासाहेब म्हणजेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा.सा. कन्नमवार. महाराष्ट्राने त्यांना कर्मवीर आणि लोकनेते या उपाधींनी गौरवले. दुर्दैवाने त्यांच्या आकस्मिक मृत्यूमुळे त्यांची राजकीय कारकीर्द अर्ध्यावरच थांबली. चंद्रपूर जिल्ह्यातील एका भटक्या मागासवर्गीय कुटुंबातील या सामान्य कार्यकर्त्याने, स्वतःच्या अंगभूत गुणांनी मुख्यमंत्रीपदापर्यंत भरारी घेतली. प्रतिकूल परिस्थिती, पोरकेपण आणि संसाधनांची वानवा अशा प्रतिकूलतेने खचून न जाता, त्यावर मात करण्याची जीवनशक्ती दादासाहेबांच्या ठिकाणी होती. प्रचंड सोशिकता, निरपेक्षता, समबुद्धी, करुणा, आत्मविश्वास, दूरदृष्टी आणि संघटनाकौशल्य या वैशिष्ट्यांमुळे ते महाराष्ट्रीय जनतेचे लोकनेते झाले होते. खेड्यात राहणाऱ्या सामान्य माणसाच्या काळजाला साद घालणारी संतवचनासारखी सहज प्रासादिक वाणी त्यांच्याजवळ होती. माणुसकी आणि सद्‌भाव हा लोकशाहीच्या यशाचा गाभा आहे, असे त्यांना वाटत असे. लोकमान्य टिळकांच्या प्रभावाने त्यांना राजकीय जीवनात कार्य करण्याची प्रेरणा मिळाली. कन्नमवारांची आर्थिक परिस्थिती आरंभापासूनच हलाखीची होती. पण प्रपंचापुरते मिळवून उरलेला वेळ लोकसेवेसाठी देण्याचा त्या काळातील लोकनेत्यांचा वसा होता. त्यांच्याकडे चंद्रपुरात 'लोकमान्य' या वृत्तपत्राची एजन्सी होती. 'लोकमान्य' वृत्तपत्र विकून जे मिळे, त्यावर त्यांचा चरितार्थ चालत असे. कन्नमवारांचे कार्य त्यामुळे केवळ चंद्रपूर जिल्ह्यापुरतेच मर्यादित राहिले नव्हते, तर महाराष्ट्राच्या बाहेर दिल्लीत असणाऱ्या मराठी नेत्यांनाही त्यांच्याबद्दल आदर होता. धर्म, पंथ, भाषा, जात या प्रकारचा कोणताही भेद न बाळगता त्यांनी काम केले. देशसेवेची ऊर्मी मनात बाळगणाऱ्या कार्यकर्त्यांना त्यांनी समाजसेवेची संधी दिली. इतर पक्षात काम करणाऱ्या निष्ठावान कार्यकर्त्यांनाही त्यांनी वेळप्रसंगी मदत केली. १९३७ मध्ये त्यांनी 'लोकसेवक' हे पाक्षिक सुरू केले. १ ऑगस्ट १९४७ पासून नागपूरहून 'नवसंदेश' हे साप्ताहिक सुरू केले. १९५२ मध्ये स्वास्थ्यमंत्री असताना त्यांनी 'ग्रामसेवक' हे मासिक सुरू केले. याखेरीज, नागपूरहून 'पंचायत राज्य' हे मासिक आणि चंद्रपूरहून 'चंद्रपूर दर्शन' हे साप्ताहिक वृत्तपत्र काढले. लोकशाहीची प्रणाली ही ग्रामीण स्तरापर्यंत पोचावी हा त्यामागील हेतू होता. १९५२ च्या सार्वत्रिक निवडणुकांपासून, कन्नमवारजी मध्यप्रांताच्या मंत्रिमंडळात होते. पुढे, संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर, १९६२ मध्ये ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. त्यावेळी केंद्रात पंडित जवाहरलालजी, यशवंतराव चव्हाण, लालबहादूर शास्त्री यांच्यासारखी मातब्बर मंडळी होती. पण, मंत्रिमंडळातील निर्णय घेताना कोणाच्याही प्रभावात न येता, स्वतःच्या विवेकबुद्धीला पटेल असेच ते ठरवत असत. आणि त्याची पुढील जबाबदारीही स्वतः घ्यायची असे त्यांचे धोरण होते.

**प्राचार्य डॉ. के.ज. पुरोहित-शांताराम**

प्रसिद्ध कथालेखक 'शांताराम' यांचा जन्म १५ जून १९२३ रोजीचा. चंद्रपूर जिल्ह्यातील चामोर्शी या गावात त्यांचा जन्म झाला. माध्यमिक शिक्षण चंद्रपूरला झाले. १९४० मध्ये मॅट्रिक झाल्यानंतर, महाविद्यालयीन शिक्षणासाठी ते नागपूरात आले. इंग्रजी विषयात एम.ए. झाल्यानंतर ते विदर्भ महाविद्यालय, अमरावती, नागपूर महाविद्यालय, नागपूर व नंतर मुंबईच्या इस्माईल युसुफ महाविद्यालयात ते इंग्रजीचे अध्यापन करू लागले. पुढे, ते त्या महाविद्यालयाचे प्राचार्य झाले आणि १९८१ साली सेवानिवृत्त झाले. त्यांची पहिली कथा 'सह्याद्री'च्या अंकात सप्टेंबर १९४० मध्ये 'भेदरेखा' या नावाने प्रसिद्ध झाली. त्यानंतर पुढे पन्नास वर्षे पुरोहितांनी 'शांताराम' या नावाने कथालेखन केले. १९४२ साली त्यांच्या सोळा कथांचा पहिला संग्रह प्रकाशित झाला, तो 'संत्र्याचा बाग' या नावाने. त्यानंतर 'मनमोर'(१९४६), 'शिरवा'(१९५७), 'छळ'(१९५८), 'जमिनीवरची माणसं'(१९५९), 'लाटाधर्म'(१९६२), 'चंद्र माझा सखा' (१९६९),'अंधार वाट'(१९७७),'उद्विग्न सरोवर'(१९८२), 'चेटुक'(१९८४), 'काय गाववाले' (१९८९), 'संध्याराग'(१९९०), 'रेलारेला'(१९९२) आणि 'रोमियो व ज्युलिएट' असे एकूण चौदा कथासंग्रह प्रकाशित झाले. शांतारामांच्या सुरुवातीच्या कथांवर वि.स.खांडेकर व ना.सी. फडके या तत्कालीन ज्येष्ठ कथाकारांचा प्रभाव होता. परंतु त्यांच्या 'शिरवा' या कथासंग्रहात त्यांना स्वतःची आविष्कारशैली गवसली. अनुभूती असलेली तरल आणि भावकाव्यात्मक अशी त्यांची शैली आहे. नागपूर,चंद्रपूर, चामोर्शीसारख्या प्रदेशांत शांतारामांचे संस्कारक्षम वय गेलेले असल्यामुळे, लहान गावे, नगरे आणि आदिवासी भाग अशा

परिसरातील माणसे व त्यांच्याशी निगडीत असे अनुभवविश्व त्यांच्या कथांत दिसते. वास्तव जीवनचित्रण हा त्यांच्या कथांचा एक जीवनविशेष आहे. तसेच समाजातील चालीरीती, रूढी, संकेत अशा जीवनव्यवहारांचे संदर्भ त्यांच्या कथेत आढळतात. म्हणून त्यांची कथा त्यांच्या समकालीन कथालेखकांपेक्षा वेगळी आढळते. समाजव्यवस्थेने आखून दिलेल्या संकेतांविरुद्ध बंड करणारे स्त्री-पुरुष त्यांच्या कथांमध्ये येतात. तसेच, आक्रमक, उग्र प्रवृत्तीचे, आदीम भुका भागवताना कशाचीही पर्वा न करणारे स्त्री-पुरुष शांतारामांच्या कथेत भेटतात. व्यामिश्र, गुंतागुंतीचे, नेणीवेच्या पातळीवरचे प्रश्न त्यांची कथा हाताळते. मानवी विकार आणि संस्कार यांच्यातील ताणही ते समर्थपणे रेखाटतात. 'सावळा गं रंग तुझा' हा त्यांचा लघुनिबंधाचा कथासंग्रह आहे. खुसखुशीत शैली, चौफेर डोळस निरीक्षण, देशी-विदेशी वाङ्मयाचे संस्कार यांचे आकलनही या लघुनिबंधांतून वाचकांना जाणवते. थोडक्यात, भोवतीच्या सामाजिक, सांस्कृतिक, चौकटीत आपआपल्या स्वभावानुसार आणि वासनाविकारानुसार मुक्तपणे जगणारे स्त्री-पुरुष रंगवून देखील, स्वतःची अशी मूल्यभावात्मक भूमिका ठेवणारे कथालेखक म्हणून शांतारामांची ओळख मराठी वाचकांना आहे.

**सीमारक्षक - डॉ.अब्दुल बशीर**

डॉ. अब्दुल बशीर हे चंद्रपूरचे. २० एप्रिल १९५२ रोजी त्यांचा जन्म झाला. अंचलेश्वर वार्डातील त्यांचे घर आजही आहे. वडील अब्दुल करीम यांचे गोलबाजारात घड्याळदुरुस्तीचे दुकान आहे. घरची अतिशय गरिबी. छोटुभाई पटेल हायस्कूलमध्ये त्यांचे शालेय शिक्षण झाले. लहानपणापासूनच गुणवत्तेशी दोस्ती; त्यामुळे पुढे, नागपूरच्या विश्वेश्वरैय्या रिजनल इंजिनीयरिंग कॉलेजमध्ये गुणवत्तेच्या आधारावर त्यांना सहज प्रवेश मिळाला. बी.इ. इलेक्ट्रिकल्सची पदवी त्यांनी गुणवत्तेसह मिळवली. घरी गरिबी होती, तरी शिकण्याची भरपूर जिद्द होती, त्यामुळे मुंबई-पवई येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलाजीमधून त्यांनी एम.टेक. केले. कंट्रोल्स ॲन्ड इन्स्ट्रुमेंटेशन हा त्यांचा मुख्य विषय होता. पुढे पीएच.डी.ची पदवीही तिथेच घेतली, आणि त्याच काळात त्यांचा टाटा पॉवर कंपनीशी संबंध आला. त्यांना टाटा ग्रुपमध्ये काम करण्याची संधी मिळाली. सध्या ते टाटा पॉवर कंपनीत महाप्रबंधक म्हणून कार्यरत आहेत. टाटा पॉवर ही कंपनी वीजनिर्मिती, पारेषण व वितरण यात कार्य करते. टाटा समूहाच्या संशोधनक्षेत्रात डॉ.अब्दुल बशीर यांचे नाव आघाडीवर आहे. आजवर आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावर डॉ. बशीर यांचे अनेक शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत. इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीयर्सचे अनेक सन्मान त्यांनी आजवर मिळवले आहेत. पं. मदनमोहन मालवीय, विमल बोस आणि बी.व्ही. बालिंगा यांच्या नावाने दिल्या जाणाऱ्या प्रतिष्ठेच्या विविध पुरस्कारांनी डॉ. बशीरांना गौरवण्यात आले आहे. डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचे ते आवडते विद्यार्थी आहेत. 'आकाश', 'त्रिशूल', मल्टी बॅरेल रॉकेट लॉन्चर 'पीनाका' यांच्या निर्मितीत त्यांचा मोठा सहभाग आहे. २००१-२००२ मध्ये संपूर्ण विश्वातील १५० कर्तृत्ववान व्यक्तींच्या नामावलीत डॉ. बशीरांचा उल्लेख करण्यात आला आहे.

मल्टी बॅरेल लॉन्चर असलेले 'पीनाका' हे भारताच्या सीमांचे रक्षण करण्यासाठी निर्मिलेले आहे. सीमाक्षेत्रात शत्रूची टेहळणी करण्यासाठी, किंवा शत्रूवर मारा करणारी सामग्री 'पीनाका' कशी घेते आणि उतरवून मोकळी कशी होते, यांचे प्रात्यक्षिकांसह केलेले त्यांचे व्याख्यान अजूनही स्मरणात आहे

मितभाषी, साधी राहणी जपणारा, अतिशय नम्र आणि संवेदनशील मनाचा हा वैज्ञानिक म्हणजे, चंद्रपूरच्या मातीने देशसेवसाठी निर्मिलेले लेणे आहे.

**प्रा. डॉ. वसंत आबाजी डहाके**

कवी, कांदबरीकार, समीक्षक, चित्रकार वसंत आबाजी डहाके यांचा जन्म ३० मार्च १९४२ मध्ये यवतमाळ जिल्ह्यातील बेलोरा या गावी झाला. प्राथमिक शिक्षण तेथेच. पदवी स्तरावरील शिक्षण चंद्रपूर येथून. एम.ए. नागपूरमधून. त्यानंतर खाजगी व शासकीय महाविद्यालयात मराठीचे अध्यापन. वाङ्मयीन कारकीर्द काव्यलेखनापासून सुरू. १९६० साली 'सत्यकथा' मासिकातून पहिली कविता प्रसिद्ध. त्यांची सत्यकथा मासिकात (मे ६६) 'योगभ्रष्ट' नावाची जी कविता प्रकाशित झाली, त्या कवितेने डहाके यांच्याकडे कवी म्हणून साऱ्यांचे लक्ष वेधले गेले. याच नावाचा त्यांचा काव्यसंग्रह १९७२ मध्ये प्रकाशित झाला. पुढे 'शुभवर्तमान' (१९८७), 'शुनःशेप' (१९९६) हे कवितासंग्रह आणि 'अधोलोक'(१९७५), 'प्रतिबद्ध आणि मर्त्य'(१९८१) या कादंबऱ्या, 'यात्रा-अंतर्यात्रा' (२०००) हे चिंतनात्मक ललितलेखन असे साहित्य आजवर प्रकाशित झाले आहे. या सर्व लेखनामागे डहाक्यांच्या जीवनाचे अंतःसूत्र आहे. त्यांच्या कवितेतील 'मी' हा विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील, परात्मभावाने ग्रासलेल्या, निराश आणि संत्रस्त मानवाचे प्रतिनिधित्व करतो. भोवतीच्या समाजव्यवस्थेने मानवी जगण्याला ज्या पातळीवर आणून सोडले आहे, त्याबद्दल हा 'मी' अस्वस्थ आहे. या युगातील मानवी दुःख, एकाकीपणा, माणसाला प्राप्त झालेली क्षुद्र स्थिती, जीवनातील अस्थिरता, दहशत, सर्वव्यापी भय आणि पराधीनता या साऱ्यांचे चित्रण, समृद्ध अशा प्रतिमांकित भाषेत करताना, त्यावर उत्तर नाही असे डहाके सूचित करतात. डहाक्यांची कविता एकाचवेळी 'आत्माविष्कार' आणि 'युगबोध' व्यक्त करते. विसाव्या शतकातील अस्तित्वादी तत्त्वज्ञानाशी ही कविता आतून नाते सांगते. त्यांच्या कवितेतून व्यापक पातळीवर व्यक्त झालेले सामाजिक भान 'प्रतिबद्ध', आणि 'अधोलोक' या कादंबऱ्यांमधूनही प्रकटते. त्यांची भाषा आशयाचे अंतःस्तर उलगडून दाखवणारी, काव्यात्म, पण भावुकतेचा स्पर्श नसलेली, निसर्गातील प्रतिमांचा वैशिष्ट्यपूर्ण वापर करणारी

आहे. आपल्या साहित्यकृतीतून समकालीन पिढीची जीवनजाणीव आणि मूल्यभाव प्रकट करणाऱ्या डहाक्यांनी भरपूर समीक्षालेखन केले आहे. 'कविता म्हणजे काय?(१९९१) 'कवितेविषयी' (१९९९), समकालीन साहित्य(१९९२), ही समीक्षात्मक त्यांची पुस्तके. 'योगभ्रष्ट' या काव्यसंग्रहाचा इंग्रजी अनुवाद 'टेररिस्ट ऑफ द स्पिरीट' १९९२ साली प्रकाशित झाला. शालेय शब्दकोश (१९९६) हा ग्रंथ गिरीश पतके यांच्या सहकार्याने सिद्ध झाला. संक्षिप्त मराठी वाङ्मयकोश आणि वाङ्मय संज्ञा-संकल्पना कोश डहाके यांच्या संपादनाखाली सिद्ध झाला.

**न्यायमूर्ती विकास श्रीधरराव सिरपूरकर**

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती विकास श्रीधर सिरपूरकर यांचा जन्म चंद्रपूर जिल्ह्याातील वरोरा या गावचा. त्यांचे आई-वडील सुनंदा सिरपूरकर आणि श्रीधर सिरपूरकर हे दोघेही वकील होते आणि यशस्वी वकील म्हणून दोघांचाही वरोऱ्यात लौकिक होता. न्यायमूर्ती विकास सिरपूरकरांचे शालेय शिक्षण झाल्यानंतर नागपूरच्या मॉरिस कॉलेजमध्ये त्यांचे पदवीपर्यंत शिक्षण झाले आणि नागपूर येथेच विद्यापीठ विधी महाविद्यालयातून त्यांनी एलएल.बी. पदवी प्राप्त केली. १९६८ मध्ये त्यांनी ॲड. खेर्डेकरांच्या मार्गदर्शनात उच्च न्यायालयात वकिलीला प्रारंभ केला. १९९२ मध्ये त्यांची मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे न्यायाधीश म्हणून नेमणूक झाली. १९९७ मध्ये ते मद्रास उच्च न्यायालयाचे न्यायाधीश झाले. तामिळनाडू राज्याच्या विधिसेवा प्राधिकरणाचे ते कार्यकारी अध्यक्ष राहिले. त्यांच्या काळात त्यांनी, राज्यात न्यायविषयक प्रशिक्षणासाठी 'ज्युडिशियल ॲकॅडमी' स्थापन करण्यासाठी पुढाकार घेतला. २००४ मध्ये ते उत्तराचंल(उत्तराखंड) उच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश झाले. 'उजाला' या संक्षेपाने ओळखल्या जाणाऱ्या -(उत्तरांचल ज्युडिशियल ॲण्ड लीगल ॲकॅडमी) शिक्षण संस्थेचे काम त्यांच्या पुढाकाराने सुरू झाले. २००५ मध्ये ते कलकत्ता उच्च न्यायालयाचे न्यायाधीश झाले. १८६१ च्या 'इंडियन हायकोर्टस् ॲक्ट' या कायद्याखाली इंग्लडच्या राणीच्या सनदेने त्यावेळी स्थापन झालेल्या मुंबई, मद्रास, कलकत्ता या तीनही ऐतिहासिक न्यायालयांत न्यायाधीश म्हणून कार्य करणारे बहुधा ते एकमेव न्यायाधीश असावेत.

२००७ मध्ये सिरपूरकर यांची सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली. २०१० च्या डिसेंबरमध्ये चीनच्या भेटीला गेलेल्या न्यायविदांच्या आंतरराष्ट्रीय शिष्टमंडळाचे नेतृत्व त्यांनी केले. मद्रास उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून काम करताना तामिळनाडूमधील प्रतिबंधक स्थानबद्धताविषयक प्रकरणात त्यांनी दिलेले निर्णय महत्त्वाचे मानले गेले. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती म्हणून, शिक्षणव्यवस्था, धार्मिक विश्वस्त न्यास आणि करविषयक कायदे यांच्याशी संबंधित प्रकरणात त्यांनी महत्त्वाचे निर्णय दिलेत. उत्तम वक्तृत्व, भरपूर वाचन, व्यासंग, तसेच मराठी, हिंदी आणि इंग्रजी व्यतिरिक्त, बंगाली, तामीळ, आणि गुजराती या भाषांचा सराव ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये. आपण ज्या गावात, जन्मलो-वाढलो, ज्या गावाने आपल्याला एवढ्या मोठ्या पदावर काम करण्याचे श्रेय दिले, त्या गावाबद्दल त्यांच्या बोलण्यात नेहमीच प्रचंड अभिमान दिसतो. वरोऱ्याला नुकतेच सुरू झालेले जिल्हा सत्र न्यायालय ही त्यांच्याच पुढाकाराची फलश्रुती आहे. २०११ च्या ऑगस्ट महिन्यात ते न्यायमूर्ती म्हणून सेवानिवृत्त झाले.

**माहितीआयुक्त डॉ. सुरेश विनायक जोशी**

डॉ. सुरेश जोशी यांची ओळख महाराष्ट्राला आहे ती महाराष्ट्र राज्याचे पहिले माहिती आयुक्त म्हणून. सुरेश जोशी त्यांचा जन्म चंद्रपूर जिल्ह्यातील मूल या गावचा. मराठीतील पहिले वनकथाकार



**शरद बेडेकर यांची पुस्तके नव्या स्वरूपात**




**ईश्वरविरहित जीवन (खंड १)**
मूल्य १८० रु.  सवलतीत १०० रु.




**ईश्वरविरहित जीवन (खंड २)**
मूल्य २०० रु.  सवलतीत १२० रु.




**विचारवंतांचा विवेकविशेष**
मूल्य १०० रु. सवलतीत ६० रु.

वि.वा.जोशी यांचे ते चिरंजीव. सुरेश जोशी यांचे वडील वनाधिकारी होते. चंद्रपूरच्या न. प. धर्मराव प्राथमिक विद्यालयात त्यांचे प्राथमिक शिक्षण झाले. चंद्रपूरच्या ज्युबिली हायस्कूलमधून ते मॅट्रिक झाले. त्यांचे पदवीपर्यंतचे शिक्षण अमरावतीच्या विदर्भ महाविद्यालयात झाले. रसायनशास्त्रात एम.एससी. ही पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर ते पीएच.डी झाले. १९७० मध्ये आय.ए.एस. परीक्षा उत्तीर्ण होऊन ते भारतीय प्रशासकीय सेवेत रूजू झाले. त्यानंतर त्यांनी सांगली येथे सी.इ.ओ. व अकोला येथे जिल्हाधिकारी म्हणून काम केले. १९७८ मध्ये अहमदनगर जिल्ह्यात भीषण दुष्काळ पडला होता. त्यावेळी, दुष्काळग्रस्तांना मदत करण्यात त्यांनी उल्लेखनीय कामगिरी बजावली होती. ग्रामीण विकास मंत्रालयात असताना, त्यांच्या मार्गदर्शनात, दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांचे भारतातील पहिले सर्वेक्षण करण्यात आले. महाराष्ट्र राज्याच्या विविध मंत्रालयात त्यांनी वेळोवेळी उल्लेखनीय कार्य केले. मुंबई महानगर विकास प्राधिकरणाचे महानगरआयुक्त असताना मुंबई विकासाचा आराखडा त्यांनी तयार केला आणि हा तो पंतप्रधानांना सादर केला. त्यानुसारच, मुंबई महानगराच्या विकासाची वाटचाल सुरू आहे. मुंबई मेट्रोची मुहूर्तमेढ त्यांच्या कारकीर्दीत झाली. ठाणे येथील महापालिकेचे आयुक्त म्हणून त्यांनी काम पाहिले. आय.ए.एस. परीक्षांमध्ये महाराष्ट्रातील तरुणांनी जास्तीत जास्त प्रमाणात भाग घेतला पाहिजे यासाठी सुरेश जोशी यांनी ठाणे महानगरपालिकेत, चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेची स्थापना केली. अफगाणिस्तानचे नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर, भारताकडून झालेल्या सहकार्याच्या धोरणानुसार, अफगाणिस्तान सरकारचे ग्रामीण विकास सल्लागार म्हणून कार्य केले. डॉ. सुधीर जोशी यांचे राज्याच्या ग्रामीण विकास, औद्योगिक विकास, व नागरी विकास यांत महत्त्वपूर्ण योगदान आहे. त्यांनी विदेशात आयोजित झालेल्या ग्रामीण विकास; तसेच, नागरी विकास विषयक परिषदांमध्ये भारताचे व महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व केले.

डॉ. सुरेश जोशी हे महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्य माहितीआयुक्त म्हणून नियुक्त झाले. माहितीच्या अधिकाराचा संपूर्ण प्रशासकीय सेटअप त्यांनी तयार केला. माहितीचा अधिकार सर्वसामान्यांपर्यंत पोचवण्यात, या अधिकारासंबंधी जनतेला जागृत करण्यात व लोकांना हा माहितीचा अधिकार कशाप्रकारे वापरता येईल याची सुसूत्र यंत्रणा त्यांनी निर्माण केली. सध्या ते 'महाराष्ट्र इलेक्ट्रिसिटी रेग्युलेटरी कमिशन'वर 'लोकपाल' म्हणून पदभार सांभाळत आहेत.

**प्रतिरक्षणशास्त्र वैज्ञानिक - डॉ. कृष्णा सैनिस**

चंद्रपूर जिल्ह्यातील आनंदवन येथे स्थापन झालेल्या आनंद निकेतन महाविद्यालयात डॉ. कृष्णा सैनिस यांचे बीएस्सीपर्यंतचे शिक्षण झाले. पुणे विद्यापीठात जीवरसायनशास्त्रात एम.एस्सी. पदवी पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण झाल्यानंतर, त्यांनी पुणे विद्यापीठातून पीएच.डी. ही पदवी संपादन केली. भारतातील प्रतिरक्षणशास्त्र या विषयातील ते एक ज्येष्ठ वैज्ञानिक म्हणून गणले जातात. भाभा अणुसंशोधन केंद्राच्या प्रशिक्षण प्रशाळेत प्रथमच सुरू होत असलेल्या विकिरण जीवशास्त्र (रेडिओ बायोलॉजी) या एकवर्षीय अभ्यासक्रमासाठी त्यांची निवड झाली होती. तेथे त्यांनी प्रथम क्रमांक मिळवला. तेव्हापासून, डॉ. कृष्णा सैनिस हे प्रतिरक्षणशास्त्र या विषयावर सतत संशोधन करत आहेत. विशेषत:, पेशीबद्ध प्रतिरक्षण, कर्करोगविरोधी प्रतिरक्षण, आत्मप्रतिरक्षी व्याधी प्रतिरक्षण नियमन (इन्युमो मॉड्युलेशन), विकरणाचा प्रतिरक्षण संस्थेवरील परिणाम यावर त्यांनी संशोधन केले. डॉ. सैनिस यांनी केलेल्या संशोधनकार्याबद्दल १९८१मध्ये भारतीय राष्ट्रीय विज्ञान ॲकॅडमी युवा वैज्ञानिक पदवी व पुरस्काराने त्यांना गौरवित केले गेले. तसेच, १९९४ मध्ये त्यांना सीएसआयआरने 'शांतिस्वरूप भटनागर' या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या पुरस्काराने गौरवण्यात आले.

गेल्या अनेक वर्षांपासून डॉ. सैनिस यांच्या संशोधनाचा भर विकिरण जीवशास्त्रावर आहे. गेल्या चार-पाच वर्षांत त्यांनी ॲन्टिऑक्सिडन्टस्चा, प्रतिरक्षण प्रणालीवरील परिणामांचा अभ्यास केला आहे. 'क्लोरोफिलीन' या हरितद्रव्यापासून निर्मित पदार्थाचे विकिरण संरक्षक परिणामासोबत प्रतिरक्षण क्षमता वाढवणारे परिणाम त्यांनी दाखवून दिले.

त्यांचे गुळवेलीच्या (टायनोस्पोरा कोरडिफोलिया) प्रतिरक्षण संस्थेवरील परिणामांचे संशोधन विशेष उल्लेखनीय आहे. डॉ. कृष्णा सैनिस हे युनायटेड नेशन्स सायंटिफिक कमिटी ऑन इफेक्टस् ऑफ ॲटॉमिक रेडिएशनमध्ये (यु.एन.एस.सी.इ.ए.आर) १९९९ सालापासून भारताचे प्रतिनिधित्व करत आहेत. सध्या डॉ. सैनिस हे भाभा अणुसंशोधन केंद्र, मुंबई येथे जैव-वैद्यकीय समूहाचे संचालक (निदेशक) आहेत. 'इंटरनॅशनल ॲटॉमिक एजन्सी'ने आण्विक उपयोजनावरील स्थायी गटात त्यांचा समावेश केला आहे.

वरील मान्यवरांव्यतिरिक्त, आणखीही कित्येक कर्तृत्ववान माणसांचा उल्लेख करता येणे जागेअभावी शक्य होत नाही. महाराष्ट्र राज्याचे माजी सचिव एम.आर.पाटील, प्रशासकीय सेवेत एसडीओ म्हणून राहिलेले, समाज कल्याण विभागाचे विभागीय आयुक्त, आयएएस अधिकारी इ. झेड. खोब्रागडे, सुप्रसिद्ध साहित्यिक आणि कवी ज्ञानेश वाकूडकर, सुप्रसिद्ध गायक विजय गटलेवार, सुप्रसिद्ध तबलावादक मनमोहन कुंभारे या साऱ्यांचे त्या त्या क्षेत्रातील कार्य अतिशय मोलाचे आहे. ही सर्व माणसे चंद्रपूर जिल्ह्यात जन्मलेली. येथेच लहानाची मोठी झालेली आणि संपूर्ण महाराष्ट्रात आपल्या कर्तृत्वाने कीर्तिवंत झालेली आहेत.

**- प्रा. श्रीकांत पाटील**
राममंदिर वार्ड, वरोरा

# साहित्य संस्थांचे दीप उजळतील कसे?

नरेंद्र लांजेवार

वाचन, लेखन, चिंतन आणि प्रबोधनाची एक परंपरा महाराष्ट्राला लाभली आहे. स्व. यशवंतराव चव्हाणांसारखे सुसंस्कृत राजकीय नेतृत्व, महाराष्ट्राच्या उभारणीत महत्त्वपूर्ण ठरले होते. याच यशवंतराव चव्हाणांच्या विचारांचा वसा आणि वारसा सांगणाऱ्या अनुयायांनी, महाराष्ट्राच्या सांस्कृतिक नेतृत्वाला किती संकुचित केले ते साहित्य-कलेच्या सवतेसुभ्यावरून दिसू लागले आहे. साहित्य-कला-संस्कृतीच्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या साहित्य-संस्थांनी, महाराष्ट्र राज्याचे नेतृत्व ज्या कल्पकतेने करावयास पाहिजे होते, त्यामध्ये या साहित्य संस्थांना अपयश आलेले आहे.महाराष्ट्राच्या वाट्याला आलेल्या सुसंस्कृत वारशाचे रूपांतर 'आदर्शा'त कसे झाले? याचा ताजा इतिहास बघितला की, कोणत्याही संवेदनशील माणसाला वाईट वाटते. पन्नास वर्षांच्या कालखंडात महाराष्ट्राचा चेहरा सांस्कृतिकदृष्ट्या उजळून का निघू शकला नाही? याला साहित्य-कलेच्या क्षेत्रातील कार्य करणाऱ्या संस्था-संघटना, त्यांचे पदाधिकारी तथा त्यांचे सहानुभूतीदारसुद्धा जबाबदार दिसतात.

साहित्य संस्थांमध्ये साचलेले गढूळपण आज प्रखरतेने दिसून येते. साहित्यिक-वाङ्मयीन उपक्रमांपेक्षा साहित्य संस्थांमधील आपले पद आणि आपल्या चेल्याचपाट्यांची वर्णी लावण्यातच अख्खी हयात खर्ची घालणारे काही पदाधिकारी बघितले, तर साहित्य-संस्था कोणत्या व्यापक उद्देशाने स्थापन झाल्या होत्या, याची जाणीव ना या साहित्य-संस्थांच्या पदाधिकाऱ्यांना, ना साहित्याच्या नावावर राजकारण करणाऱ्यांना!

अखिल भारतीय प्रादेशिक साहित्य-संस्थांच्या एकूणच व्यवहाराबाबत नाक मुरडणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. पण लोकशाहीच्या माध्यमाने या साहित्य-संस्थांच्या कारभारात क्रियाशील सदस्य न होता, बाहेरूनच गोटे मारणाऱ्यांची संख्या वाढली आहे. खरंतर आजच्या या प्रस्थापित साहित्य-संस्थांचा कारभार सुरळीत नाही, असे म्हणणाऱ्यांनी स्वत: पुढाकार घेऊन तो कारभार कसा आदर्शवत राहू शकतो, हे दाखवून देणे जास्त महत्त्वपूर्ण आणि कसोटीचे आहे. जोपर्यंत अशा कसोटीवर स्वत:ला सज्जन म्हणवून घेणारे उतरणार नाहीत तोपर्यंत प्रस्थापित साहित्य-संस्थांना विरोध करणे म्हणजे फक्त वांझोटाच संघर्ष राहणार आहे.

नुकतेच महाराष्ट्र राज्यस्थापनेचे सुवर्णमहोत्सवी वर्ष साजरे झाले. सोबतच अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे सुद्धा सुवर्णमहोत्सवी वर्ष साजरे झाले. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ ही चार प्रादेशिक साहित्य संस्थांनी एकत्र येऊन उभी केलेली शिखर संस्था आहे. यामध्ये मराठी साहित्य परिषद, पुणे, मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद, विदर्भ साहित्य संघ, नागपूर, मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई या चार संस्था; अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या मुख्य घटक संस्था आहेत. आंध्रप्रदेश, कर्नाटक, मध्यप्रदेश, गोवा आणि छत्तीसगड येथील एक-एक समाविष्ट संस्था आणि बडोद्याची एक संलग्न संस्था ह्या महामंडळासोबत आहेत. आज महाराष्ट्राच्या प्रशासकीय विभागानुसार विचार केला तर कोकण विभाग, नाशिक आणि अमरावती विभागासाठी स्वतंत्र साहित्य-संस्था दिसत नाहीत. पुणे विभागासाठी स्थापन झालेल्या मराठी साहित्य परिषदेचे वर्चस्व-मुंबई शहर वगळता-संपूर्ण कोकण, खान्देश आणि नाशिक विभागापर्यंत १४ जिल्ह्यांमध्ये आहे. औरंगाबादची मराठवाडा साहित्य परिषदेच्या संपूर्ण मराठवाड्यात आणि विदर्भ साहित्य संघ, नागपूर या संघाच्या संपूर्ण विदर्भात शाखा आहेत. मुंबई मराठी साहित्य संघाची मुख्य शाखा वगळता एकही शाखा नाही.

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या घटक संस्था आणि संलग्न संस्था एकत्र केल्या तरीसुद्धा आज शंभरपेक्षा जास्त शाखा दिसत नाहीत. अनेक शाखा फक्त कागदोपत्री आहेत. पस्तीस जिल्ह्यांमध्ये विस्तारलेल्या बारा कोटींच्या महाराष्ट्रात एक लाख लोकसंख्येपेक्षा जास्त लोकसंख्या असणारे तीनशे अठ्ठावन्न तालुके आहेत. खरंतर एक लाख किंवा त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असणाऱ्या गावात, चांगल्या पद्धतीच्या साहित्य संस्था असावयास हरकत नाही. परंतु आज, ज्या स्वत:हून संपूर्ण महाराष्ट्रात आम्हीच वाङ्मयीन नेतृत्व करीत आहोत अशी शेखी मिरवितात, त्या अखिल भारतीय तथा विभागीय घटक साहित्य संस्था फक्त काही शहरांमध्येच अस्तित्व टिकवून आहेत. ही परिस्थिती खरोखरच आत्मचिंतन करण्यासारखी आहे.

गेल्या पन्नास वर्षांच्या कालखंडात ठिकठिकाणी स्थानिक

पातळीवरचे नेतृत्व पुढे येऊन साहित्य-कला-संस्कृतीच्या क्षेत्रात कार्य करणाऱ्यांची एक नवीन पिढी दिसू लागली आहे. या नवीन नेतृत्वाला जुन्या संस्थांचे झेंडे खांद्यावर घेण्याची इच्छा नाही. आपापल्या परीने आपापल्या परिसराची वाङ्मयीन भूक भागविण्याचे काम, स्थानिक साहित्य संस्था चांगल्या पद्धतीने करीत आहेत. काही स्थानिक पातळीवर वाङ्मयीन प्रेमी एकत्र येऊन अभिरुचीसंपन्न अशी वाङ्मयीन नियतकालिके प्रकाशित करीत आहेत. उदा. दर्शन, खेळ, ऐवजी, काव्याग्रह, आत्मभान, साक्षात, आकांक्षा इत्यादी. प्रस्थापित साहित्य संस्थांच्या नियतकालिकांचे अनियमित होणारे प्रकाशन (उदा. युगवाणी, साहित्य, प्रतिष्ठान इ.), या नियतकालिकांमधील वाङ्मयाचा दर्जा यांचा जर विचार केला, तर हौशी साहित्य संस्थांच्या वतीने प्रकाशित होणारी नियतकालिके लाखमोलाने बरी वाटतात.

तत्त्ववेत्ता खलिल जिब्रान ज्याप्रमाणे म्हणतो की, की जिथले कलावंत जनतेच्या शूद्र वासना पेटविण्याचाच उद्योग करतात-त्या राष्ट्राची कीव करा. त्या राष्ट्राची कीव करा, की जिथले पुढारी कोल्ह्यासारखे लबाड असतात आणि तिथले विद्वान लोकांचे डोळे दिपविण्यातच स्वत:ला कृतकृत्य समजतात. आज वाङ्मयीन-सांस्कृतिक क्षेत्रांत महाराष्ट्राची थोड्याफार प्रमाणात अशीच अवस्था झाली आहे. मराठी भाषेचा मिथ्या अभिमान बाळगून, विविध छोट्या-मोठ्या पुरस्कारांची खैरात करून, चांगल्या लेखन करणाऱ्या लेखकांना संपविण्याचे काम, स्थानिक राजकारणी आणि पुरस्कार वाटणाऱ्या साहित्य संस्थांनी सुरू केले आहे. कोणत्याही सामान्य कलाकृतीची उंची अतिशय फुगवत न्यायची आणि त्या कलाकृतीच्या लेखकाची तुलना सरळ मर्ढेकर, केशवसुत, कुसुमाग्रज यांच्यापर्यंत करून ठेवण्याचा प्रताप सध्या सुरू आहे. इतर कोणत्याही राज्यात महाराष्ट्रासारखे गल्लीबोळातून पुरस्कार दिले जात नसतील. महाराष्ट्रात रोज डझनावरी पुरस्कार वाटले जात असल्यामुळेच, कुवत नसणारेही रातोरात लेखकराव होतात! इतर भाषांमधील ज्ञानपीठाची संख्या आणि मराठीतील ज्ञानपीठाची संख्या बघितली तर खरोखरच आपल्या मराठीतील लेखकांच्या अनुभवांची उंची का वाढत नाही याची प्रचिती येते.

आजच्या समकालीन विषयांना बगल देऊन मराठी साहित्यातून विनोद हद्दपार होत आहे का? किंवा आजच्या महिला नेमकं काय वाचतात? अशा पांचट आणि पोचट विषयांवर चर्चा करण्यातच साहित्य संस्था धन्यता मानतात. शेतकऱ्यांच्या आत्महत्या, लवासा प्रकरण, शेतकऱ्यांवरचा गोळीबार, खैरलांजी, वाढती बेरोजगारी, अण्णा हजारेंचे, मेधा पाटकरांचे आंदोलन आणि साहित्यिकांची भूमिका; अशा वास्तवपूर्ण समस्यांवर साहित्यसंमेलनांच्या व्यासपीठावर 'ब्र' सुद्धा निघत नाही.

गटातटांमध्ये विभागलेल्या साहित्यिक-लेखकांमध्ये एकमेकांची आम्ही कशी जिरवली, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या निवडणुकीत याला कसं पाडलं... त्याला जीवनव्रती पुरस्काराने सन्मानीत केले, याला साहित्य अकादमी नाही मिळू दिली, त्याला पुढच्या वर्षी विश्व साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचे गाजर तर दुसऱ्याला महाराष्ट्र भूषण पुरस्कारासाठी शिफारस किंवा साहित्य संस्कृती मंडळाच्या अध्यक्षपदी वर्णी; अशी लालूच थोरामोठ्यांना साहित्य-संस्थांचे पदाधिकारी दाखवीत असतात.

साहित्य संस्थांना दरवर्षी महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाकडून पाच लाख रुपयांचे वार्षिक अनुदान त्यांच्या शाखा, त्यांच्या विभागीय संमेलनांचे आयोजन, ग्रंथालय व वाङ्मयीन नियतकालिकांच्या प्रकाशनासाठी मिळत असते. या साहित्य संस्थांच्या वतीने सांस्कृतिक उपक्रम गावपातळीवर झाले पाहिजेत, अशी अपेक्षा असताना, फक्त मुंबई, पुणे, औरंगाबाद आणि नागपूर या चारच मुख्यालयाच्या ठिकाणी, पुस्तक प्रकाशने व सत्कार समारंभाचे कार्यक्रम करण्यातच या साहित्य संस्था धन्यता मानतात. नवे सकस वाचक वाढले पाहिजेत, तालुका पातळीवर नवे वाङ्मयीन उपक्रम सुरू झाले पाहिजेत, याबाबत कोणालाच रुची दिसत नाही. जो-तो आपापली संस्था नागोबासारखी स्वत:च्याच कळपात ठेवू पाहत आहे.

सत्तरी-पंचाहत्तरी ओलांडली तरी या साहित्य संस्थांमधील ज्येष्ठांची संस्थेत मिरवून घेण्याची हौस पूर्ण होताना दिसत नाही. नवे काही करायचे नाही व नव्या दमाच्या व्यक्तींकडे नेतृत्व जाऊ द्यायचे नाही - याचेच राजकारण करण्याचे अड्डे आज या साहित्य-संस्था झाल्या आहेत. अ.भा.म.साहित्य महामंडळ व महाकोष विश्वस्त मंडळात नव्याण्णव टक्के सभासद हे वय वर्षं साठच्या पुढेच आहेत. ज्येष्ठ म्हणून त्यांच्या ज्ञानाचा अशा संस्थांना खरंच जास्त फायदा होतो. पण अशा ज्येष्ठांना ना एस.एम.एस. करता येतो, ना कोणाचा एस.एम.एस. वाचता येतो - ही वस्तुस्थिती आहे. महामंडळातील ऐंशी टक्के व्यक्तींकडे स्वत:चा इ-मेल आयडीसुद्धा नाही आणि महामंडळ निघाले दरवर्षी विश्वसाहित्य संमेलन भरवायला - किती हा विरोधाभास? महामंडळाचे किंवा घटक संस्थांचे संमेलन आयोजित करण्यासाठी दरवर्षी बळीचे बकरे तयार करण्यात येतात. राजाश्रय असणाऱ्या आमदार, खासदार, मंत्री, सहकार सम्राट यांच्या संस्था संमेलनाच्या आयोजनाला बळी पडतात. साहित्य सेवा केल्याचे पुण्य पदरी पडण्याच्या नादात, या साहित्य संस्थांकडून आयोजकांच्या हाती फक्त कुंकवाचा करंडा दिला जातो - ''तुम्हीच पैसे गोळा करा, नाव फक्त महामंडळाचं लावा'' - असा हा सरळसरळ सौदा असतो. आज अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनांचे आयोजन करणाऱ्या उत्सुक संस्थांमध्ये वाढ होत आहे. पण प्रादेशिक संमेलने कोणाच्यातरी गळ्यातच मारली जातात. प्रादेशिक संमेलनाच्या आयोजनासाठी, घटक संस्था फुटकी कवडीही देत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. अखिल भारतीय स्तरावरच्या संमेलनाच्या आयोजनातून लाखोंची कमाई (बचत) होते. तर प्रादेशिक संमेलनांच्या आयोजनात मोठ्या प्रमाणावर तूटच येते. प्रादेशिक संमेलनाच्या

आयोजनात पुढाकार घेणारी साहित्याशी संबंधित एखादी शाखा असेल, तर ती संमेलनानंतर कायमची बंद पडते, ही वस्तुस्थिती आहे.

महाराष्ट्रात एक लक्ष लोकसंख्येपेक्षा जास्त लोकसंख्या असणाऱ्या तीनशे अठ्ठावन्न तालुक्यांमध्ये या प्रादेशिक साहित्य संस्थांचे जाळे हवे होते. आज महाराष्ट्रात शंभरपेक्षा जास्त तालुक्यांमध्ये नावालाही या संस्थांचे अस्तित्वच नाही. मुंबई-मराठी साहित्य संघ यांची एकमात्र शाखा मुंबईला आहे. त्यांची सभासद संख्या सतराशेच्या घरात आहे. पुण्याच्या मराठी साहित्य परिषदेचे कार्य चौदा जिल्ह्यांमध्ये विखुरलेले असून त्यांच्या फक्त सत्तावीस शाखा आहेत व नऊ हजार सभासद आहेत. मराठवाडा साहित्य परिषदेच्या सव्वीस शाखा व तीन हजार सभासद आहेत. विदर्भ साहित्य संघाच्या पासष्ट शाखा व सहा हजार पाचशे सभासद आहेत. महाराष्ट्राच्या साहित्यक्षेत्राचे नेतृत्व करणाऱ्या या चार साहित्य-संस्थांच्या शिलेदारांची आजीव सभासद संख्या, बारा कोटींच्या महाराष्ट्रात फक्त वीस हजार दोनशे व एकूण शाखांची संख्या फक्त एकशे सहाच्या आसपास आहे. या शाखांमध्येही जास्तीत जास्त फक्त पंचवीसएक शाखाच खऱ्या अर्थाने कार्यरत आहेत, बाकी फक्त कागदोपत्री!

महाराष्ट्रात गाव तेथे ग्रंथालय मोहीम गाजावाजा करून राबविण्यात आली. जी ग्रंथालये सुरू आहेत, त्यातील ऐंशी टक्के ग्रंथालयांना भ्रष्टाचाराची उधई लागली आहे. 'क' आणि 'ड' दर्जाच्या सार्वजनिक ग्रंथालयांमधून ना वाचनसंस्कृती वाढविण्याचे प्रयत्न होतात, ना गावची सांस्कृतिक भूक भागविण्याचे प्रयत्न होतात. गेल्या चाळीस वर्षांपासून सार्वजनिक ग्रंथालयांच्या कर्मचाऱ्यांचा वेतनश्रेणीचा प्रश्न धूळ खात पडला आहे. अनुदानवाढीचा तुकडा टाकला, की वाचनसंस्कृती वाढविण्याचे फार मोठे पवित्र कार्य शासनाने केले असा समज करून घेणारा एक मोठा वर्ग महाराष्ट्रात तयार झाला आहे. नवे वाचक घडविण्याचे काम शाळा-शाळांमधून, सार्वजनिक ग्रंथालयांमधून, साहित्य-कला-संस्कृतीच्या संस्थांमधून आजतरी बंद आहे. वाचनसंस्कृती मंदावते आहे, आजचा युवक साहित्यापासून दूर जात आहे, यावर फक्त गळे काढण्याचेच काम साहित्य-संस्था करीत आहेत. पण ग्रंथालयांचे प्रश्न सुटले पाहिजेत, यासाठी साहित्य-संस्था रस्त्यावर उतरताना दिसत नाहीत.

वाचनाची आवड ही शालेय जीवनापासूनच वृद्धिंगत होते. पूर्वी जशी पूरक वाचनमाला शालेय शिक्षणाचा एक भाग होती, तशीच पूरक वाचनमाला, वर्ग ५ वी ते पदवीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी आता नव्याने अनिवार्य असावी. पाचवी ते आठवीपर्यंत प्रत्येक वर्षी विद्यार्थ्यांना मराठीतील श्रेष्ठ दर्जाच्या बाल-कुमार गोष्टींचे, कवितांचे वाचन हवे. नववी-दहावीमध्ये मराठी साहित्यक्षेत्रातील श्रेष्ठ कथा आणि विविध कलांचा आस्वाद हवा. अकरावी-बारावीतील विद्यार्थ्यांसाठी श्रेष्ठ दर्जाच्या कविता तथा ललित लेखांचा समावेश असावा. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी श्रेष्ठ दर्जाच्या कादंबऱ्यांची तोंड ओळख, द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना श्रेष्ठ दर्जाचे आत्मकथनांचा परिचय, तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना सर्व साहित्यकृतींचा आढावा आणि जागतिक दर्जाच्या श्रेष्ठ कलाकृतींचा परिचय असावा; असे विविधांगी कला व साहित्याची सांगड पूरक वाचनातून घातल्याशिवाय वाचन संस्कृती वाढणार नाही. मुळात, कोणी कोणत्याही विद्याशाखेचा विद्यार्थी असो, त्याला पूरक वाचन हे अनिवार्य असावे. म्हणजे साहित्य-कला हा विषय फक्त आर्टवाल्यांचा आहे व विज्ञान, वाणिज्य, तंत्रज्ञान, संगणकवाल्यांना यातून सूट आहे असे होता कामा नये. महाराष्ट्रात पदवीपर्यंत सर्वांना पूरक वाचनमाला अनिवार्य केल्याशिवाय वाचनसंस्कृतीला चांगले दिवस येणार नाहीत. यादृष्टीने महामंडळाने खरंतर प्रयत्न करावयास हवे. परंतु ही मागणी ना विद्रोही साहित्य संमेलनवाले, ना ग्रामीण ना आंबेडकरवादी उचलून धरतात, ना महामंडळाला अशा काही वेगळ्या उपक्रमात विशेष रुची वाटते. उद्याचा वाचक घडला पाहिजे यासाठी या वाङ्मयीन संस्थांकडे उपक्रमच नाहीत, हेच सत्य!

मी स्वत:, या वाङ्मयीन घटक संस्थांचा तथा अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचा सक्रिय सदस्य या नात्याने, आजरोजी चालणारा कारभार जवळून बघितला आहे. या वाङ्मयीन संस्थांच्या घटक संस्थांमध्ये वाङ्मयीन उपक्रमांबाबत खरच गांभीर्य दिसत नाही. जाण्यायेण्याच्या प्रवासभाड्यांबाबत चालणारे रुसवे-फुगवे, शह-काटशहांच्या राजकारणात कोण कोणावर कशी मात करतो, या गोष्टीच अधिक गांभीर्याने घेताना दिसतात!

आजरोजी साहित्याच्या घटक संस्थांना स्थानिक पातळीवर पर्याय उभे झालेले असतानासुद्धा, शासकीय मदतीमुळेच प्रस्थापित संस्थांची मिरासदारी टिकून आहे. काम करणाऱ्या प्रत्येक छोट्या-मोठ्या साहित्य संस्थांना शासनाचे अनुदान जर मिळत गेले तर प्रस्थापित साहित्य संस्थांची मिरासदारी कमी होईल. आज अखिल भारतीय स्तरावर व राज्य-विभाग स्तरावर अशी तीस ते पस्तीस साहित्य संमेलने महाराष्ट्रात दरवर्षी होतात. गुराखी साहित्य संमेलनापासून बंजारा साहित्य संमेलनापर्यंत, दलित साहित्य संमेलनापासून विद्रोही साहित्य संमेलनापर्यंत; विविधांगी संमेलने होत आहेत. पण या विविधांगी साहित्य संमेलनांना शासन आर्थिक सहकार्य करताना दिसत नाही.

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाजवळ संमेलनासाठी उभा केलेला पंचाहत्तर लाखांपेक्षा जास्त निधी आहे. हा निधी एक कोटीच्या घरात गेल्यावरच त्याच्या व्याजातून अखिल भारतीय संमेलने शासकीय मदतीविना घेण्याचा विचार महामंडळाचा आहे. परंतु निधी एक कोटीच्या घरात जात नाही व जमा झालेल्या निधीवरील व्याजावर इन्कम टॅक्स भरावा लागतो, अशी कोंडी आज महाकोषाची झाली आहे. एक कोटी रुपये उभे झाल्यावरही त्याच्या व्याजातून, अखिल भारतीय स्तरावरचे साहित्य संमेलनांचे आयोजन होणे, ही अशक्य बाब आहे. तरीसुद्धा एक कोटी रुपये जमा करण्याचा महाकोषाचा अट्टहास का? हा प्रश्नही कोणाला पडत नाही.

कानडी भाषेच्या अखिल भारतीय स्तरावरील साहित्य संमेलनासाठी, कर्नाटक राज्य सरकार बारा कोटी रुपये खर्च करते. महाराष्ट्र सरकार पंचवीस लाख रुपयांचे अनुदान उपकार केल्याच्या भावनेने देते, यातच आपल्या महाराष्ट्राचा 'विशाल' सांस्कृतिक दृष्टिकोन दिसून येतो.

महाराष्ट्र राज्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षापासून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक उन्नयनासाठी प्रत्येक जिल्हा साहित्य संमेलनाला पाच लाख रुपये, विभागीय छोट्या-मोठ्या साहित्य संमेलनाला शासनाने दरवर्षी पंचवीस लाख रुपये व अखिल भारतीय संमेलनाला एक कोटी रुपयांची तरतूद करावी, तेव्हाच कुठे या साहित्य-कला-वाचन संस्कृतीला थोडेफार बरे दिवस येतील. सार्वजनिक वाचनालयांच्या धर्तीवर गावपातळीवर छोटी बालवाचनालये, युवावाचनालये विकसित व्हावीत यासाठी शासनाने तथा साहित्याच्या घटक संस्थांनी, नियोजनबद्धतेने कार्य उभे केले तरच काही चांगले भवितव्य दिसण्याची शक्यता आहे. तीन हजार कोटी रुपयांचे वार्षिक बजेट असणाऱ्या महाराष्ट्रात, साहित्य आणि संस्कृतीच्या खात्यावर अवघे तीन कोटी रुपये वाट्यावर येतात, यातूनच महाराष्ट्राच्या, आजच्या यशवंतराव चव्हाणांच्या वारसदारांना, सांस्कृतिक जाण आणि भान किती आहे याचा बोध होतो.

२०१२-१३ हे वर्ष कै. यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दीचे वर्ष आहे. या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे बजेट तीन कोटींवरून तीस कोटी रुपयांपर्यंत वाढविण्याची तरतूद करावी व त्यातून साहित्यविषयक लोकाभिमुख उपक्रमांना उचित मदत करावी. संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हास्तरावर जसे महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने ग्रंथोत्सवाचे आयोजन केले, तसेच प्रत्येक तालुका पातळीवर सुद्धा आयोजन व्हावे. सोबतच प्रत्येक जिल्ह्यात दरवर्षी जिल्हास्तरीय साहित्य संमेलनांचे आयोजनही, साहित्य संस्कृती महामंडळाने करावे. यातूनच अनेक नवोदितांना व्यासपीठ उपलब्ध होणार आहे.

महाराष्ट्रातील साहित्य संस्थांनी काय दिवे लावलेत? वाङ्मयीन निकोप वातावरणासाठी काय प्रकाश पाडला? गावोगावी साहित्य संस्था उभ्या करण्यात का अपयश आले? युवक साहित्यापासून का दूर जात आहेत? याची परखड कारणमीमांसा होणे गरजेचे आहे. आजच्या साहित्य संस्था ह्या खुर्ची बचाव पवित्रा घेणाऱ्या संस्थाधिपतींच्या हातच्या बाहुल्या झाल्या आहेत. प्रस्थापित राजकारणी लोकांना लाजवेल, इतक्या लाजबाब पद्धतीचे राजकारण महाराष्ट्रातील साहित्य संस्थांमध्ये सध्या सुरू आहे. त्यामुळेच अस्सल साहित्यिकांचा या साहित्य संस्थांमध्ये जीव गुदमरतो व ह्या साहित्य संस्था चालविणारे आजचे सो-कॉल्ड साहित्यिक 'साहित्यलेखन करणे व साहित्य संस्था चालविणे ह्या दोन वेगवेगळ्या बाबी आहेत' - असे पटवून देताना दिसतात. आजच्या या साहित्य संस्थांमध्ये ज्येष्ठांच्या हेकेखोर वृत्तीमुळे युवा कार्यकर्ते नाहीत. बोटांवर मोजण्याइतपत जे प्राध्यापक या साहित्य संस्थांमध्ये लुडबुड करतात, त्या बिचाऱ्यांना नॅकसाठी व्यक्तिगत परफॉर्मस् दाखवावा लागतो म्हणून हे बिचारे अशा साहित्य संस्थांमध्ये मन मारून कामे करीत राहतात आणि पुढे चांगले मुरल्यावर अशा संस्थांचे पदाधिकारी बनतात. बाकी सर्वसामान्य रसिक वाचकांना वाटते की, या साहित्य-संस्थांची वाटचाल फार मोठी सचोटीने व प्रामाणिकपणे सुरू आहे! परंतु खोलात जाऊन बघितले तर साहित्य संस्थांचे सारेच दीप मंदावलेत आता, ही वस्तुस्थिती आहे!

साहित्य-कला-संस्कृतीच्या क्षेत्रात आज जी मरगळ आली आहे, ती मरगळ दूर करण्यासाठी नकारघंटा वाजविण्यापेक्षा, प्रत्येकाने आपापल्या कुवतीप्रमाणे स्थानिक पातळीवर छोटे-मोठे वाङ्मयीन उपक्रम सुरू केले, तर उद्याचा महाराष्ट्र हा निश्चितच सुसंस्कृत तथा वाचन-लेखन-चिंतन करणाऱ्या समुदायाचा असेल. असा महाराष्ट्र घडविण्याची फार मोठी जबाबदार आज आपल्यावर आहे.

चौकट

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या वतीने, दरवर्षी साहित्य संमेलनाचा अध्यक्ष निवडला जातो. आज यासाठी सातशे एक्याण्णव मतदार आहेत. त्यामध्ये पूर्वाध्यक्ष बारा, महाकोषाचे विश्वस्त मंडळ नऊ, नागपूर-पुणे-मुंबई-औरंगाबाद चार घटक संस्थांचे प्रत्येकी एकशे पंचवीस मतदार, आंध्रप्रदेश-कर्नाटक-मध्यप्रदेश-गोवा आणि छत्तीसगड या पाच समाविष्ट संस्थांचे प्रत्येकी चाळीस मतदार, बडोद्याच्या एका संलग्न संस्थेचे दहा मतदार व संमेलन घेणाऱ्या निमंत्रक स्वागत समितीचे साठ मतदार; असे फक्त एकूण सातशे एक्यानऊ मतदार मतदानाचा हक्क बजावतात. लवकरच महामंडळाची घटना दुरुस्ती होऊन चार घटक संस्थांचे प्रत्येकी एकशे पंचवीस ऐवजी एकशे पंचाहत्तर आणि समाविष्ट संस्थांचे चाळीसवरून साठ सभासद करण्यात येणार आहेत. म्हणजे पुढच्या वर्षीपासून (२०१२) नऊशे एक्याण्णव मतदारांना अ.भा.म.साहित्य संमेलनाचा अध्यक्ष निवडण्याचा हक्क मिळणार आहे. महाराष्ट्रात आज एक लाखाच्या घरात लेखक-साहित्यिक-कवी असताना, अवघ्या एक हजार मतदारांना आपल्या साहित्य संमेलनाचा अध्यक्ष निवडण्याचा हक्क बहाल होतो - ही साहित्यिक लोकशाही अजूनही बाल्यावस्थेत आहे, ती केव्हा वयात येणार? हा खरा प्रश्न आहे!

**- नरेंद्र लांजेवार**
ग्रंथपाल, भारत विद्यालय, बुलडाणा
भ्रमणध्वनी-९४२२१८०४५१
l_narendra2001@yahoo.com

# अंधारातील स्वगते

'आविष्कार'तर्फे आयोजित केलेल्या अरविंद देशपांडे नाट्यमहोत्सवात, ३ जानेवारीला 'अंधारातील स्वगते'चा प्रयोग सादर करण्यात आला. त्याची संकल्पना होती षांताराम पवारांची. विषय होता भ्रष्टाचार. चार प्रातिनिधिक पात्रांनी चार स्वगते यात सादर केली. लेखक होते रघुवीर कुल, गंगाराम गवाणकर, आनंद म्हसवेकर आणि पुरुषोत्तम बेर्डे. रंगमंचावर आपल्या अभिनयातून त्याला नाट्यरूप दिलं ते संजय मोने, प्रमोद पवार, दीपक करंजीकर आणि विशाखा सुभेदार यांनी.

षांताराम पवारांच्या मनात सतत नव्या कल्पना येत असतात. जिव्हाळ्याच्या समकालीन समस्यांकडे एक सजग नागरीक म्हणून पाहत असताना नुसतं कविता आणि चित्रांचं माध्यम त्यांना अपुरं वाटू लागतं आणि मग त्या ध्यासातून मागच्या वर्षी साकारलेलं पर्यावरणासंबंधीचं 'ऋतुसंहार' प्रदर्शन किंवा 'अंधारातील स्वगते' आकाराला येतात. भ्रष्टाचार, हा अण्णा हजारेंच्या आंदोलनामुळे ज्याच्या त्याच्या तोंडी झालेला विषय. या भ्रष्टाचारावर काहीतरी तरी करावं असं पवारांच्या मनाने घेतलं. सुरुवातीला त्यांना पथनाट्य करायचं होतं. पण ते प्रत्यक्षात आणण्याच्या अडचणी लक्षात आल्यावर ते स्वगतांकडे वळले. एका अर्थाने ते बरंच झालं. पथनाट्य हा प्रकार थोडासा प्रचारकी वळणाचा आणि बाह्य नाट्यात्मतेकडे झुकणारा नाट्यप्रकार. स्वगतं त्यामानाने एकाच वेळी अत्यंत खासगी आणि सार्वत्रिक. शेक्सपिअर, राम गणेश गडकरी यांपासून ते दिवाकरांच्या नाट्यछटांपर्यंत त्याला अभिजाततेची एक परंपरा आहे. पवारांनी स्वगतांचा पर्याय निवडला हे योग्यच झालं.

ही अंधारातील स्वगते आहेत. अंधार ही पवारांच्या कलाकृतींमधून येणारी नेहमीची प्रतिमा आहे. भ्रष्टाचार हा बहुतेक वेळा छुपा असतो. दुसऱ्यांच्या नकळत अंधारात घडणारा. त्यामुळे या स्वगतांचं नेपथ्यही काळ्या-करड्या रंगांमध्येच केलेलं होतं. बॅकड्रॉप म्हणून एका कोपऱ्यात तिरंगी झेंड्याची आठवण व्हावी असा करड्या रंगछटांमध्ये असलेला आडवा ध्वज. त्याच्या मध्यावर अशोक चक्राऐवजी शिंतोडे उडवणारा काळा डाग. भ्रष्टाचाराचं प्रतीक. दुसऱ्या बाजूला एक लेव्हल आणि खुर्चीसारखी नाटकातली एखादी प्रॉपर्टी. आणि याच्या जोडीला एक लाऊडस्पीकर पण लावलेला दिसेल न दिसेल असा. स्वगतांच्या सुरुवातीला षांताराम पवारांनी लिहिलेलं निवेदन नाना पाटेकरांच्या आवाजात ऐकवलं गेलं आणि प्रयोगाच्या शेवटी धाडकन तो ध्वज खाली आल्याची ॲक्शन. त्यामुळे चारही प्रवेश आपोआपच एका नाट्यानुभवात बांधले गेले.

पवारांचं निवेदन म्हणजे एक कविताच होती–

ऐका हो ऐका!
घातपात नगरातील
तोंड दाबून बुक्के खाणाऱ्यांची
हाताची घडी तोंडावर बोट ठेवणाऱ्यांची
खाटकाकडे निघालेल्या कळपांची
आंधळ्या डोळ्यांतून वाहणारी
रक्ताचा रंग नाचवणारी
भगवंताला पिंजऱ्यात उभी करणारी
लफंग्यांची करणी काळी
तुमची आमची नेहमीची रडगाणी
ऐका हो ऐका!
आविष्कार सादर करीत आहे
नेपथ्यकार षांताराम पवारांच्या
स्वप्नातून झिरापलेली
अंधारातील स्वगते
ऐका हो ऽऽ ऐका
अंधारातील स्वगते

पहिलं स्वगत आम आदमीचं होतं. रघुवीर कुल यांनी लिहिलेलं. सामान्य माणसाला पदोपदी अनुभवाला येणारा भ्रष्टाचार आणि स्वत:चा कळत-नकळत असलेला सहभाग, यावरचं नाण्यांच्या चिल्लरीपासून ते देवस्थानांच्या लक्षावधी रुपयांच्या देणग्यांपर्यंत, माणसाचा स्वार्थ कसा बोकाळला आहे त्याचं; छोट्या पण मार्मिक निरीक्षणांमधून आणि चिमटे घेणाऱ्या भाष्यामधून चित्रण केलेलं होतं. संजय मोने यांनी ते आपल्या अभिनयातून नेमकेपणाने प्रेक्षकांपर्यंत पोचवलं. पुरुषोत्तम बेर्डे यांनी बढती मिळालेल्या एका स्त्रीची व्यक्तिरेखा 'मी बाई, खाऊबाई'मध्ये उभी केली होती. या

‘खाऊबाई’ना ‘खाऊ की नको?’, ‘लक्ष्मी की सरस्वती?’ असा हॅम्लेटप्रमाणे यक्षप्रश्न पडलेला आहे. त्याचं उत्तर शेवटी होकाराच्या बाजूनं पडतं, हा भाग वेगळा! पण नैतिक-अनैतिकतेचा प्रश्न, भावनात्मकता आणि कर्तव्यनिष्ठ विचार, यातली आंदोलने त्यातल्या गमतीदार आणि गंभीर विरोधांसकट या स्वगतात उमटली होती.

उरलेल्या स्वगतांमध्ये आनंद म्हसवेकर यांनी भ्रष्टाचारालाच दिलेलं मानवी रूप, ‘भ्रष्टाचारी’मध्ये तितकंसं प्रभावी वाटलं नाही. त्यातला युक्तिवाद आणि भ्रष्टाचाराची उदाहरणं यात वेगळेपणा काही नव्हता. गंगाराम गवाणकर यांनी ‘द्रोणाचार्य’मध्ये एकलव्याच्या कथेला द्रोणाचार्यांच्या स्वगतातून जो एक वेगळा अर्थ दिला, तो नक्कीच चांगला होता. कुणाच्या तरी पदरी आश्रित म्हणून राहिलं, की विवेक बाजूला ठेवावा लागतो आणि एकलव्याला गुरुदक्षिणेच्या मिषाने मनाविरुद्ध जी शिक्षा द्यावी लागते, त्यामुळे आयुष्यभर पश्चात्ताप झालेला द्रोणाचार्य या स्वगतात होता. अश्वत्थाम्याच्या जखमेचा संबंध एकलव्याशी जोडण्याचा प्रयत्नही अर्थपूर्ण वाटला. मात्र या स्वगतात वर्तमानाचा संदर्भ नव्हता. त्यामुळे या स्वगतातला भ्रष्टाचार एखाद्या ग्रीक शोकनाट्यात शोभावा तसा दूरस्थ वाटला.

‘अंधारातील स्वगते’ वर्तमान परिस्थितीवरील भाष्यं म्हणून समर्पक आणि नीटनेटकी वाटली. विजय केंकरे यांनी त्याचं दिग्दर्शन केलं होतं. नाट्यसंहितेचा भाग म्हणून स्वगतं आता इतिहासजमा झालेली असली, तरी एक स्वतंत्र नाट्यप्रकार म्हणून स्वगतामध्ये नाट्याविष्काराच्या अनेक क्षमता दडलेल्या आहेत, याचा सुखद प्रत्यय ‘अंधारातील स्वगते’च्या निमित्ताने आला. आणि भ्रष्टाचाराबद्दल बोलायचं तर ती एक पुरातन काळापासून चालत आलेली सनातन प्रवृत्ती आहे. आज तर भ्रष्टाचाराला समांतर व्यवस्थेचं स्वरूप आलेलं आहे. अशा प्रयोगांमधून भ्रष्टाचार संपेल अशातला भाग नाही. किंवा तो एखाद्या चळवळीचाही भाग नाही. एक कवी म्हणून पवारांना जे भावलं, संवेदनशील माणूस म्हणून भोवतालच्या वास्तवाची विदारकता जाणवली त्याची ही मनोरंजक पण उद्बोधक, बाहेरच्या भ्रष्टाचाराला नावं ठेवताना आत्मपरीक्षणही करायला लावणारी अशी एक स्वाभाविक प्रतिक्रिया होती. सामान्य माणसाचा सहजोद्गार म्हणूनच त्याकडे पाहायला हवं.

**– दीपक घारे**
४, शिवांजली, पाथर्ली रोड, गोग्रास वाडी,
डोंबिवली (पूर्व) – ४२१ २०१
gharedeepak@rediffmail.com



इंडिया प्रिंटिंग वर्क्स ही पुस्तक निर्मिती करणारी महाराष्ट्रातील एक अग्रगण्य संस्था. १ मार्च १९१२ रोजी त्यांच्या या व्यवसायास ८० वर्षे पूर्ण होत आहेत. हाती चालवायच्या ट्रेडल यंत्रापासून सुधारणा करत आज अद्ययावत यंत्रसामग्रीद्वारे अनेक प्रतिथयश लेखक व प्रकाशक संस्थांची पुस्तके इंडिया प्रिंटिंग वर्क्समध्ये छापली जातात. प्री-प्रेस, प्रेस व पोस्ट-प्रेस ही सर्व खाती एकाच छत्राखाली असणारे जे थोडेफार छापखाने महाराष्ट्रात आहेत त्यातील एक नामवंत अग्रणी म्हणून इंडिया प्रिंटिंग वर्क्सचे नाव घेता येईल. इंडिया प्रिंटिंग वर्क्सचे कार्यकारी संचालक आनंद लिमये हे मोठ्या अभिमानाने, ‘रोज किमान एक ते दोन पुस्तके इंडिया प्रिंटिंग वर्क्समध्ये छापली जातात’ असे सांगतात. सुबक व ठरावीक वेळेत छपाई व दर्जेदार बांधणी करण्याची त्यांची हातोटी वाखाणण्यासारखी आहे.

आधुनिक काळाला अनुसरून मार्गक्रमण करताना आनंद लिमये यांनी डिजिटल प्रिंटिंगचे मशीन घेऊन, प्रकाशकांसाठी कमीत कमी प्रती उपलब्ध करून देण्याचे एक नवीन दालन उघडून दिले आहे. गेल्या डिसेंबर महिन्यात ग्रंथालीचे संचालक सुदेश हिंगलासपूरकर व अरुण जोशी यांच्या हस्ते या नवीन यंत्राचे उद्घाटन झाले. इंडिया प्रिंटिंग वर्क्सचे डिजिटल विश्वातील पदार्पण म्हणजे प्रकाशकांसाठी एक पर्वणीच आहे. यामुळे १०० ते २०० प्रती एका दिवसात व कमी खर्चात तयार होऊ शकतात.

१ मार्च २०१२ रोजी ८० वर्षांची अव्याहत सेवा पूर्ण करणाऱ्या इंडिया प्रिंटिंग वर्क्सच्या व्यवस्थापकांना व कर्मचारीवर्गाला ग्रंथालीच्या हार्दिक शुभेच्छा !

# तू आहेस तुझ्या अंतरंगात! - ऋजुता दिवेकर

**रुचा तुळसकर**

बॉलिवूडची प्रसिद्ध तारका करिना कपूर हिला 'झिरो फिगर' मिळवून देणारी ऋजुता दिवेकर आहार व फिटनेसतज्ज्ञ म्हणून मान्यता पावलेली आहे. 'फिटनेस आणि वेटलॉस'चा मंत्र देणाऱ्या या मराठमोळ्या तरुणीची, तारेतारकांमध्ये चांगलीच क्रेझ निर्माण झाली आहे. तिने लिहिलेल्या 'डोण्ट लूज युवर माइंड, लूज युवर वेट' या पुस्तेकानेही विक्रमी खपाचे उच्चांक गाठले आहेत. सेलेब्रिटींची आघाडीची ट्रेनर असलेली ऋजुता, आपले ज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोचावे यासाठी रुइयामधील 'ओपन डे'सारख्या कार्यक्रमांतून प्रयत्नाशील असते.

गिरगावातील चाळीत एकत्र कुटुंबात राहणं- घरचं वातावरणही रूढीप्रिय-परंपरानिष्ठ, रुइया कॉलेजमधील मराठी वातावरणातील शिक्षण..... पण नंतरच्या दहा वर्षांत ऋजुता दिवेकर नामवंत पोषक आहारतज्ज्ञ बनून गेली. तिची ख्याती देशभर पसरली. एवढंच नव्हे तर सीएनएन या अमेरिकन वाहिनीच्या हॉट लिस्टमधील आशियातील तिघींपैकी एक म्हणून तिला लौकिक मिळाला. ती एकदम प्रकाशझोतात येण्याचं कारण म्हणजे, तिचं 'डोण्ट लूज युवर माइंड, लूज युवर वेट' हे पुस्तक साक्षात करिना कपूरच्या प्रमुख उपस्थितीत, सेलिब्रेटी वातावरणात प्रसिद्ध झालं! करिनानं स्वत: तिथं तिच्या पोषक आहारमंत्राचं कौतुक केलं. ती म्हणाली, ''ऋजुतामुळेच मी 'साइज झिरो' गाठू शकले.'' त्यावेळी करिनाचं वजन फक्त अठ्ठेचाळीस किलो झालं होतं. ती सडपातळ झाली होती आणि तरी तिची ऊर्जा ठणठणीत होती. त्या आधी तिचं वजन अडुसष्ट किलो होतं आणि टशन नावाच्या सिनेमासाठी तिला बारीक व्हायचं होतं. शायरा नावाच्या तिच्या मैत्रिणीनं तिला ऋजुताचा नंबर दिला आणि ती ऋजुताची 'क्लायंट' बनली.

करिनाला तिचे आवडते पराठे, पोहे, चीज, पनीर हे पदार्थ खाण्यास ऋजुतानं मुभा दिल्यामुळे करिना खूश होती. ही वर्ष दीड वर्षापूर्वीची गोष्ट. तेव्हापासून ऋजुता दिवेकर हे चर्चेत असणारं आणि प्रसिद्धीचं वलय लाभलेलं नाव बनलं. त्या नावाला न ओळखणारे सुशिक्षित अपवादात्मक असतील! तिला मिळालेल्या प्रसिद्धीचं कोणाला अप्रूप आहे तर कोणी तिच्या कर्तृत्वानं दिपून गेला आहे. तिची पुस्तकं वाचलेला त्यांचं गुणगान गातो, तर न वाचलेला ती मिळवून वाचण्यासाठी धडपडतो.


ऋजुता, ही 'योगशिरोमणी' हे 'एशियन इन्स्टिट्यूट ऑफ गॅस्ट्रोएण्टरॉ-लॉजी'तर्फे मानाचं न्यूट्रिशन ॲवॉर्ड मिळवणारी आहारतज्ज्ञ म्हणून मान्यता पावलेली व्यक्ती, करिना कपूरच नव्हे, तर प्रीती झिंटा, अनिल अंबानी, सैफ अली खान, कोंकणा सेन-शर्मा यांच्यासारख्या स्टार्सची पर्सनल आहारतज्ज्ञ; तरीही रुइया कॉलेजमध्ये महिन्याच्या महिन्याला येऊन व्याख्यानं देणारी. तिच्या इंग्रजी व मराठी पुस्तकांच्या आवृत्त्यावर आवृत्त्या प्रसिद्ध होत आहेत. नव्या क्लायंटला तिची ॲपाइंटमेंट दोन महिन्यांनंतरची मिळू शकते असा गवगवा पसरलेला आहे. खारला एस.व्ही.रोडवरील तिचं ऑफिस कम जिम पाहिलं, की तिच्या कर्तृत्वाची खात्री पटते. पण तिची स्वत:ची राहणी व वर्तनशैली मात्र योग्यासारखी साधी वाटली.

तिच्या दुसऱ्या पुस्तकानं तर विक्रमच केला. त्याचं नाव 'Women and the weight loss Tamasha.' पुस्तकाच्या मुद्रित प्रतीबरोबर ध्वनिमुद्रित प्रतदेखील तयार करण्यात आली. पुस्तकाच्या प्रसिद्धीनंतर आठवडाभरात त्याच्या एक लाख प्रती संपल्या. त्यांतील चाळीस हजार प्रतींची मागणी प्रसिद्धीपूर्व नोंदण्यात आली होती. तिची पुस्तके हिंदी, गुजराती, मराठी भाषांमध्ये उपलब्ध आहेत.

तिची आई म्हणते त्याप्रमाणे ती लहानपणापासूनच निर्भय आहे. तिची आई सौ. रेखा दिवेकर या प्रोफेसर. त्यांनी ऋजुताच्या 'विमेन ॲण्ड वेटलॉस तमाशा'चं भाषांतर करून मुलीच्या पुस्तकाचं भाषांतर करणारी मराठीतील पहिली आई, असा लौकिक मिळवला आहे. ऋजुताला तिच्या प्रोफेसर आईकडून ट्रेकिंग, योग, सकस जेवण यांचं बाळकडू मिळालेलं आहे.

जुन्या चाळीतल्या जीवनाविषयी ऋजुता आस्थेनं बोलते; त्या




ऋजुता दिवेकर यांची प्रकाशित झालेली पुस्तके

आठवणींमध्ये रमून जाते. आपल्या ज्ञानाचा फायदा सर्वसामान्य जनांना व्हावा म्हणून ती सार्वजनिक ठिकाणी व्याख्यानं देण्यास तयार असते. तिचे 'ओपन डे' तर रुइयासारख्या मध्यवर्ती ठिकाणी होतात.

ऋजुता आहे, खरंतर 'इंडस्ट्रियल केमिस्ट्री'ची विद्यार्थिनी, पण कॉलेजवयातच 'अॅरोबिक्स' आणि 'एस.एन.डी.टी.'मधून स्पोर्टस-सायन्स अॅण्ड न्यूट्रिशियनचा कोर्स केल्यावर, तीच आपली आवड आहे हे तिनं ओळखलं आणि मग स्वत:ला आहार-शास्त्राच्या क्षेत्रात पूर्ण ताकदीनिशी झोकून दिलं.

तिनं तिच्या धाडसी विधानांनी खाण्याच्या संदर्भातील अनेक फॅडं, रूढ कल्पना आणि भीती यांना फाटा दिला व लोकांच्या मनातील त्या बाबतची अढी दूर केली. 'काय खाऊ नको'पेक्षा 'सर्व काही खा' असं ती सांगत असते. ऋजुतानं पाश्चात्त्याचं अनुकरण न करता, भारतीय परंपरेतून चालत आलेली आणि प्रत्येक व्यक्तीचा वेगळेपणा जपणारी अशी खाण्याची पद्धत विकसित करण्यावर भर दिला. आपल्या परंपरांचा आणि प्रांतागणिक बदलणाऱ्या खाद्यसंस्कृतीचा आदर करा आणि आपल्या शरीराचं मागणं ऐका, अशा साध्या शब्दांत तिनं आपला खाद्यमंत्र पसरवला. दहा वर्षांच्या व्यावसायिक अनुभवातून तिनं शहरी भागातील भारतीयांच्या गरजा व अडचणी समजून घेऊन, त्यानुसार वेळोवेळी तिच्या कामाची पद्धत नव्यानं घडवली आहे.

पोषणविषयक अभ्यासक्रम तिनं प्रथम एस.एन.डी.टी. विद्यापीठातून आणि त्याविषयीचं प्रशिक्षण ऑस्ट्रेलियामधून घेतलेलं आहे. परंतु तिची खरी प्रेरणा आहे, ती उत्तर काशीची 'शिवानंद योग वेदान्त अॅकॅडमी'. ती म्हणते, की मला स्फूर्ती मिळाली ती आपल्या पारंपरिक आहारपद्धतीतून. एवढ्या मोठ्या भारतात प्रदेशवार, त्या त्या प्रदेशाच्या परिस्थितीनुसार आहारशैली आढळून येतात. त्या जुन्या पद्धती सांभाळत त्यामध्ये नवीन आधुनिक घटक टाकले गेले पाहिजेत. तिचा कोणत्याही पद्धतीच्या आहाराला आक्षेप नाही. मात्र ती बजावते, की तुम्ही तीन वेळा खात असाल तर आठ वेळा खा, पण नियमन करून खा.

तिचं क्रीडाविज्ञान विषयातही प्रशिक्षण झालं आहे. त्यामुळे ती अनिल अंबानींच्या संपर्कात आली. मुंबईत मॅरेथॉन शर्यती होतात, त्यासाठी तयारी करण्याकरता तिनं 'प्रोग्राम' तयार केला आणि चार वर्षांत वेगवेगळ्या वयोगटांतले पाचशे लोक शिकून तयार झाले. तिचा अभ्यासक्रम चौदा आठवड्यांचा आहे. तिच्या जिमचं नाव आहे 'ऊर्जा'. तिथं वेगवेगळ्या प्रकारचे व्यायाम चाललेले असतातच.

ऋजुता मध्यमवर्गातून आलेली असल्यामुळे, तिनं सर्वसामान्य जनांना पोषक आहार व शरीरप्रकृती या विषयाची माहिती देण्याकरता दर महिन्याला 'ओपन डे' ठेवलेला आहे. त्या दिवशी तिच्या 'प्रोग्राम'ला कोणीही येऊ शकतं. अर्थात त्यासाठी आधी नाव नोंदवणं गरजेचं आहे. ते (०२२) २४१४ ८१११ या नंबरवर सांगता येतं. ऋजुताला अनेक पुरस्कार लाभलेले आहेत. त्यांपैकी 'इंडिया टुडे'चा 'अंडर थर्टीफाइव्ह अचिव्हर्स' आणि 'व्हर्व्ह' मासिकानं तिचा पन्नास 'पॉवर वुमेन'मध्ये केलेला समावेश, तिला अधिक महत्त्वाचे वाटतात.

ऋजुताचा आग्रह शिळं किंवा पॅकेज केलेले पदार्थ खाऊ नका, नेहमी ताजेच पदार्थ खा असा असतो. तरीसुद्धा कधीतरी भजी, 'फास्ट फूड' खायलासुद्धा ती मुभा देते. पोषक आहार, उचित व्यायाम, निर्घोर झोप आणि स्वच्छ मन यामुळे आयुष्यभर निरोगी, सुदृढ व तंदुरुस्त राहणं सहज शक्य आहे, असं ती म्हणते.

बहुतांशी स्त्रिया असणाऱ्या क्लायंटचं तिच्या निरीक्षण ऋजुता बारकाईनं करते. तो तिचा कटाक्ष आहे. त्यांच्या तक्रारी, प्रॉब्लेम्स, लाइफस्टाइल या सगळ्यांतून तिला कुठेतरी जाणवत होतं, की प्रत्येक स्त्रीला आधार देईल (मग ती आठ वर्षांची असो की ऐंशी वर्षांची) आणि शारीरिक पातळीवर हळव्या असणाऱ्या स्त्रियांच्या प्रश्नांना उत्तरं देईल, असा 'गाइड' सोबत असण्याची गरज आहे, स्त्रीचा प्रवास पौगंडावस्था, गर्भारपण, बाळंतपण आणि रजोनिवृत्ती अशा आव्हानात्मक टप्प्यांमधून होतो. आरोग्याची गुरुकिल्ली असणारा घरातील आहारविभाग स्त्रीच्याच हातात असतो, पण तरीही ती स्वत:साठी त्याचा योग्य उपयोग करू शकत नाही. ऋजुताच्या त्याच

ऋजुतानं एका बंगाली पत्रकार मुलीला सुचवलेला दिवसभराचा आहार:
सकाळी सात-साडेसातला उठल्यानंतर -एक केळं आणि दूध व चुरमुरे गुळाबरोबर (साखर नको)
सकाळी साडेनऊ वाजता -अंड्याचा पांढरा बलक आणि टोस्ट
सकाळी साडेअकरा वाजता -शेंगदाणे किंवा फळे (ऋजुताला ज्यूस पिणं पसंत नाही.)
दुपारी एक-दीड वाजता -जेवण, त्यात तांदूळ, डाळ, परतलेली भाजी, मासे.
दुपारी साडेतीन वाजता - पुन्हा शेंगदाणे
सायंकाळी साडेपाच वाजता - फोडणीचे चुरमुरे (पॉपकॉर्न नकोच, असे ती बजावते)
सायंकाळी सात-साडेसात वाजता - भात, भाजी आणि मासे (शक्य तो थोड्या प्रमाणात)
ऋजुतानं सांगितलेलं कुपथ्य
वजनाच्या काट्याकडे लक्ष देऊ नका. (वजन कमी व्हायला थोडा वेळ तरी द्याल की नाही? तिचं भाष्य.)
रात्रीचं जेवण उशिरा घेऊ नका
दोन जेवणांमध्ये जास्त वेळ ठेवू नका.
अवेळी खाऊ नका. उदाहरणार्थ संध्याकाळी सातनंतर पिझ्झा टाळा.
(टेलिग्राफवरून)

कळकळीचं फलित म्हणजे प्रत्येक स्त्रीच्या, थोड्याफार फरकानं सारख्या असणाऱ्या आयुष्याला आधार देणारं आणि त्याचबरोबर तिला खंबीर बनवणारं 'विमेन अॅण्ड द वेटलॉस तमाशा' हे पुस्तक. तिच्या दहा वर्षांच्या व्यावसायिक जीवनानुभवाचा परिपाक म्हणजे तिचं 'डोण्ट लूझ युअर माइण्ड लूझ युअर वेट' हे पुस्तक म्हणता येईल. त्यातील चतु:सूत्री:

- उठल्या उठल्या दहा मिनिटांच्या आत काहीतरी खावं.
- दर दोन तासांनी खावं.
- खूप जास्त काम असल्यास जास्त व कमी काम असल्यास कमी खावं.
- दिवसातलं शेवटचं खाणं झोपण्यापूर्वी दोन तास आधी घ्यावं, इतक्या सहजसोप्या शब्दांत तिनं सुखी शरीराचा मूलमंत्र सांगितला आहे!

तिनं निरामय आरोग्यासाठी चार धोरणं सुचवलेली आहेत. ती स्त्रीचा आहार, व्यायाम, निद्रा व नातेसंबंध यांविषयी आहेत. नुसतंच खाणं आणि बारीक होणं-न होणं, या न संपणाऱ्या चक्राच्या पलीकडे जात संपूर्ण आयुष्य सुखी कसं जगावं, याचं विवेचन तिच्या आहारविषयक तत्त्वसूत्रांत आहे.

हिमालयात जाऊन प्राणायाम, योग केल्यामुळे किंवा भारतभर फिरून अनेक लोकांना भेटल्यामुळे ऋजुता 'थर्ड पर्सन' म्हणून

## कर्तृत्वाच्या गौरवगाथा

लता मंगेशकर, सचिन तेंडुलकर, माधुरी दीक्षित अशा व्यक्ती थोर असतात. समाजाला अशा व्यक्तींचा आधारही वाटतो; परंतु समाज चालता राहतो-घडतो तो सर्वसामान्यांच्या कर्तृत्वावर. त्यामुळे सेलिब्रिटींबरोबर सर्वसामान्यांतील आगळ्यावेगळ्या कर्तृत्वाची नोंद करण्याचा प्रयत्न 'थिंक महाराष्ट्र'कडून केला जात आहे.

मराठी माणसात जसा संकोच आहे तसा न्यूनगंडही आहे. त्याचे एक प्रमुख कारण म्हणजे महाराष्ट्राचे विद्यमान कर्तृत्व आपल्याला माहीत नसते. उलट, महाराष्ट्रात इतिहासात रमण्याची (शिवाजी, पेशवे यांची थोरवी गात बसण्याची) वाईट खोड आहे. त्यातूनही न्यूनगंड जोपासला गेला आहे. दुसरे असे, की समाजातील गुणवत्ता (शिक्षण, क्रीडा, व्यवसाय-वृत्ती वगैरे क्षेत्रांतील) जोपासण्याची आखीव अशी व्यवस्था महाराष्ट्रात नाही. त्यामुळे येथे कर्तृत्व बहरले ते योगायोगाने, त्या त्या व्यक्तीच्या सक्षमतेने. त्याचीदेखील यथायोग्य सामाजिक नोंद होत नाही. कधी कधी ते प्रकाशात येते; तथापि, तो झोत दूर झाला, की पुन्हा कर्तृत्व सामाजिक अज्ञानांधकारात लुप्त होते. यावर मात म्हणून कर्तृत्वाची कायमस्वरूपाची आणि सतत अद्ययावत होत असलेली नोंद करणे, हे या उपक्रमाचे वैशिष्ट्य आहे.

कर्तृत्वाच्या अशा नोंदीमुळे समाजाला आधार तर लाभेलच, शिवाय तरुणवर्गाला ते प्रेरणास्थान होईल. कर्तृत्वाची नोंद फक्त जिवंत व शक्यतर वयाच्या सत्तरीआधीच्या व्यक्तींची, चार पातळ्यांवर करायची आहे. अशा कर्तृत्ववान व्यक्तींची नोंद 'थिंक महाराष्ट्र'वरील 'कर्तृत्वाच्या गौरवगाथा' या विभागात, दोन स्वरूपांत आणि चार स्तरांत केली जाते. एक रूप म्हणजे कर्तृत्व गाजवत त्याच पातळीवर स्थिरावलेल्या व्यक्ती. अशा व्यक्तींची नोंद 'थोरवी' या शीर्षकाखाली केली जाते. अनेकदा विशिष्ट काळात, विशिष्ट घटनाप्रसंगांत काही व्यक्ती चमकतात. त्यांच्यापैकी काहींचे कर्तृत्व क्षणकाळापुरते असते-टिकते: त्यांची नोंद 'क्षणत्कार' या शीर्षकाखाली केली आहे. ही मांडणी चार स्तरांमध्ये आहे, १. जिल्हा स्तर २. राज्य स्तर ३. राष्ट्र स्तर ४. आंतरराष्ट्र स्तर.

याशिवाय आणखी एक स्तर आहे, तो तारांकितांचा. त्यांचे कर्तृत्व लोकांनी मान्य केलेले-उचलून धरलेले असते. अशा नोंदींमुळे उमेद वाढेल, धीर मिळेल; समाजात रोल मॉडेल्स आहेत असा विश्वास तयार होईल आणि मराठी समाजाचा मुख्य दोष जो न्यूनगंड, तो दूर सारण्यास मदत होईल. या कर्तृत्ववान व्यक्तींशी सरळ संपर्क साधता यावा म्हणून त्यांचे इमेल, पत्ते मिळवून देण्याचा आणि त्यांच्यात व समाजात दुवा प्रस्थापित करण्याचा 'थिंक महाराष्ट्र'चा प्रयत्न राहील. या प्रकारे आपल्या गाव-परिसरातील कर्तृत्ववान व्यक्तींची माहिती लिहून आपण 'थिंक महाराष्ट्र'कडे पाठवू शकता.

**- थिंक महाराष्ट्र**

जीवनाकडे पाहते आणि तिला दिसणाऱ्या विसंगत गोष्टी, मजेदार किस्से सर्वांबरोबर शेअर करते. तिनं पुस्तकातही अशा चौकटी घातल्या आहेत. वाचकाला त्या अवघड गोष्टी सोप्या करून सांगतात.

आजच्या धकाधकीच्या आयुष्यात शरीराला फटकारून, दमवून न घेता आणि बुद्धीच्या ताब्यात नसणाऱ्या जिभेला दोष न देता, शरीराला विश्वासात घेऊन, येणाऱ्या सणांची, कार्यक्रमांची, समारंभांची आगाऊ सूचना देऊन, चीज-ड्रायफ्रुट्स-गोड पदार्थांना शत्रू न मानता, उलट त्यांचा अंतर्भाव खाण्यात करून आपल्या वर्षानुवर्षं चालत आलेल्या परंपरांचा आदर करायला शिकवणारी आणि सामान्यातील सामान्य माणसाला पोषणतत्त्व समजावणारी ऋजुता, आपल्याला आपल्या जवळची वाटते. ती असामान्य तर आहेच. मिताहाराची आणि योगाची पुरस्कर्ती, आघाडीची आहारतज्ज्ञ आणि एक लेखिका... या सर्व आघाड्यांवर यशस्वी असणारी ऋजुता उत्तरोत्तर अशीच प्रगती करो!

ऋजुता दिवेकर, वेबसाइट - http://www.rujutadiwekar.com
ऋजुता दिवेकर यांचा ब्लॉग - http://rujutadiwekar.blogspot.com

**- ऋचा शेंडे -तुळसकर**
भ्रमणध्वनी : ९८१९५११७९४
ruchashende@yahoo.com

## ‘थिंक महाराष्ट्रा’ला नव्या वर्षात नवे स्वरूप

‘थिंक महाराष्ट्र डॉट कॉम’ या दिनकर गांगल संपादित ‘वेबपोर्टल’ला नव्या वर्षात नवे स्वरूप लाभणार असून, महाराष्ट्राचे समग्र चित्र साकार करण्याच्या दिशेने आणखी काही वैशिष्ट्ये प्राप्त होणार आहेत. ‘व्हिजन महाराष्ट्र फाउंडेशन’तर्फे हे वेबपोर्टल, ‘ना नफा’ तत्त्वावर चालवले जाते. त्यावरील सर्व माहिती सर्व जनतेला खुली असून त्या माहितीत भर टाकण्याची सुविधादेखील आहे.

‘वेबपोर्टल’चे नवे डिझाइन ऋचा तुळसकर यांनी कल्पकतेने केले असून पुण्याच्या ‘आदि डॉट नेट’तर्फे तांत्रिक सुविधा पुरवल्या जाणार आहेत.

माहिती संकलनाच्या अंगाने ‘पोर्टल’वरील मजकुराची जिल्हावार मांडणी होत असून कर्तृत्व, स्वयंसेवा, संस्कृति-संचित हे ‘पोर्टल’चे विशेष, नियमित स्वरूपात सादर होणार आहेत. प्रमोद शेंडे यांच्या सहकार्यातून विविध वर्तमानपत्रे व नियतकालिके यांमधील निवडक लेखन ‘पोर्टल’वर नोंदले जाते. नव्या वर्षात हे काम विकेंद्रित पद्धतीने करून वेगवेगळ्या विभागांमधून निवडक प्रसिद्ध लेखनाची सूची साधण्याचा प्रयत्न चालू आहे. त्यावखेरीज ‘पोर्टल’साठी स्वतंत्र लेखन काही लेखक करत असतात. त्यातमध्ये ज्ञानदा देशपांडे, अनिल भाटे, विश्वास काकडे यांचे लेखन वाचकांच्या पसंतीस विशेष उतरले. सध्या ऋचा गोडबोले ‘नाना प्रयोगाकारणे...’ नावाचे सदर लिहित असतात. तसेच, बुधवारी मराठी भाषाविषयक वेगवेगळ्या स्वरूपाचे लेखन प्रकट केले जाते.


नव्या वर्षात दररोज, एका नव्या पुस्तकाचा परिचय करून देण्याचा ‘पोर्टल’च्या संपादकीय विभागाचा संकल्प आहे. जेष्ठ ग्रंथपाल हेमंत शेट्ये यांचे याकामी मार्गदर्शन लाभत आहे. त्यांच्याच सहकार्याने मराठीतील सर्व नव्या-जुन्या पुस्तकांच्यात नोंदी व त्यांची वैशिष्ट्ये ‘पोर्टल’वर संग्रहित करण्याचा महत्त्वाकांक्षी उपक्रम नव्या वर्षी हाती घेतला जात आहे.

‘थिंक महाराष्ट्र’ ने गेल्या दीड वर्षांत बऱ्यापैकी जम बसवला असून, महाराष्ट्राबाबत स्थानिक पातळीवरून काही वेगळ्या प्रकारची माहिती सादर केली. एक अगदी उत्तम कामगिरी म्हणजे सानेगुरुजी यांचे साहित्य कॉपीराइट फ्री झाल्या झाल्या त्यांची सर्व पुस्तके पुन्हा युनिकोडमध्ये सेट करून, ‘सानेगुरुजी डॉट नेट’ (www.saneguruji.net) वर सादर केली. ‘थिंक महाराष्ट्र’ला अतुल तुळशीबागवाले ‘महाराष्ट्र फाउंडेशन (अमेरिका)’च्या माध्यमातून अंशतः अर्थसाहाय्य करतात, तर ‘सानेगुरुजी डॉट नेट’ ही वेबसाइट ‘धारप असोसिएट्स’चे अरुण धारप यांच्या अर्थसाहाय्यातून पूर्णत: आकारास आली.

जिल्हावार माहिती संकलनात ग्रामदेवता, यात्रा-जत्रा, स्थानिक परंपरा, कर्तृत्ववान व्यक्ती, स्वयंसेवा अशा नोंदी स्थानिक पातळीवरून मिळवण्यासाठी प्रयत्न जारी आहेत. याकामी गावोगावाहून सहकार्य मिळावे, अशी अपेक्षा संपादक दिनकर गांगल यांनी व्यक्त केली आहे.

**थिंक महाराष्ट्र डॉट कॉम**
व्हिजन महाराष्ट्र फाउंडेशन, ३, वेणू अपार्टमेंट, तळमजला, केशरबाग कंपाउंड, बी.जे.देवरुखकर मार्ग, शिंदेवाडी समोर, दादर(पूर्व), मुंबई-४०० ०१४ मोबाइल-९०२९५५७७६७ श्र दूरध्वनी-(०२२) २४१८ ३७ १०

# सर्वोदय शिक्षण मंडळाच्या हार्दिक शुभेच्छा !



शांताराम पोटदुखे
अध्यक्ष

**संचालित शैक्षणिक संस्था**

१) सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर
२) शांताराम पोटदुखे विधी महाविद्यालय, चंद्रपूर
३) श्रीमती सुशिलाबाई रामचंद्र मामीडवार समाजकार्य महाविद्यालय, चंद्रपूर
४) इंस्टीटयुट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज ॲण्ड रिसर्च, कोसारा, ता. जि. चंद्रपूर
५) शंकरराव बेझलवार कला आणि वाणिज्य महाविद्यालय, अहेरी
६) नेहरू विद्यालय तथा कनिष्ठ विज्ञान महाविद्यालय, चंद्रपूर
७) इंदिरा विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय, वरूर रोड
८) आदर्श किसान महाविद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय, नारंडा
९) सरस्वती विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय, वढोली.
१०) श्री. साईनाथ विद्यालय, कढोली.
११) गुरूनानक विद्यालय, विरूर स्टेशन.

**शांताराम पोटदुखे**
अध्यक्ष
सर्वोदय शिक्षण मंडळ,
चंद्रपूर

**अरविंद सावकार पोरेड्डीवार**
कार्याध्यक्ष
सर्वोदय शिक्षण मंडळ,
चंद्रपूर

**प्रशांत पोटदुखे**
सचिव
सर्वोदय शिक्षण मंडळ,
चंद्रपूर

**मदन धनकर**
उपाध्यक्ष
सर्वोदय शिक्षण मंडळ,
चंद्रपूर

**रमेश मामीडवार**
उपाध्यक्ष
सर्वोदय शिक्षण मंडळ,
चंद्रपूर

RUCHEE Regd. MH/MR/WEST/79/2009-2011
RNI NO - 428 / 1987
POSTED AT MUMBAI PATRIKA CHANNEL STG OFFICE. MBI - 400 001


# जास्त परताव्या व सुरक्षेसह $7\frac{2}{3}$ वर्षात आपली रक्कम दुप्पट करा




जेष्ठ नागरिकांसाठी $7\frac{1}{3}$ वर्षांची मुदत

**सेंट डबल** योजनेच्या माध्यमातून आपल्या पैशांची वाढ वेगाने करा – उच्चतम सुरक्षेसह रकमेची अनेकपट वाढ करा:

- किमान ठेव रक्कम : रु.10,000 महानगर व इतर नागरी केंद्रासाठी
  : रु. 5,000 अर्ध नागरी व ग्रामिण केंद्रासाठी
- जास्तीत जास्त ठेव रक्कम : रु. 1 कोटी पेक्षा कमी
- ठेवीच्या बदल्यात कर्जे व अग्रिमे : सध्या अस्तित्वात असलेल्या नियमानुसार

| | व्याज | वार्षिक वाढ | कालावधी | |
|---|---|---|---|---|
| | | | महिने | वर्षे |
| सर्व साधारण नागरिक | 9.15% | 13.24% | 92 | $7\frac{2}{3}$ |
| जेष्ठ नागरिक | 9.65% | 13.99% | 88 | $7\frac{1}{3}$ |

दिनांक 5 जानेवारी 2012 ते 31 मार्च 2012 पर्यंत योजना चालू राहील

सेंट्रल बैंक ऑफ इंडिया
सेन्ट्रल बैंक ऑफ़ इंडिया
Central Bank of India
1911 से आपके लिए "केंद्रित" "CENTRAL" TO YOU SINCE 1911

www.centralbankofindia.co.in
टोल फ्री नं: 1800 200 1911


'रुची' हे मासिक संपादक दिनकर गांगल यांनी 'ग्रंथाली'करता इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी. डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०० ०३१ येथे छापून ग्रंथाली, द्वारा इंडियन एज्युकेशन सोसायटीची महात्मा फुले कन्याशाळा, दादर (प), मुंबई ४०००२८ येथे प्रकाशित केले.